# विपुलश्री

सुजाण कुटुंबाचा समृद्ध साथीदार

Pune

वर्ष २५, अंक ५वा
सप्टेंबर २०२३ (मासिक)
किंमत रुपये ३५/-
पृष्ठसंख्या ६०




FORGINGS
AUTOMOTIVE
WHEELS
Machined Components
Steel
Axle Aggregates
Thermal Systems
Infrastructure
AT THE HEART OF INDIAN INDUSTRY
KALYANI
KALYANI
DRIVING INNOVATION


indus health
PLUS
Samajhkar Jiyo Behtar
WORLD
HEART
DAY
इंडस हेल्थ तपासणी सोबत स्वत:ला आणि कुटुंबाला निरोगी ठेवा.
आपल्याला आपल्या हृदयाचे महत्व आणि निरोगी आरोग्याची जाणीव आहे. हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजारांसाठी धुम्रपान, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि लठ्ठपणा यासारखे अनेक जोखीम घटक आहेत. पौष्टीक आहार, नियमित व्यायाम, जीवनशैलीत आवश्यक ते बदल आणि नियमितपणे आरोग्य तपासणी करून आपल्या हृदयाची आणि संपूर्ण आरोग्याची काळजी घ्या.
इंडसच्या हृदयासंबंधी तसेच सर्वसमावेशक आरोग्य तपासणी पॅकेजमध्ये मूत्रपिंड, यकृत, फुफ्फुस अशा प्रकारच्या महत्वाच्या चाचण्यांचा समावेश आहे. अधिक माहितीसाठी आमच्याशी संपर्क साधा.
अधिक माहितीसाठी मिस्ड कॉल करा
90490 33333
वाचवा
आयुष्य
पैसे
टॅक्स
22 वर्षे
प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी क्षेत्रामधील विश्वासाची 22 वर्षे
8,00,000 पेक्षा अधिक तपासण्यांचा अनुभव
78 शहरांमधील 122 केंद्रांचे विस्तृत जाळे
www.indushealthplus.com

VIPULSHREE MONTHLY SEPTEMBER 2023
Price Rs. 35/-

To post at P.S.O. Deccan Gymkhana, Pune
on 29th of month
Publication date 25th of every month

Licence No. PCW/082/2021-2023
R.N.I. No. 71817 / 1999

www.kirloskarpumps.com

Pumping RELIABLE Solutions
for a BETTER World

Kirloskar
Enriching Lives



A global leader in fluid management solutions

- 8 manufacturing facilities in India.
- Manufacturing and packaging facilities in Egypt, South Africa, Thailand, The Netherlands, United Arab Emirates, United Kingdom and USA.

**Pumps | Valves | Hydro Turbines | Turnkey Projects**

Water Resource Management | Irrigation | Power | Industry | Oil & Gas | Marine & Defence | Building & Construction | Distribution (Small Pumps) | Valves | Customer Service & Spares

**KIRLOSKAR BROTHERS LIMITED**
A Kirloskar Group Company
Registered Office: Udyog Bhavan, Tilak Road, Pune 411002. Tel: +91(20)24440770,
Global Headquarters: "Yamuna", Survey No. 98(3,7), Baner, Pune 411045. Tel: +91(20)27214444,
Email: marketing@kbl.co.in, Website: www.kirloskarpumps.com, CIN No.: L29113PN1920PLC000670

OUR COMPANIES
United Kingdom | U.S.A. | South Africa | India | The Netherlands


If undelivered, please return to:
Shreevatsa Prakashan, 67, Shailesh Society, Karvenagar, Pune 411052.

**संस्थापक**
संजय वैद्य

**संपादक**
माधुरी वैद्य

# विपुलश्री

**वर्ष २५**
**अंक ५**
**सप्टेंबर २०२३**


**विपुल वाचन,**
**विपुल ज्ञान,**
**विपुल रंजन**

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| देवमाणूस | डॉ. प्रकाश रायकर | ०९ |
| कृष्ण पडला गोंधळात | सुभाष अबूज | २१ |
| स्पर्धक | श्रेया ताम्हनकर | २९ |
| सहावा कोण? | लीनता साने | ४३ |


## सदरं


| | | |
|---|---|---|
| वार्तालाप | डॉ. शिरीन वळवडे | ०६ |
| जडणघडण | डॉ. स्वाती कर्वे | १४ |
| बँकेतले दिवस | डॉ. विनीता आपटे | २६ |
| दिवेलागण | आशुतोष उकिडवे | ३५ |
| पडद्यावरचे प्रेमिक | सदानंद गोखले | ४७ |
| अक्षरधन | कल्पना शिरोडे<br>शर्मिली कवडे<br>कल्याणी गाडगीळ | ५५ |



**संपादक**
माधुरी वैद्य मो. ९८९०६०७४४०

**कार्यालयीन व्यवस्थापक**
शर्मिली कवडे - मो. ९९२२४४९५०२

**मुखपृष्ठ छायाचित्र** - वैजयंती गाडगीळ

**मुखपृष्ठ मांडणी, सजावट**-सुप्रिया जोगदेव

**आतील चित्रे** –प्रतिक काटे

**मुद्रित शोधन**– प्रीती केतकर

**टाईपसेटिंग** – सुमेधा गोखले

**जाहिरात प्रतिनिधी**
**मुंबई** –दिलीप टोळकर ९९६७०६२३५४
**पुणे** –पुष्कराज खांडेकर ९८२३०५०३०२

**मुद्रण स्थळ, मुखपृष्ठ छपाई**
जंगम कलामुद्रण सर्व्हे नं.१०, धायरी,
पुणे ४११०४१.
मोबाईल नं. : ९८५०७९७००८

**पत्रव्यवहार/ जाहिरात/वर्गणीसाठी संपर्क**
श्रीवत्स प्रकाशन, ६७,'विपुल',
शैलेश सोसायटी, कर्वेनगर,
पुणे ४११०५२.

e mail- vipulshree@gmail.com

**अंकाची किंमत ३५ रुपये**
वार्षिक वर्गणी रुपये ५००

'विपुल श्री' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक माधुरी संजय वैद्य यांनी जंगम कलामुद्रण,स.न.१०,धायरी पुणे ४११०४१ येथे छापून ६७, विपुल, शैलेश सोसायटी, कर्वेनगर, पुणे ४११०५२ येथून प्रसिद्ध केले. संपादक-माधुरी संजय वैद्य. या मासिकात व्यक्त केलेल्या मतांशी संपादक/ प्रकाशक सहमत असतातच असे नाही.

'Vipul Shree' monthly is owned, printed & published by Madhuri Sanjay Vaidya, printed at Jangam Kalamudran, S.No.10, Dhayari, Pune 411041 & Published at 67, Vipul, Shailesh Society, Karvenagar, Pune 411052. Editor- Madhuri Sanjay Vaidya



# वाचकपत्रे

ऑगस्ट महिन्याचा अंक मिळाला. संपादकीयामध्ये माधुरीताईंचा पन्नास वर्ष पुण्यात विविध प्रकारची वाहने चालवण्याचा अनुभव, पुणेकरांच्या बेशिस्तीमुळे नामुष्की ओढवली आहे हे स्पष्ट करते. यात वर्णन केलेला प्रसंग बाहेरून आलेल्या वाहनचालकांचा आठमुठेपणा जास्त गंभीर आहे हे निदर्शनास आणून दिले. वार्तालाप सदरातील टेडी बेअरची कहाणी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षांच्या बरोबर जोडलेली आहे हे वाचून त्यांच्या लोकप्रियतेचे रहस्य उलगडले. आपल्या देशात बांधवगड टायगर रिझर्वमध्ये केलेल्या उत्खननात सव्वीस बुद्ध गुहा सापडल्या हे वाचून आश्चर्य आणि कौतुकास्पद कार्य वाटले. लेखात व्यक्त केलेल्या पेशावर लवकर तोडगा निघावा. त्रेपन्न वर्षीय लखविंदरसिंग यांनी केलेला बावीस हजार किलोमीटरचा प्रवास थक्क करणारा, धाडसी वृत्ती दर्शविणारा उपक्रम आहे. सलाम!

मेरी मिथॉन यांचा बारा वर्षाच्या वाढदिवसाचा केक आणि अमेरिकन सैनिकांच्या बरोबर घडलेला प्रसंग आणि नव्वद वयाच्या वाढदिवसाच्या दिवशी आलेला अनुभव समाधान देणारा आहे.

स्वास्थ्यवार्तामध्ये डॉ. शिरीन वळवडेंनी वर्तमान ऋतुराज अनुसरून क्रॉनिक कफ झाल्यास 'जोशान्दा' या उपायाचा प्रभाव खूप छान समजावून सांगितला आहे. त्यांना धन्यवाद.

वासंतिक कथास्पर्धेतील उत्तेजनार्थ पारितोषिक विजेती कथा आवडली. तारा गोपीनाथ यांनी दोन भिन्न संस्कृतींवर प्रकाश टाकीत, माणसांच्या वर्तवणुकीवर होणारा परिणाम कथेत विशद केला आहे.

जडणघडण यात डॉ. स्वाती कर्वे यांनी एकोणिसाव्या शतकाचा शेवट आणि विसाव्या शतकाचा प्रारंभ या काळात स्त्रीचे सक्षमीकरण शिक्षणाच्या वाटेवरून चालणाऱ्या स्त्रियांची जडणघडण, कर्तृत्व डॉ. अरुणा ढेरे यांच्या 'विस्मृतिचित्रे' या पुस्तकात उलगडून दाखवले आहे. त्यांचा जीवनपट वाचून थक्क करणारे आहे त्यांचे योगदान वाचून.

विपुलश्री मासिकाच्या पंचवीस वर्षांच्या वाटचालीचा अश्विनी धोंगडे यांनी घेतलेला आढावा संपादक माधुरीताईंच्या कारकिर्दीबद्दल वाचून अभिमान वाटला.

डॉ. विनिता आपटे यांनी बँकेतले दिवस हे विनोद निर्माण करणारे सदर आणि कठीण प्रसंगाला तोंड दिल्याचे वर्णन दोन्ही बाजू स्पष्ट करते. प्रमोद बापट यांनी यलो स्टोन पार्कचा संस्मरणीय अनुभव, वाचकाला पाहायला जायला उद्युक्त करतो.

दिवेलागण या सदरातील ऑगस्ट महिन्याच्या अंकात आशुतोष उकिडवे यांचा लेख मन सुन्न करणारा. तिढा सोडविण्यासाठी दिलेला लढा आणि भोगलेले दु:ख यांना रूपेरी किनार दिसते.

सदानंद गोखले यांचे सदर 'पडद्यावरचे प्रेमिक' पुन:प्रत्ययाचा आनंद देतात. दोन्हा कलाकरांची प्रदीघे कारकीर्द वाचून थक्क व्हायला होते. लेख अभ्यासपूर्ण आणि रोचक आहे. अक्षरधन या सदरात डॉ. मृणाल धोंगडे यांनी लेखिका नीती बडवे यांच्या भाषा विषयाचे अनेक पैलू पुस्तकात उलगडले आहेत. मातृभाषा आणि भाषांतर यांची सविस्तर माहिती दिली. दोन्ही कथा प्रा. रेखा नाबर आणि डॉ. अतुल घाटे यांनी लिहिलेल्या आवडल्या. आपल्या मासिकात नवीन सुरू झालेला उपक्रम 'शोध मराठी शब्दांचा' उत्तम आहे. भाषा संवर्धन आणि बोली भाषेचा विस्तार होण्यासाठी.

आपल्या मासिकात कविता विभाग, व्यंगचित्र, सुविचार आणि शब्दकोडे समाविष्ट करावे ही विनंती.

**अश्विनी साठे**

**पुणे**

# संपादकीय

**का**ही जागा काही ठिकाणं अशी असतात की जिथे गेल्यावर आपल्याला आपल्या खुजेपणाची जाणीव होते. तिथला जगण्याचा संघर्ष बघितला की आपला संघर्ष थिटा वाटायला लागतो.

नुकतीच मी लेह लडाखची ट्रीप करून आले. तिथले उत्तुंग, भव्य पर्वत, खालून खळाळत वाहणाऱ्या, कधी फेनधवल तर कधी गढूळ पाण्याच्या नद्या, या डोंगरांमधून काढलेले नागमोडी रस्ते आणि त्या रस्त्यांवरून अत्यंत सफाईने धावणाऱ्या गाड्या हे सगळं बघणं आणि अनुभवणं अचंबित करणारं होतं. एका जागेवरून दुसऱ्या जागी पोचायचं तर कमीत कमी पाच ते सहा तास या नागमोडी रस्त्यांवरून करावा लागणारा प्रवास.

लडाख हे सर्व बाजूंनी पाकिस्तान आणि चीनच्या सीमारेषांनी वेढलेलं राज्य. त्यामुळे अर्थातच ठिकठिकाणी भारतीय सैन्यदलाचे चेकपोस्ट. अशा दुर्गम भागात, आपल्या घरापासून, माणसांपासून दूर आपल्या मातृभूमीच्या संरक्षणासाठी राहिलेले जवान बघितले आणि त्यांच्याबद्दलच्या अभिमानाने ऊर भरून आला. आज हे जवान सीमाभागात प्रतिकूल हवामानात राहून जागता पहारा देत आहेत म्हणून आपण इथे सुखाची झोप घेऊ शकतो आहोत.


कारगिल येथे वॉर मेमोरिअल बघताना एक जवान आम्हाला सगळी माहिती देत होता. कोणीतरी त्याला विचारले की तुम्ही या लढाईमध्ये सहभागी होतात का? तेव्हा काहीसा खजिल होऊन तो म्हणाला, ''नाही. मला ती संधी नाही मिळाली पण भविष्यात कधी मला मातृभूमीसाठी लढण्याचा मान मिळाला तर मी स्वतःला भाग्यवान समजेन.''

खारदुंगला पासच्या इथे एक लेफ्टनंट कर्नल आम्हाला भेटले. त्यांना विचारलं, इतक्या उंचावर, दुर्गम भागात तुमचा दिनक्रम काय असतो? तुम्हाला घरची आठवण येत नाही का? कंटाळा येत नाही का? त्यावर ते म्हणाले, घरची आठवण येते. मधून मधून घरी फोन करतो पण दुर्गम असली तरी किती छान जागा आहे ही. कंटाळा कसा येईल? आम्ही मातृभूमीचे राखणदार आहोत. त्याचा अभिमान आणि आनंद याच भावना आमच्या मनात आहेत. केवढी ही जिगर आणि कर्तव्यनिष्ठा! अशा आपल्या जवानांसमोर नतमस्तक झालो आम्ही. त्यांना आम्ही नेलेल्या राख्या बांधल्या. आमच्या जवळचा घरगुती खाऊ दिला तेव्हा आम्हाला थोडं बरं वाटलं. त्यांच्यासाठी कितीही केलं तरी उतराई होऊच शकणार नाही, इतकं मोठं काम ते करत आहेत.

लडाखचा निसर्ग, उत्तुंगता, भव्यता, पेंगॉग लेकसारखं नितळ सौंदर्य याबरोबरच लक्षात राहतं ते तिथे राहणाऱ्या भारतीय जवानांचं ध्येयनिष्ठ कर्तव्य बजावणं. प्रतिकूल हवामानात प्राणांची बाजी लावून लढलेली लढाई, शुभ्र धवल बर्फावर सांडलेलं त्यांच्या बलिदानाचं रक्त हे सगळं ऐकताना, बघताना डोळे पाणावतात आणि ऊर अभिमानाने भरून येतो.

लडाखला फक्त निसर्गसौंदर्य बघायला जायचं नाही, तर आपल्या शूर जवानांच्या शौर्यगाथा ऐकायला, त्यांना प्रत्यक्ष बघायला जायचं. लडाखचं निसर्गसौंदर्य इतर जागांपेक्षा वेगळं आहे, कारण त्याला भारतीय सैन्यदलाच्या कर्तव्यनिष्ठेची, बलिदानाची, देशप्रेमाची रूपेरी किनार आहे. त्या पर्वतांवरून प्रवास करताना ती सतत आपल्याला जाणवत राहते.

माधुरी वैद्य




## डॉ. शिरीन वळवडे

### स्मॉलेस्ट नॅशनल पार्क

आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याच्या दूरवर हिंदी महासागरात मादागास्कर बेटाच्या ईशान्येला सिसिआल्स हा एकशे पंधरा लहानमोठ्या बेटांचा समूह आहे. त्यातली तीन मोठी बेटं अनुक्रमे - माहे, प्रासलिन व ला-डिग्यू ही आहेत. एकशे पंधरापैकी फक्त आठ बेटांवर लोकवस्ती आहे. इतर लहान, लहान बेटं ओसाड पडली आहेत.

पण सिसिआल्सच्या बेटांचं नैसर्गिक सौंदर्य अफाटच आहे. मन मोहवणारा समुद्र किनारा, पांढरीशुभ्र वाळू, नैसर्गिकपणे वाढलेले वृक्ष, झाडं, वेली. इतर सामुद्रिक प्राण्यांसह इथं आढळतात ती इथली भीमकाय कासवं- अल्डाब्रा टॉरटॉईज. मोठ्या बेटांवर सूचना दिल्या जातात. 'कासवांनाही मान द्या. त्यांना इथं वावरण्याचा हक्क आहे. ते कदाचित तुमच्यापेक्षा जास्त वयाचे असतील.' (कासवं दीर्घायुषी असतात. साधारणपणे दीडशे वर्षं जगतात. गिनिज वर्ल्ड रेकॉर्डनुसार 'जोनाथन' हे सध्याचं एकशे नव्वद वर्षं जगलेलं कासव आहे.) ग्रॅनाईटचे गुळगुळीत खडक इथल्या सौंदर्यात भर घालतात.

तीन मोठ्या बेटांवर लोक सूर्य-स्नानासाठी (सन बाथ) जातात. असाच एक भूतपूर्व ब्रिटीश न्यूज-पेपरमॅन ब्रेन्डॉन ग्रीगशॉ हा त्या भागात गेला आणि तिथल्या सृष्टिसौंदर्याच्या प्रेमात पडला. इतरांसारखा त्या भागात सुटी घालवून तो परत गेला नाही तर माहे इथं राहिला. १९६२ मध्ये त्यानं माहेच्या उत्तर किनाऱ्याजवळचं ओसाड पडलेलं चोवीस एकर्सचं 'मोयेन' हे बेट अवघ्या आठ हजार पौंड्सला विकत घेतलं. त्यानं बेटाची साफसफाई केली. तिथं जगातला सर्वात लहान नॅशनल पार्क तयार केला. त्यात फिरण्यासाठी पायवाटा तयार केल्या. इथं अलडाब्रा कासवं मुक्तपणे फिरतात. रंगीबेरंगी पक्षी मुक्तपणे उडतात. आता हा टुरिस्ट स्पॉट झाला आहे.



### अफ्रागोला (चार हजार वर्षांपूर्वी गाडलं गेलेलं छोटंसं शहर)

इटलीच्या कंपानिया भागात नेपल्स शहराजवळ हायस्पीड रेल्वेमार्ग तयार करण्यासाठी अलीकडेच खोदकाम सुरू झालं होतं. अचानकच त्यांना ब्रॉन्झ एजच्या सुरुवातीच्या काळातलं 'अफ्रागोला' हे लहानसं शहर राख, माती व गाळ यात गाडलं गेलेलं आढळलं.

पॉम्पेई शहर ज्वालामुखी वेसुविअसच्या उद्रेकात गाडलं गेलं, त्यापूर्वी दोन हजार वर्षं आधी अफ्रागोला गाडलं गेलं असावं असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. शहरावर अनेक मीटर्स उंचीचा राख, माती व गाळाचा थर आहे. या थरानं या लहानशा शहरातल्या वस्तू व इतर प्रिन्ट्स आतापर्यंत उत्तम तऱ्हेनं जपून ठेवल्या आहेत.

इथं मानवी सांगाडे आढळले नाहीत, पण पळून जाणाऱ्या लहान मुलांचे व मोठ्या वयाच्या व्यक्तींचे फूट प्रिन्ट्स



या भागात लहान घरं आढळली, मोठे राजवाडे आढळले नाहीत. बहुधा हे लोक घोळक्यानं राहत असावेत. त्या ग्रुपचा एक (किंवा जास्त) प्रमुख असावा. इथं एक स्टोरेज बिल्डिंग आढळली. त्यात धान्य साठवलं जात होतं. त्यात बार्ली, हॅझल नट्स, वाईल्ड ॲपल्स, डाळिंब, कार्मेलियन चेरी वगैरेचा समावेश होता. त्या काळात इथले लोक कसे राहत होते ते कळलं.

आढळले. धान्य, फळं, पानं, झाडं यांचे अवशेष उत्तम तऱ्हेनं प्रिझर्व केलेले आढळले. त्यांचे परफेक्ट कास्ट ज्याला 'सिनेराईट' म्हणतात, ते तयार झाले. इथं गोट्स, पिग्ज व माशांचे सांगाडे सापडले.

हा वेसुविअसचा उद्रेक झाला तेव्हा ज्वालामुखीतून बाहेर पडलेलं मटेरिअल प्रथम ईशान्य दिशेकडे वाहत गेलं. त्यामुळे शहरावासियांना पळून जायला अवधी मिळाला. नंतरच्या उद्रेकात मटेरिअल पश्चिम व वायव्येकडे वाहत गेलं व ज्वालामुखीपासून पंचवीस किलोमीटर्स दूरवरचा भाग गाडला गेला, त्यात या शहराचा समावेश होता.

या गाडल्या गेलेल्या छोट्याशा शहराचा चार हजार वर्ष पत्ता लागला नाही. ते तिथं गाडलं गेलंय याची कुणाला कल्पना नव्हती.

डॉ. माटाराझो या 'युनिव्हर्सिटी ऑफ कनेक्टिकस'तर्फे इथं संशोधनासाठी आल्या आहेत. त्यांच्या मते ज्वालामुखीचं मटेरिअल तितकंसं उष्ण नसावं. त्यामुळे अवशेष जळून नष्ट झाले नाहीत तर त्यांचे सुरेख 'सिनेराईट कास्ट' तयार झाले व जवळजवळ चार हजार वर्ष ते सुस्थितीत राहिले. सिनेराइट कास्ट हे भुसभुशीत खडकासारखे असतात.

हा ज्वालामुखीचा स्फोट काही वेगळाच होता. त्यामुळे नंतरची अनेक वर्षं या भागातलं हवामान बदललं होतं.

## जगातलं सर्वात मोठं फूल

इंडोनेशियाच्या पश्चिम सुमात्राच्या भागात घनदाट, दुर्गम जंगल आहे. या भागात अनेक प्रकारचे वृक्ष, फळं, फुलं पाहायला मिळतात. इथंच संरक्षक टीमच्या कर्मचाऱ्यांना भीमकाय फूल सापडलं. 'रॅफ्लसीया टुआन मु' या जातीचं हे फूल ३.६ फूट व्यासाचं आहे. फुलाच्या पाकळ्या मरून रंगाच्या असून त्यावर पांढरे ठिपके असतात.




झाडाला हे फूल येतं. सात दिवस ते उमललेलं राहतं. नंतर ते वाळतं आणि त्याबरोबरच त्या झाडाचं आयुष्यही संपतं.

## अमूल्य हस्तलिखित

मार्क ट्वेनचं हे हस्तलिखित शतकापूर्वी हरवलं होतं. ते अलीकडे मार्क ट्वेनच्या घनिष्ट मित्राच्या नातीला तिच्या घराच्या माळ्यावरच्या ट्रंकेत सापडलं. तिने लगेच ते त्याचा खरेपणा जाणून घेण्यासाठी सॉथबीकडे सोपवलं.


मार्क ट्वेनच्या हस्ताक्षरातलं हे हस्तलिखित सहाशे सहासष्ट पानांचं आहे. त्यानं स्वतः ते बफेलो (न्यूयॉर्क) इथं पाठवलं होतं. नंतर ते गहाळ झालं. ते कधी सापडणार नाही असं मार्क ट्वेन प्रोजेक्टच्या अधिकाऱ्यांना वाटलं. शतकानंतर का होईना, पण ते सापडलं.


मार्क ट्वेन हा अमेरिकेतला गाजलेला ह्युमरिस्ट, रायटर व लेक्चरर होता. त्यानं आयुष्यभर भरपूर लेखन केलं हे सर्वश्रुत आहेच. शेवटी जेव्हा त्याचं बोलणं थांबलं तेव्हा त्यानं शेवटचे शब्द लिहिले, ''गिव्ह मी माय ग्लासेस.'' तो दिवस होता २१ एप्रिल १९१०. नंतर त्या दिवशी संध्याकाळी तो हार्टअटॅकने वारला.

## मार्क ट्वेनची काही सुप्रसिद्ध वचनं–

१) इफ यू टेल द ट्रुथ, यू डोन्ट हॅव टू रिमेंबर एनिथिंग.

२) ऑलवेज डू राइट, धिस विल ग्रॅटिफाय सम पीपल ॲन्ड ॲस्टॉनिश द रेस्ट.




३) व्हेन इन डाऊट, टेल द ट्रुथ.

४) ऑलवेज ओबे युवर पेरेंट्स व्हेन दे आर प्रेझेंट.

५) द लॅक ऑफ मनी इज द रुट ऑफ ऑल इव्हिल

## स्वास्थ्यवार्ता

### लो फॉडमॅप डायट

ऑस्ट्रेलियाच्या मेलबॉर्न इथल्या मोगॅश युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी लो-फॉडमॅप डायटची कल्पना पुढे मांडली.

फॉडमॅपचा फुलफॉर्म आहे- 'फरमेंटेड ऑलिगो डाय मोनोसॅकराइड अॅन्ड पोलिऑल्स.'' प्रत्येक शब्दाचं पहिलं लेटर घेऊन 'एफ्.ओ.डी.एम.ए.पी' हा शॉर्टफॉर्म झाला. ही लेटर्स एकत्र करून 'फॉडमॅप' हा आणखी शॉर्टफॉर्म तयार झाला.

फॉडमॅप डायटमध्ये पचायला जड व मंद गतीनं शोषण होणारे शॉर्ट चेन कार्बोहायड्रेट्स येतात. ते आहारात कमी घेतले म्हणजेच 'लो फॉडमॅप डायट घेतलं तर पोटाच्या तक्रारी सत्तर टक्क्यांनी कमी होतात, असं या संशोधकांचं म्हणणं आहे.




शॉर्ट चेन कार्बोहायड्रेट्स हे अतिशय सूक्ष्म असे कण असतात. ते आतड्यातून कमी शोषले जातात किंवा मुळीच शोषले जात नाहीत. ऑसमोसिस या क्रियेद्वारे ते लहान आतड्यात पाणी खेचून घेतात व डायरिया होतो. आतड्यातले बॅक्टेरिया या कार्बोहायड्रेट्सना चटकन फरमेंट करतात त्यामुळे ते मोठ्या आतड्यात पोहोचतात तेव्हा गॅसेस निर्माण होतात. हायड्रोजन, कार्बन डाय ऑक्साइड व मिथेन हे वायू फार जास्त प्रमाणात निर्माण झाले की पोटाला गुबारा येतो.

**शॉर्ट चेन कार्बोहायड्रेट्सचे प्रकार पुढीलप्रमाणे–**

**१) लॅक्टोज –** दूध व दुधाचे पदार्थ- चीज, पनीर वगैरे. यात लॅक्टोज असतं. काहींना ते पचत नाही.

**२) फ्रुक्टोज –** बऱ्याचशा फळात व गोड चवीच्या भाज्यात फ्रुक्टोज असतं. कॉर्न सिरपमध्ये ते खूप जास्त असतं. पदार्थांना गोडवा आणण्यासाठी ही 'अॅडेड शुगर' वापरली जाते. काही जणांना हे पचत नाहीत.

**३) गॅलेक्टॅक्स –** डाळींमध्ये यांचं प्रमाण जास्त असतं. काहींना त्या पचत नाहीत.

**४) ग्लुटन –** गहू, बार्ली, राय या धान्यात ग्लुटनचं प्रमाण जास्त असतं. काही व्यक्तींना त्यामुळे पोटाच्या तक्रारी जाणवतात.

**५) पॉलिऑल्स –** हे साखरेपासून वेगळे काढलेले ऑरगॅनिक कम्पाऊन्ड्स आहेत. स्वीटनर्स म्हणून ती वापरली जातात. उदा. सॉर्बिटॉल, मॅनिटॉल, झायलिटॉल, एरिथ्रीटॉल वगैरे. यांचं आतड्यातून शोषण होत नाही म्हणून ब्लड शुगर वाढत नाही. पण काही जणांना यामुळे पोटाच्या तक्रारी जाणवतात.

**६) फ्रुक्टन –** हे पुढील खाद्यपदार्थात आढळतं. काहींना हे पदार्थ पचत नाहीत. उदा. ब्रेड, पास्ता, कांदा, लसूण, बार्ली, ब्रोकोली, पिस्ता, अॅसपॅरागस.


हे सगळे पदार्थ 'फॉडमॅप' या गटात मोडतात. ते वर्ज्य केले किंवा कमी प्रमाणात घेतले तर पोटाच्या तक्रारी असणाऱ्यांचा बराच त्रास कमी होतो.

**डॉ. शिरीन वळवडे**
**२, वसंत एनक्लेव्ह,**
**नवी दिल्ली**

# देवमाणूस

डॉ. प्रकाश विनायक रायकर

पहाटेची स्वारगेट-दादर बस अंमळ उशिराने दादरला पोहोचली. बस स्थानकावर सुभाष माझी वाट पाहत होता. आम्ही दोघे शाळासोबती. सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमधून ग्रॅज्युएट झालो. कामानिमित्त मी पुण्याला आणि सुभाष मुंबईला गेलो. आम्ही दोघे दुरावले होतो. तरी आमचा पत्रव्यवहार चालू होता. सुट्टीत जमेल तेव्हा एकमेकांना भेटत होतो. दोन वर्षांपूर्वी सुभाषचा विवाह झाला होता. मी अविवाहित होतो. पुण्याला माझं चांगलं बस्तान बसलं होतं. दिवसा ऑफिस आणि उरलेला वेळ लक्ष्मी रोडवरून सुंदर तरुणींचे चेहरे न्याहाळत घालवत होतो. वधूपिते यंदा कर्तव्य आहे का अशी



विचारणा करत होते. घरून लग्नाबद्दल पत्र आलं होतं. पण मी टोलवाटोलवी केली. बंधन नको वाटत होतं. एवढ्यात लग्न करायला मन घेत नव्हतं.

अचानक मला कंपनीच्या मुंबईच्या ऑफिसात चार महिन्यांसाठी जावं लागेल असं सांगण्यात आलं. मुंबईला जायचं म्हटल्यावर पहिला प्रश्न उपस्थित झाला तो जागेचा. मुंबईत राहायचं कुठे. मी सुभाषला फोन केला.

''कंपनी तुला चार महिन्यांसाठी मुंबईला पाठवत आहे. तुझ्यासाठी जागा बघू. अरे तुझी समस्या दूर झाली. माझी अलिबागला टेंपररी ट्रान्सफर झाली आहे. बायको बाळंतपणासाठी माहेरी गेली आहे. तू माझ्या फ्लॅटमध्ये राहू शकतोस' सुभाष म्हणाला.

दुपारी सुभाषच्या फ्लॅटच्या गॅलरीत बसलो असता बाजूच्या बिल्डिंगच्या गॅलरीत पाठमोरा उभा असलेला गृहस्थ ओळखीचा वाटला. कॉलेजमधील कबड्डीपटू विश्वास असावा असं वाटलं. पण खात्री न पटल्यामुळे हाक मारली नाही. तो गृहस्थ वळून बघेल म्हणून वाट पाहिली. पण तो आत गेला. पुन्हा बाहेर येईल म्हणून थोडा वेळ वाट पाहिली. शेवटी कंटाळून आत गेलो.

थोड्या वेळाने सहजच मी गॅलरीत आलो असता त्याच गॅलरीत एक स्त्री उभी असलेली मला दिसली. अंगाने सुदृढ आणि देखणी असल्यामुळे स्वाभाविकच बघत राहिलो. मनातल्या मनात विचार करीत होतो... म्हणजे आपलं मुंबईतील वास्तव्य चांगलं जाणार म्हणायचं. आजकाल मुंबईत जागा मिळणं कठीण आणि त्याच्या जोडीला असा देखणा शेजार. दुसऱ्या दिवशी सकाळी मी सुभाषला विचारलं, 'बाजूच्या बिल्डिंगमध्ये कोण राहतं?''

''त्या बिल्डिंगमध्ये आठ बिऱ्हाडं आहेत.''

''बाजूच्या बिल्डिंगमध्ये म्हणजे आपल्या फ्लॅटच्या गॅलरीच्या बाजूला गॅलरी आहे, त्या फ्लॅटमध्ये.''

''काल इथं आलास आणि लगेच पाहणी करायला सुरूवात झाली. तुझी कॉलेजची वासुगिरीची सवय अजून गेली नाही वाटतं. बाजूच्या बिऱ्हाडाशी कदापीही संबंध ठेवू नकोस. त्यात राहणारी बाई महाबिलंदर आहे.''

''म्हणजे?''

''अरे, ती बाई एक नंबरची बनेल आहे. तिचा नवरा नंदीबैल आहे.''

''असेल, बनेल. माझं काय देणं घेणं आहे त्या बाईशी. त्या गॅलरीत एका गृहस्थाला मी पाठमोरा बघितला. आपल्या कॉलेजमधील कबड्डीपटू विश्वास साठे असावा असं मला वाटलं म्हणून विचारलं कोण राहतं?''

''सुधाकर, तुझा तर्क बरोबर आहे. त्या फ्लॅटमध्ये विश्वास साठे राहतो.''

सुभाषच्या मते ती बाई वाह्यात होती. पण असं का व्हावं... इथं राहायला लागल्यावर सर्वच उलगडा होईल अशी समजूत घातली.

संध्याकाळी मी आणि सुभाष गप्पा मारीत बसलो असताना 'सुभाषराव' अशी हाक मारीत एक गृहस्थ आला. मला पाहून तो थबकला.

''विश्वास, हा माझा स्नेही. याची चार महिन्यांसाठी मुंबईला बदली झाली आहे. इथंच राहणार आहे.'' माझी ओळख करून दिली.

सुभाषशी जुजबी बोलणे झाल्यावर 'बरंय येतो.' म्हणून विश्वास परत जाण्यासाठी वळला. त्यानं मला ओळखलं नव्हतं. तो निघून गेल्यावर त्याच्याकडे जाणं मला जमलं नसतं, त्यामुळे स्वत:ची ओळख करून देण्याखेरीज मार्ग नव्हता.

''तुम्ही मला ओळखलेलं दिसत नाही'' माझ्या उद्‌गारांमुळे त्याने वळून बघितलं. पण नजरेत ओळख पटली नाही.

''नाही... आपण! माफ करा, चेहरा पाहिल्यासारखा वाटतोय, परंतु नाव लक्षात येत नाही. कुठं भेटलो होतो आपण!''

''सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये. मी सुधाकर देशपांडे.''

''हं, आठवलं आता. कॉलेजच्या वक्तृत्व स्पर्धेत तुम्ही दोन वर्ष अव्वल आला होतात.''

''त्यात काय मोठेसं?'' मंद हास्य करीत मी म्हणालो.

''तुमच्या उदात्त विचाराने मी भारावून गेलो होतो. आपण समाजाचे देणे लागतो. समाज सुसंस्कृत आणि सुविचारी असणं हे भूषण आहे. आपल्यासारखे उच्च प्रतीचे प्रगल्भ विचार बाळगणारे लोक विरळाच. तुमच्यासारखे लोक जगात आहेत म्हणूनच जग सुरळीत चालू आहे. अन्यथा समाज, कर्तव्य हे शब्द आजकाल परके झाले आहेत.''

विश्वासच्या बोलण्यात तळमळ होती. पण माझी अवास्तव स्तुती केल्याबद्दल मला शरमल्यासारखं वाटलं.

''तुमचा सहवास मिळणार आहे काही दिवसांसाठी ही आनंदाची गोष्ट आहे. या ना एकदा आमच्या घरी. मी

बाजूच्या बिल्डिंगमध्ये राहतो.''

''येईन की!''.

''चहालाच या.''

''उद्याच या, सुभाषराव, यांना आमच्या घरी आणायचं काम तुमचं!''

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही विश्वासकडे गेलो. थोड्या वेळात विश्वासची बायको चहा घेऊन आली.

''ही माझी पत्नी- रंजना.''

''नमस्कार.''

''हे सुधाकरराव, तीन-चार महिन्यांसाठी यांची मुंबईच्या ऑफिसात बदली झाली आहे. सुभाषरावांच्या फ्लॅटमध्ये राहणार आहेत.''

माझे डोळे तिचे रूप सामावून घेण्याचा प्रयत्न करीत होते. तिच्या हरिणीसारख्या चपळ डोळ्यांनी एका दृष्टीत मला बरंच सांगितले. रंजना खरोखरीच सुरेख होती. माझी नजर हलेना.


''नव्या काकांना नमस्कार कर.'' विश्वास म्हणाला.

''काय नाव तुझं?'' मी विचारलं.

''रेखा.'' ती बोबड्या आवाजात म्हणाली.

गप्पा मारीत आम्ही चहा घेतला. रंजना बनेल दिसत होती. चतुर असावी याची मला कल्पना आली. लाघवी हसताना कुणीही तिच्या डोळ्यात सापडलं असतं. मी त्याला अपवाद नव्हतो. माझ्यासारख्या अविवाहित माणसाला रंजनाची ओळख म्हणजे पर्वणीच वाटली. स्त्रियांना कसं खूश करावं हे मला चांगलंच ज्ञात होतं. विश्वासच्या बिऱ्हाडातून निघताना मी त्या प्रमदेची शिकार करण्याचं ठरवलं.

हळूहळू मला एकेका गोष्टीचा उलगडा होऊ लागला. विश्वास आणि रंजना ही दोन टोकं होती. विश्वासचं विश्व त्यागावर अधिष्ठित होतं. तर रंजनाला छानछोकी, भोगलालसेखेरीज दुसरी भावना नव्हती. त्यांचे क्वचित खटके होत. पण रेखासमोर विश्वास रंजनाला काहीच बोलत नसे. आणि एरवीसुद्धा त्याचा सूर समजावणीचा असे. रंजना बऱ्याच वेळा बाहेर जाई. वेळप्रसंगी उशिरा घरी येई आणि विश्वास माझ्यासमोर रेखाला काहीतरी थाप मारीत असे. प्रथम माझ्या लक्षात आले नाही. पण अशा वेळी विश्वासचा चेहरा कष्टी दिसे. काहीतरी दुःख लपवीत असल्याचा भास होई.



रंजनाच्या सौष्ठवाने मी पुरता वेडावला होतो. तिच्याविषयी वाटणारी अभिलाषा क्षणाक्षणाने वाढत होती. प्राप्त होण्याची शक्यता वाटू लागली होती आणि मी त्या दिशेने वाटचाल सुरू केली. विश्वास घरी नसताना काहीतरी लटकं कारण काढून रंजनाची भेट घेत होतो. तिच्या बोलण्याचा अर्थ लावत होतो.

माझ्या प्रयत्नांना यश आलं. रंजनाचं आणि माझं लवकरच सूत जमलं. तिचा उद्देश काय होता देव जाणे. परंतु मला घटकाभराची सोबत हवी होती. आम्ही जवळ येत होतो. पुष्कळ वेळा दुपारीच मी घरी येत असे. त्यामुळे माझ्या आणि रंजनाच्या बैठकी होऊ लागल्या. एकमेकांचं बोलणं आणि त्याचा अर्थ समजू लागला. घसट वाढली. डोळ्यांचे इशारे जुळले आणि एका निसरड्या क्षणी मी रंजनाच्या ओठावर ओठ टेकले. अंतर संपलं. एक नवं चोरटं सहजीवन सुरू झालं.

त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणजे रंजनाचं बाहेर जाणं थांबलं. ती घरात राहते हे पाहून विश्वास आनंदी दिसू लागला. त्याच्या बोलण्यात पुन्हा उत्साह दिसू लागला. एके दिवशी दुपारी मी आणि रंजना गप्पा मारीत बसलो होतो. तेवढ्यात विश्वास बाहेरून आला. अचानक आलेला पाहून आम्ही दोघं चपापलो. मला वाटतं, मीच जास्त चपापलो. रंजना तशीच मख्खपणे बसून राहिली.

''काय सुधाकरराव, काय चाललंय?''

''गप्पा मारीत होतो.''

रंजना उठून घरी जाऊ लागली, तेव्हा विश्वास घाईघाईने तिला म्हणाला, ''बस. बस. घाई नाही.''

पण ती घरी गेली आणि विश्वास बोलत बसला.

''आणखी काय खबरबात सुधाकरराव?''

''अहो, कसली खबर? सर्व ठीक चाललंय.''

''तुम्ही फार थोर गृहस्थ आहात.''

विश्वासच्या बोलण्याचा रोख मला समजला नाही. वाटलं की माझ्या आणि रंजनाच्या नव्याने प्रस्थापित झालेल्या

नात्याची त्याला कल्पना तर नाही ना! विश्वासच्या डोळ्यात पाहण्याचा मी प्रयत्न केला, परंतु तसं काही दिसलं नाही.

''मी आणि थोर! विश्वासराव, उगीच हरभऱ्याच्या झाडावर चढवू नका.''

''मी मनापासून बोलतोय.''

''मग मला थोर कशाबद्दल केलेत...''

''वेळ आली की सांगेन. तुमचे आचार विचार मला आवडले. गेल्या दोन महिन्यांपासून मी तुम्हाला ओळखतो.''

विश्वास माझी वारेमाप स्तुती करत होता. मला मात्र अवघडल्यासारखं झालं. एक गोष्ट त्याच क्षणी ठरवली आणि ती म्हणजे रंजनाच्या गाठीभेटी घराबाहेर घ्यायच्या. कारण कदाचित चोराच्या मनात चांदणं अशातलाही प्रकार असेल.

''बराय, सुधाकरराव, निघतो.''

''बसा हो.''

''नको, घरी जाऊन विश्रांती घेतो. नाऊ अ डेज, आय हॅव नो वरीज.''

विश्वासच्या बोलण्याचा रोख त्याने न सांगताच माझ्या लक्षात आला. रंजना विशेषतः बाहेर जात नसल्यामुळे तो खुशीत होता. पण त्याला कल्पनाही नव्हती की रंजनाचा प्रियकर बदलला आहे.

एका गोष्टीचा मला उलगडा झाला नव्हता. आपली पत्नी वाईट चालीची आहे, हे माहीत असूनही त्याने तिला घराबाहेर का काढली नाही? माझ्याशी तो ज्या तऱ्हेने वागत होता, हे विचारात घेता त्याच्या पत्नीशी सूत जमवणे मला पाप वाटू लागले. असं करणं बरोबर नाही असं माझं अंतर्मन सांगे आणि त्याचा परिणाम होई. पण तो निश्चय रंजना समोर आली की विरघळून जाई.

रंजनाच्या गाठीभेटी घराबाहेर घ्यायच्या असं मी ठरविलं. तिला माझं म्हणणं पटलं. घरात बंधनं होती. संकेताची स्थळं ठरली. वेळा निश्चित झाल्या.

रंजना माझ्या इशाऱ्यावर नाचत होती. माझ्या सहवासासाठी वेडी झाली होती. पण जवळ येऊनही दूर राहत होती. ठरलेल्या ठिकाणी आम्ही भेटत होतो. एकमेकांना सुखवीत होतो. आम्ही बाहेर भेटलो तरी कोणाच्या लक्षात येऊ नये याची काळजी घेत होतो. परंतु रंजनाच्या उशीरा घरी येण्याचा परिणाम विश्वासवर दिसू लागला. मध्यंतरी तो खुशीत होता. परंतु त्याचा चेहरा काळजीने ग्रासलेला दिसू लागला.

त्या दिवशी मी आणि रंजना जुहू बीचला गेलो होतो. बराच वेळ आम्ही एकत्र काढला. तू सर्वार्थाने मला हवी आहेस असं मी तिला सांगितलं आणि ती तयार झाली. पुढच्या आठवड्यात विश्वास फिरतीवर जाणार होता. त्या वेळी आम्हाला हवा असलेला एकांत मिळणार होता.

मी निघालो. रंजना मागे रेंगाळली.

मी घरी पोहोचलो. चहाचं आधण ठेवलं, तेवढ्यात दरवाजाची बेल वाजली. बघतो तो विश्वास बाहेर उभा.

''आत या ना.'' मी म्हणालो.

आत येऊन तो सोफ्यावर बसला. चार-पाच मिनिटं झाली तरी काहीच बोलला नाही.

''काय झालं विश्वासराव?'' मी काळजीयुक्त स्वरात विचारलं.

बघता बघता त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले.

''सुधाकरराव, हे नाही सहन होत.''

''कशाबद्दल बोलताय तुम्ही?''

''माझ्या बायकोचं वागणं...''

''सुधाकरराव, तुम्ही सज्जन आहात म्हणून सांगतो, माझी बायको फुकट गेलेली आहे. गेली सात वर्षे हे दु:ख मी एकट्यानं सहन केलं. एखाद्या माणसाला सांगावं तर तोच प्रथम माझ्या बायकोचा हात धरायला तयार होईल. पण तुम्ही दोन महिने इथं आहात. एकदा तरी रंजनाविषयी वाईट विचार तुमच्या मनात आला का?''

''विश्वासराव, पण...'' माझं मन मला खात होतं.

''थांबा, मला बोलू द्या. तुम्ही इथं राहायला आलात. आमच्या घरी येऊ लागलात. त्यामुळे रंजनाचं बाहेर जाणं बंद झालं. तुमच्यासारख्या सज्जन माणसाच्या सहवासाचा प्रभाव तिच्यावर पडला. मी सुखी होतो. आनंदी होतो...''

विश्वास बोलत होता आणि मला अपराध्यासारखं वाटत होतं.

''पण तुम्ही मध्येच येणं जाणं बंद केलंत आणि रंजना पूर्ववत बाहेर जाऊ लागली.''

''विश्वासराव, तुम्ही म्हणता, पण वहिनी तशा वाटत नाहीत.''

''तुम्ही भोळे आहात. तुमच्यासारख्या सज्जन माणसांना ते कधीच उमगणार नाही. काय कमी आहे तिला. स्वत:चा फ्लॅट आहे. पदरात मुलगी आहे. उद्या रेखा मोठी झाली म्हणजे...''

''पण विश्वासराव, असं आहे तर सरळ तुम्ही...''

''मी घटस्फोट घेत नाही हेच ना! पण त्याने प्रश्न सुटेल का? अजाण रेखाचं काय होईल?''

माझं मन अस्थिर झालं. मला स्वत:चीच शरम वाटली. विश्वासचं बोलणं चालू होतं. ''रंजनाला घटस्फोट दिला तर कुटुंबसंस्थेला सुरुंग लागेल. कुटुंबसंस्था

अबाधित राखण्यासाठी मला दु:ख सहन केलं पाहिजे.''

मला विश्वासचं बोलणं असह्य होऊ लागलं. मी किती क्षुद्र विचारसरणीचा होतो. आणि तो किती मोठ्या मनाचा होता. स्वत:च्या जीवनाची होळी करून समाजाला उब देत होता.

''आणखी काही विशेष?'' मी सहजच विचारलं.

''पुढच्या आठवड्यात बहुधा फिरतीवर जावं लागेल.''

''बराय की तेवढाच चेंज तुम्हाला.''

''घरची काळजी करू नका, विश्वासराव.''

''पण तुम्ही आमच्या घरी येत नाही. रेखा म्हणत होती, काका गोष्ट सांगायला येत नाहीत. तुम्ही पूर्वी आमच्या घरी वारंवार यायचेत. त्यामुळे रंजना विशेष बाहेर जात नसे. तुमच्या सहवासात रंजना देवता बनत असे. पूर्वीसारखं तुम्ही आमच्या घरी येत जा. तुम्हाला वाटलं तर माझ्या गैरहजेरीत आमच्या घरी राहा. तुमच्यामुळे आमच्या घरात पवित्र वातावरण निर्माण होईल. आणि फिरतीवर असूनही माझ्या मनाला शांती लाभेल.''

मी विश्वासच्या डोळ्यात पाहिलं. मला काहीतरी भव्य आणि दिव्य असं तेज दिसलं. माझं मन अस्थिर झालं. मी किती क्षुद्र विचारसरणीचा होतो आणि तो किती मोठ्या मनाचा होता, देवमाणूस होता. किती विश्वासाने रंजनाची जबाबदारी तो माझ्यावर टाकत होता. आणि मी... त्याच्या अपरोक्ष तिच्याशी एकांत करायचे मनोरे रचले होते.

विश्वास निघून गेल्यावर मला स्वत:ची शरम वाटली. रंजनाच्या सहवासात मला स्वत:विषयी अभिमान वाटे. पण माझं किळसवाणं स्वरूप मला उमगलं.

दिवा मालवून मी अंथरुणावर पडलो. रात्रभर डोळा लागला नाही. डोळ्यासमोर विश्वासची लाचार नजर येत होती. तो फिरतीवर गेल्यावर इथं कसं राहायचं कळेना. मन विचारांनी सुन्न झालं होतं. माझा विचार निश्चित झाला, पहाटेच मी आवरलं आणि सुभाषच्या बिऱ्हाडातून निघालो. पुन्हा न येण्यासाठी.

**डॉ. प्रकाश विनायक रायकर**
**पूर्वा अपार्टमेंट, फ्लॅट नं. ४०४**
**कानसई गाव,**
**अंबरनाथ (पू) ४२१५०१**

## वर्गणीदारांसाठी निवेदन

विपुलश्री मासिकाची वर्गणी मे २०२३पासून वाढविली आहे. मासिकाची वार्षिक वर्गणी आता रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) झाली आहे. या वर्गणीत वर्गणीदारांना एकूण अकरा अंक (दहा मासिक अंक + एक दिवाळी अंक) पाठवले जातील. त्रैवार्षिक वर्गणी रु. १४००/- असेल. आजीव सभासदत्व रु. ५०००/- असेल.

वार्षिक वर्गणी चेक ड्राफ्ट, मनीऑर्डर आणि मनी ट्रान्सफर या माध्यमातून स्वीकारली जाते. चेक अथवा ड्राफ्ट पाठवायचा असल्यास 'श्रीवत्स प्रकाशन' नावाने पाठवावा. नेटबँकिंग अथवा G Pay द्वारासुद्धा वर्गणी पाठवू शकता. त्यासंबंधी अधिक माहितीसाठी कार्यालयात संपर्क साधावा. विपुलश्रीच्या कार्यालयात समक्ष वर्गणी स्वीकारली जाते. आपण कुठल्याही महिन्यापासून वर्गणीदार होऊ शकता. वर्गणी मिळताच वर्गणीदारांना आमच्या सहीची पावती पाठवली जाते.

संपादक

**ता. क. -** ज्या वर्गणीदारांना साध्या पोस्टाने अंक पुन्हा पुन्हा पाठवूनसुद्धा मिळत नाही, ते रजिस्टर पोस्टाचा पर्याय निवडू शकतात. त्यासाठी रु. २५०/- अधिक पाठवावे. त्याप्रमाणे ऑफिसमध्ये कळवावे.




**स्त्रीच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा मागोवा**


# संक्रमण काळातील चार शलाका

डॉ. स्वाती कर्वे

**का**लपटावर सुरू झालेले विसावे शतक अनेक नवीन जाणिवा, संवेदना घेऊन सुरू झाले. काळ राजकीय घडामोडींनी व्यापलेला असला तरी स्त्रियांच्या प्रगती व विकासाच्या दृष्टीने अनुकूल गोष्टीही घडत होत्या. म. कर्वे यांच्या हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेने नवे पर्व सुरू केले होतेच. १९०९ मध्ये स्थापन झालेल्या 'सेवासदन' संस्थेने व्यावसायिक प्रशिक्षणही सुरू केले. 'सेवासदन'ची पहिली कमिटी सर्व स्त्रियांची होती. ही गोष्ट स्त्रियांची विकसित कार्यक्षमताच सिद्ध करीत होती. १९०४च्या पहिल्या 'आद्य महिला परिषदेची' 'पडदा परिषद' अशी चेष्टा झाली तरी 'महिला परिषद' स्त्रियांसाठी एक 'गुडस्टार्ट' ठरला. ''आम्हाला रांगोळ्या घालायला शिकवू नका, तर मानसिक उन्नती करणारे शिक्षण द्या.'' या शब्दात काशीबाई कानिटकरांनी सर्व स्त्रियांच्या मनाची ओढच व्यक्त केली. वातावरणात एकीकडे परिवर्तनाची, संक्रमणाची चाहूल लागत होती. परंतु समाजमनाच्या धारणा, स्त्रीकडे बघायचा दृष्टिकोन फारसा बदलत नव्हता.

१९२० नंतर गांधीयुगाची सुरुवात झाली. गांधीजींनी केलेल्या आवाहनाने स्त्रिया प्रभात फेरीपासून स्वदेशी चळवळीपर्यंत उपक्रमांमध्ये भाग घेऊ लागल्या. स्त्रियांची नवीन पिढी पुढे येत होती. एकदा प्रकाशाची वाट दिसल्यावर माणसाला मागे फिरता येत नाही. माणूस उमेदीने पुढे जात राहतो. तशी स्त्रियांची वाटचाल चालू होती. समान प्राथमिक शिक्षण, मतदानाच्या अधिकारासाठी स्त्रियांनी लढा दिला. पुण्यात मोर्चा काढला. संधिकाळातील धूसरता कमी होऊन सर्वांगीण संक्रमण नजरेच्या टप्प्यात येत होते. संक्रमणाचा टप्पा ओलांडताना स्त्रीची अस्मिता, नवविचारांना व्यक्त करण्याची ओढ असलेली शांता नाशिककर, कमल बंबावाले, पिरोज आनंदकर इ. लेखिकांची पिढी पुढे येत होती.

टाटा समाज विज्ञान संस्थेच्या 'महाराष्ट्रातील स्त्री मुक्तीच्या पाऊलखुणा 'प्रकल्पातील शेवटचा भाग' या संवेदनशील टप्प्यावरील स्त्रीला व्यक्त करणारा विनया खडपेकर यांनी तयार केला. 'स्त्री स्वातंत्र्य वादिनी' (विसाव्या शतकातील परिवर्तन) लेखिकेने कृष्णाबाई मोटे, मालतीबाई बेडेकर, गीता साने व शकुंतला परांजपे या चार लेखिकांच्या साहित्यातून व्यक्त झालेला स्त्री मुक्तीचा, स्त्रीजीवनाचा आविष्कार उलगडला आहे. तत्कालीन सामाजिक संदर्भात कोंदणात स्त्रीची अस्मिता कशी फुलत होती. स्त्री मुक्तीचे नवे विचार कसे उमटत होते.




याचा शोध तत्कालीन साहित्याच्या पार्श्व पडद्यावर घेतल्याने स्त्री जीवनाची स्थिती, गती आणि काळाबरोबर पडणारी स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाची समयोचित वीण-नवप्रतिमा या दोन्हीचे वास्तव चित्र साकार होते.

चारही लेखिकांच्या साहित्यातील स्त्री चित्रणाचा वेध प्रामुख्याने घ्यायचा असल्याने लेखिकेने तत्कालीन साहित्यातून व्यक्त होणाऱ्या स्त्री चित्रणाच्या पार्श्वभूमीचाही वेध घेतला आहे. 'स्त्री-प्रधान', 'स्त्री-केंद्री' कादंबरी लेखनाची ऊर्मी तत्कालीन लेखकांमध्ये होतीच. वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर, पु. स. देशपांडे, ना. ह. आपटे- मामा वरेरकर पुढच्या टप्प्यावरचे ना. सी. फडके, वि.स. खांडेकर इत्यादी लेखकांच्या कादंबऱ्यांतील स्त्री चित्रणाचा वेध घेऊन लेखिका एकंदर निरीक्षण नोंदवते. 'रागिणी', 'नलिनी, 'सुशीलेचा देव'सारख्या स्त्री केंद्री कादंबऱ्या लिहिणाऱ्या वा. म. जोशी यांनी काव्यशास्त्रात रमणाऱ्या स्त्रिया उभ्या केल्या. सुशीला शिक्षित, पण विवाहानंतर परदेशी जाते. विवाहाच्या आधी नाही. फडके, खांडेकर स्वप्नाळू नजरेनेच स्त्रीकडे बघणारे होते. त्यात केतकर जास्त वास्तववादी होते. नायिका बौद्धिक कुवत असणाऱ्या होत्या. मीलनासाठी अगतिक नव्हत्या, पण पुरुष पात्रांच्या कुवतीनुसारच स्त्रीचा विकास चित्रित केला आहे. 'सुशिक्षित स्त्रीला अनुरूप पुरुषाबरोबर सुखी जीवन देण्यासाठी समाजशास्त्रज्ञ केतकरही किंचितसे स्वप्नरंजनाकडे झुकले होते. असे म्हणावे लागेल.'' असे भाष्य लेखिका करते.

कमल बंबावाले, शांता नाशिककर इत्यादी लेखिकांनी मात्र स्त्रीचे वेगळे, स्वतंत्र चित्रण केले होते. कमल बंबावाले यांनी घटस्फोटाच्या मागणीतून स्त्रीमनाची बंडखोरीच व्यक्त केली. कादंबरीतून घटस्फोटाच्या कायद्याची माहिती देण्याची कल्पना लेखिकेला अभिनव वाटते. शांताबाई नाशिककर यांनी 'लग्नाचा बाजार' या कादंबरीतून विधवेला कुंकू लावण्याचा अधिकार देऊन तद्‌विषयक मूलभूत विचारच व्यक्त केला. ''पण कुंकू लावणे हा जर मुलींचा जन्मसिद्ध हक्क आहे; तर नवरा मेल्यावर तो हक्क एकदम का जावा? विधुरांची ओळख पटावी म्हणून त्यांना (पुरुषांना) समाजाने खूण दिलेली नाही. असे असता स्त्रियांच्याच या बाबतीत भेद काय म्हणून?'' असा रोखठोक प्रश्नही शांताबाई नाशिककर विचारतात. १९३० नंतरच्या स्त्रिया स्त्री प्रश्नांची चित्रे कशी मांडत आहेत. त्यांची स्त्रीकडे बघण्याची दृष्टी वेगळी कशी आहे; तेच आपल्याला तपासायचे आहे. हा हेतू व्यक्त करून लेखिका मुख्य विषयाकडे वळते.-

**''विचक्षण बुद्धीच्या चार प्रतिभावंत लेखिका.'**

१९३० नंतरच्या संक्रमणकाळात स्त्रियांच्या प्रश्नांकडे पाहण्याच्या दृष्टीतच फरक असल्याने चित्रणातही तफावत होती. लेखकांना न जाणवलेले प्रश्न, आकलन न झालेले स्त्रीमन लेखिका चित्रित करीत होत्या. या चौघी स्त्रियांना चाकोरी मोडायची संधी मिळाल्याने त्या स्त्री प्रश्नांशी भिडल्या. 'चित्रणाची रूपरेखा' या शीर्षकाने लेखक व लेखिका यांच्या चित्रणातील तफावत लेखिकेने काही विषयांच्या आधारे स्पष्ट केली आहे. या तौलनिक विवेचनातून संक्रमणकाळातील लेखिकांची मानसिक घडण, स्त्री जीवनाकडे बघण्याचा प्रगत दृष्टिकोन स्पष्ट होतो. लेखक व लेखिकांनी चित्रित केलेल्या स्त्रीच्या रूपातच मूलतः फरक होता. लेखकांच्या नायिका सुंदर, विवाहाची गुलाबी स्वप्ने पाहणाऱ्या असल्याने नायिकांच्या वर्णनात लेखक जास्त रमत होते. तर लेखिकांच्या नायिका सामान्य रूपाच्या, मध्यमवर्गीय, आर्थिक जबाबदारी असणाऱ्या, जीवनात संघर्ष करणाऱ्या होत्या. त्यामुळे नायिकांची रूपवर्णने लेखिकांनी केली नाहीत. लेखकांच्या नायिका शिक्षित; पण प्रगल्भ स्त्री अभावाने दिसते. तर लेखिकांच्या नायिका नोकरी करणाऱ्या, कोंडमारा, संघर्षाला तोंड देत स्वतःचा मार्ग शोधणाऱ्या, गरजेपोटी नोकरी करणाऱ्या होत्या. उलट सुशिक्षित स्त्रीचे प्रश्न लेखकांना जाणवलेले दिसत नाहीत. स्त्री-पुरुष प्रीतीचे चित्रण लेखक, लेखिका दोघेही करतात. पण चित्रणात मूलभूत फरक होता. लेखकांचे नायक प्रेमात रंगलेले. जणू त्यांचे स्वतंत्र बेट

लेखिका म्हणते,- ''वृक्षाच्या आधारे वाढणारी प्रीतीची वेल, अशीच कल्पना, केतकर, वा. म. जोशी सोडून सर्वांची

दुनिया स्वप्नील वाटते.'' तर उलट लेखिकांच्या लेखनात- ''प्रेमाची अशी भरगच्च पेठ नाही. प्रेम आहे. पण वास्तवाने घेरलेले. पारंपरिक नीतीमूल्यांच्या चित्रणाने प्रीतीकथेला वास्तवाचे रूप प्राप्त. 'हिंदोळ्यावर', 'घरचा मालक', 'लतिका', 'मीनाक्षीचे जीवन' इत्यादी स्त्रीलिखित कादंबऱ्यांतून वास्तवाने घेरलेल्या प्रेमकथा आहेत. त्यामुळे लेखिकांच्या साहित्यातील प्रीतीविश्व श्रीमंत आणि समृद्ध वाटते.'' असे लेखिका भाष्य करते.

तसेच 'विवाहबाह्य मातृत्व', 'विवाहविषयक विचार', 'स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या चित्रणातील तफावतही लेखिकेने स्पष्टपणे नोंदवली आहे. काही महत्त्वाची निरीक्षणे लेखिका नोंदवते. लेखिकांना विवाहाचे कोंदण आवश्यक वाटते. पण विवाहाने होणारी कोंडीही अनेकदा चित्रित होते. त्यामुळे लेखिका विवाहविच्छेदनाचे समर्थन करतात. तर विवाहबंधनात स्त्रीची होणारी कोंडी समजली तरी लेखक विवाहबंधन तोडू इच्छित नाहीत. घटस्फोटाचे सहसा चित्रण नाही. स्वातंत्र्य चळवळीतील सहभागही वरवरचा दिसतो. तर लेखिकांच्या चित्रणातील स्त्रिया संख्येने कमी, पण फक्त देशभक्तांवर प्रेम करीत नाहीत. स्वतःचे विचार स्पष्टपणे मांडणाऱ्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाच्या दिसतात. ''एकंदरीत लेखिकांच्या समानतेच्या कल्पनाही रूढ समाजव्यवस्थेचे फलित म्हणून रूढ अर्थाने शालीनच होत्या; असे इथे म्हणावेसे वाटते.'' असा निष्कर्ष लेखिका नोंदवते.

या चारही लेखिकांना दिसलेले, जाणवलेले म्हणूनच त्यांनी अभिव्यक्त केलेले स्त्रीविश्व कसे होते. त्यांनी टिपलेले स्त्री जीवनाचे विषय, वास्तव लेखकांना का दिसले नाही; या दृष्टीने चौघींच्या ललित व संशोधनपर लेखनाचे लेखिका चिकित्सक विवेचन करते. त्यातूनच स्त्री स्वातंत्र्यवादिनींचे व्यक्तिमत्त्व व जडणघडण अभिव्यक्त होते.

स्त्रीचे सुरू झालेले अर्थार्जन मुख्य विषय होता. स्त्री, कुटुंब व समाजावरही या गोष्टीचे परिणाम होऊ लागले होते. 'गरज म्हणून स्त्रीची नोकरी' असाच विचार होता. पैसे मिळवूनही स्त्रीला समाजात पुरूषाच्या बरोबरीने स्थान नाही, हे जाणवत होतेच. कमावत्या मुलीचा विवाह लांबणीवर टाकणारे बाप होतेच. 'बाबांचा संसार माझा कसा होणार?' हाच प्रौढ कुमारिकांचा प्रश्न होता. स्त्रियांचा कोंडमारा होत होता. 'शिकलेली स्त्री निषिद्ध' अशी खेडोपाडी कल्पना होती. म्हणूनच स्त्रिया नाईलाजाने 'आपद्धर्म' म्हणून नोकरी करतात असा लेखिकांचा एकंदर अभिप्राय होता.


कमावत्या तरुण स्त्रीचे जीवन इतके निस्तेज का? याचे उत्तर समाजव्यवस्थेतच असल्याचे लेखिका स्पष्ट करते. समाजाने स्त्रीचे शिक्षण, नोकरी स्वीकारली. पण नीतीमूल्यांची चौकट तशीच होती. स्त्रीला पैसे खर्च करण्याचा अधिकार नाही. निर्णय स्वातंत्र्य नाही. 'अर्थार्जन' हा स्त्रीचा हक्क मानायची तयारी नाही. याचेच चित्रण स्त्री साहित्यात आहे.

धर्म, रूढींच्या बंधनांनी येणारे स्त्रीवरील ताणही स्त्रियांच्या लेखनात चित्रित झाले. कधी प्रत्यक्षपणे तर कधी अप्रत्यक्ष रूपाने. 'लग्नाचा बाजार', 'वठलेला वृक्ष' कादंबऱ्यांतून स्पष्ट चित्रण केले आहे. शकुंतलाबाई मार्मिकपणे घोडे खरेदीच्या निमित्ताने लग्नाच्या बाजाराची चेष्टा करतात. ''लग्नाच्या बाजाराविषयी सुशिक्षित मुलींच्या मनात असलेला असंतोष, नाराजी लेखकांना जाणवल्याच्या खुणा त्यांच्या साहित्यात कुठेही दिसत नाहीत.''

असे आश्चर्य लेखिका व्यक्त करते. ''लग्नाच्या बाजारातील कोंडी केतकरांना न जाणवण्याचे कारण ते जन्माने पुरुष होते असेच म्हणावे लागते,'' असे स्पष्ट भाष्य लेखिका करते. ''पुढे जाता येत नाही, मागेही नाही'' या शब्दात लेखिका एकंदर स्त्रियांची सुकाणू नसलेल्या नौकेप्रमाणे असणारी स्थिती व्यक्त करते.

'शिक्षित स्त्रियांचे अविवाहित्व' हा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. अविवाहित मुलीचे अस्तित्व जाणवले तरी त्या प्रश्नात लेखक खोल शिरू शकले नाहीत. त्यांच्या (स्त्रियांच्या) समस्या लेखकांना उमगल्या नाहीत. म्हणून बोलल्या नाहीत. परंतु लेखिकांनी ही समस्या पूर्णपणे जाणून घेतली. मालतीबाई बेडेकर यांच्या 'कळ्यांचे निःश्वास'मधील अकरा पैकी दहा कथांच्या नायिका अविवाहित आहेत. प्रौढ कुमारिकांचा अनेक प्रकारचा त्रास गीता साने यांनी चित्रित केला आहे. कुठेही तत्त्वज्ञानाचा मुलामा न देता प्रांजल चित्रण केले आहे. ''गीताबाईंच्या नायिका स्वतःच्या सगळ्या मोहांची कबुली देतात,'' असे लेखिका सांगते. लेखिकांनी केलेल्या चित्रणातून अविवाहित स्त्रीचा दुहेरी संघर्ष व्यक्त होतो.

नैसर्गिक कामवासनेचा, प्रेमाचा कोंडमारा करणारा आंतरिक संघर्ष आणि भोवतालच्या समाजाचा बाह्य संघर्ष. 'पुरुषाचा शरीरधर्म' म्हणून क्षम्य होते, पण स्त्रीला मात्र शासन, दुटप्पी




नीतीमूल्यांनी स्त्री दुबळी होते. परिणामी समाजापासून बचाव करण्यासाठी विवाह हा रखरखीत व्यवहार मुलींना दिसतो. 'म्हणूनच कळ्यांचे निःश्वास'मधील कळ्या मूकपणे निःश्वास टाकतात. यामागे असणारी कारणे लेखिका शोधते. त्यातून काळानुरूप स्त्रीवरील दडपणांचे स्वरूप व्यक्त होते.

१९७५ नंतर येणारा अभिव्यक्तीतील मोकळेपणा १९३०च्या टप्प्यावरील स्वयंप्रेरित लेखिकांमध्ये नसावा. यातूनच संक्रमणकाळातील 'मध्यलटपटीत' अशी स्थितीगतीच व्यक्त होते. जुने पूर्णपणे सोडवत नाही. नवे पूर्ण पचवत नाही. अशी अवस्था म्हणजे संक्रमणकाळातील धूसरताच म्हणता येते. पण याच वातावरणात चार शलाका चमकताना दिसतात. म्हणूनच त्यांचा निर्देश लेखिका 'स्त्री स्वातंत्र्यवादिनी' असा करते. काळाचेच वास्तव आणि त्याच वेळी एका वेगळ्या जडणघडणीचे स्वरूप कसे आकार घेते याचे प्रारूपच या स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाला म्हणता येते. मोटे, बेडेकर, साने या लेखिकांनी लेखनाची सुरुवात कथा, कादंबरी लेखनाने केली. परंतु उत्तर टप्प्यावर या तिघी लेखिका संशोधनपर लेखनाकडे वळल्या. त्यांना स्त्री जीवनातील जी शल्ये बोचत होती, त्याची कारणे शोधण्यासाठी संशोधनाकडे वळल्या. मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करणाऱ्या या लेखिकांनी त्यापलीकडे जाणारे संशोधन केले. मालतीबाईंनी 'काळाची चाहूल' घेत 'घराला मुकलेल्या स्त्रियांच्या' जीवनाचा वेध घेतला. गीता साने 'भारतीय स्त्रीजीवना'कडे वळल्या. कृष्णाबाईंनी 'काळाची पाऊले' तपासत नव्या काळातील नव्या स्त्री प्रश्नांचा, बदलत्या वास्तवाचा वेध घेतला. तर


**गीता साने**

शकुंतला परांजपे यांनी चाकोरीबाहेरील त्या काळाच्या दृष्टीने क्रांतिकारक असे 'संतती नियमनाचे' कार्य केले.

चौघींच्या संशोधनपर लेखनाचा लेखिकेने मातृत्व, अर्थार्जनाचा प्रश्न, कर्तृत्ववान स्त्री, धर्माधिष्ठित परंपरा, विज्ञानयुगाचा प्रभाव, आवश्यक समाजाची पुनर्रचना या मुद्यांच्या आधारे एकत्रित स्वरूपात केला आहे. संक्रमण काळातील वैचारिक मंथन, सामाजिक परिवर्तन, त्यातून जात असताना घडणारे स्त्रीचे व्यक्तिमत्त्व, जीवन याचे वास्तव चित्रच साकार होते.

मातृत्वाविषयीचे परखड, स्पष्ट निष्कर्ष लेखिकांनी मांडले आहेत. विशिष्ट शरीररचनेमुळे मातृत्व ही स्त्री जीवनातील अपरिहार्यता आहे, असे मत मालतीबाई मांडतात.

गीताबाईंना आईपदाचा जास्त गौरव व्यर्थ वाटतो. एक जबाबदार आई होण्यासाठी स्त्रियांनी जननप्रक्रियेचे ज्ञान करून घ्यावे. मातृत्वाचे उदात्तीकरण न करता स्त्रीला न्याय मिळेल असे बदल करावेत, अशी सूचना गीताताई देतात. 'मातृत्व' ही केवळ स्त्रीची जबाबदारी नसून समाजाचीही आहे'' असे कृष्णाबाई सांगतात. स्त्रिया भावी पिढी तयार करतात. तेव्हा त्यांची बाळंतपणाची रजा ओझे वाटता कामा नये. मानवी जीवनाचे सातत्य मातृत्वाशी निगडित आहे. त्यासाठी निकोप समाजाचे अस्तित्व कृष्णाबाईंना महत्त्वाचे वाटते.

अर्थार्जन/नोकरी: लेखिकांना अर्थार्जन ही व्यक्तिस्वातंत्र्याची महत्त्वाची पायरी वाटते. पण ते स्वातंत्र्य मिळेल असे नाही. त्यासाठी रूढ व्यवस्था बदलण्याची आवश्यकता कृष्णाबाई स्पष्ट करतात. त्यामुळे परिवर्तनाची वाट बिकट होते. त्यासाठीच्या उपायांचा विचारही कृष्णाबाईंनी केला. कमावत्या स्त्रीकडे बघण्याची समाजाची वृत्ती उदार होणे; सरकार कार्यक्षम होणे कृष्णाबाईंना महत्त्वाचे वाटते. तर गीताताईना मूल्यव्यवस्था बदलणे गरजेचे वाटते. ''पारंपरिक संस्कार बघता आणि

धर्माधिष्ठित परंपरा स्त्रीच्या कर्तृत्वाला खीळ घालतात.'' असे स्पष्ट मत गीता साने व्यक्त करतात.

'कर्तृत्व आणि स्त्री' या नवीन विषयाचाही सखोल विचार केला आहे. पारंपरिक मूल्ये कायम ठेवून 'कर्तृत्व' नवे मूल्य स्त्री जीवनाला लागू केल्याने नवीन ताण निर्माण झाले असल्याचे नमूद करून, त्याची कारणे व परिणाम मालतीबाई व गीताताईंनी स्पष्ट केली आहेत. पुरुषांना स्त्रिया स्पर्धक वाटतात. पतीचे प्रेम, पाठिंबा नसेल तर स्त्रिया एकट्या पडतात. स्त्रीदाक्षिण्य असले तरी त्या स्त्रिया आहेत; हे पुरुषांना विसरता येत नाही. पाठीमागे अनुकूल बोलत नाहीत. रूप, बुद्धी व स्त्रीत्व या गोष्टी एकत्र आल्या तरच स्त्रियांकडे आस्थेने, स्त्रीदाक्षिण्याने पाहिले जाते असे निरीक्षण त्या नोंदवतात. ''माझ्या वेळा सांभाळून तू काय ते कर'' असे पतीचे मत असेल आणि मूल, नवरा यांची नीट सोय लावता आली नाही तर स्त्रीचे कामात लक्ष लागत नाही असे वास्तव गीताताई सांगतात. धर्माधिष्ठित परंपरा आणि त्यानुसार मूल्यव्यवस्था हा सामाजिक दृष्टिकोन बदलण्याच्या मार्गातील मोठा अडथळा वाटतोच. यामधील दुटप्पी भूमिका मालतीबाई स्पष्ट करतात. एकीकडे कामचेष्टा करणारी म्हणून वर्णन, तर दुसरीकडे माता झाली की गौरव होतो. हिंदु धर्मातील दोषांची चर्चा करून दुटप्पी भूमिकेचे होणारे परिणाम स्पष्ट करतात

मूल्यव्यवस्था बदलली की सांस्कृतिक निर्बंध आपोआप गळून पडतील'' असा निष्कर्ष गीताताई काढतात.

आधुनिक विज्ञानाची चाहूल लागली होती. विज्ञानाचा प्रभाव प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मानवी जीवनावर, पर्यायाने कुटुंब जीवनावर होत होता, याची दखलही लेखिकांनी घेतली होती. आधुनिक विज्ञान, विज्ञानाचे प्रयोग व्यवहारात आले तर मानवी जीवन, स्त्रीपुरुष नाते व कुटुंबावर परिणाम होण्याची शक्यता लेखिकांना वाटते. व्यक्तिस्वातंत्र्य जोपासणाऱ्या कुटुंबव्यवस्थेचा शोध चालू आहे. या नवीन वैचारिक लाटेचीही दखल लेखिकांनी घेतली आहे. व्यक्ती, समाज आणि संस्कृती या तीनही दृष्टीने कुटुंब व्यवस्था महत्त्वाची आहे. मानवी मनाची गरज आहे. कुटुंब व्यवस्थेचे उच्चाटन होण्यापेक्षा त्याचे स्वरूप बदलणे लेखिकांना महत्त्वाचे वाटते. 'घर' महत्त्वाचे. पण घरातील अन्यायानेच स्त्रिया घराला मुकतात. 'घर' सुधारण्याचा विचार मालतीबाई मांडतात. ('घराला मुकलेल्या स्त्रिया' हे पुस्तकच मालतीबाईंनी लिहिले आहे.) कुटुंब व्यवस्था बदलण्याची आवश्यकता गीता साने मांडतात. ही स्त्रियांच्या बौद्धिक, मानसिक विकासाची साक्षच लेखिकेला वाटते. संधिकाळ ओलांडत असतानाच्या स्थितीतील प्रगल्भ स्त्रीची जडणघडणच सिद्ध करणारी ही चौकडी मानता येते. कुटुंबव्यवस्थेला पर्याय शोधण्याऐवजी स्त्रियांच्या कौटुंबिक दास्याचे पाश सैल करीत जाणे, सोपे नसले तरी कष्टसाध्य आहे. त्यातूनच स्त्रीस्वातंत्र्य मिळवता येईल.'' गीता साने यांच्या विचारांचा आज प्रत्यय येत आहे. स्त्रियांची सर्वांगीण प्रगती आणि विवाहसंस्थेचे अद्याप असलेले अस्तित्व या दोन्ही गोष्टी आज आहेत. काही सूचनाही या लेखिकांनी केल्या आहेत.

स्त्रियांसाठी पाळणाघराची गरज ओळखून कृष्णाबाई स्वतः पाळणाघर चालवित होत्या. स्त्रियांच्या विकासासाठी, समाजाची पुनर्रचना मालतीबाईंना आवश्यक वाटते. १९९०-९१ मध्ये या संदर्भात विचार सुरू झाला. 'मुलांचा सांभाळ'सारखे लेख प्रसिद्ध होऊ लागले. त्या लेखांची उदाहरणे देऊन लेखिकेने हे विचार या लेखिकांनी किती वर्षांपूर्वी सुचवले होते, त्यांचे दूरदर्शित्व लेखिका सांगते.

या तिघींच्या संशोधनपर लेखनाच्या संदर्भात लेखिका महत्त्वाचे निरीक्षण नोंदवते. या तिघी समकालीन होत्या. एकमेकींशी परिचय होता, पण फार संपर्क नव्हता. परंतु त्यांचे स्त्रीविषयक ललित आणि संशोधनपर लेखन समान निष्कर्षावर पोचते. एकमेकींच्या विधानांना पूरक स्पष्टीकरणे मिळतात. स्त्री प्रश्नांबाबतची लेखिकांच्या जाणिवांची विश्वासार्हता बळकट होते.

व्यक्ती, साहित्य, समाज आणि संस्कृतीच्या परस्पर धाग्यांतून, मेळातून घडून येणाऱ्या माणसांच्या कालसंगत घडणीचे उदाहरण म्हणूनही याकडे बघता येते.

चारही लेखिकांच्या मुलाखतींतून त्यांच्याशी लेखिकेने प्रत्यक्ष भेट घडवली आहे. व्यक्तिगत माहितीबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विकासप्रक्रिया उलगडते. मालतीबाई बेडेकर, कृष्णाबाई मोटे दोघी सख्ख्या बहिणी होत्या. वडील खरे मास्तर घोडनदीला चित्रकला शिक्षक होते. शिक्षणाचे महत्त्व पटल्याने मुलींना शिक्षण देण्याचा निश्चय त्यांनी केला होता. मुलींना म. कर्वे यांच्या संस्थेत खरे मास्तरांनी शिक्षणासाठी पाठवले. हा दोघींच्या भावी विकासाच्या दृष्टीने 'परिवर्तन बिंदू' (टर्निंग

पॉइंट) ठरला. तत्कालीन स्त्री जीवनाच्या वास्तवाच्या सावलीत, कर्वे संस्थेच्या संस्कारात दोघी बहिणी मोठ्या झाल्याने त्यांच्या जीवनाची, विचारांची, कार्याची दिशाच जणू ठरली.

दोघींनी प्रथम कन्याशाळेत नोकरी केली. कृष्णाबाई नंतर सामाजिक कार्याकडे वळल्या.


प्रथम 'नायगाव सर्व्हिस सेंटर'मध्ये आणि नंतर स्त्रियांसाठी सोशल वेलफेअर ऑफिसर म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले. गिरणी कामगार स्त्रियांसाठी पाळणाघर चालवले. लेखन सातत्याने चालू होतेच. वेगळ्या वाटेने जीवन जगण्यातूनच स्वतंत्र विचार, धारणा, स्वतंत्र कार्य करणाऱ्या कृष्णाबाई मोटे घडल्याचा प्रत्यय मुलाखतीतून येतो.



स्त्री व स्त्री जीवन मालतीबाईंच्या विचारांच्या केंद्रस्थानी आले. 'कळ्यांचे नि:श्वास'मधील कथांचे लेखन त्यांनी फक्त पंधरा दिवसांत केले.

स्त्री मातृत्वात गुंतल्याने तिचं मन हळूवार बनलं. त्यानेच पुरुषप्रधान संस्कृती टिकली. मूठभर स्त्रिया सोडल्यास बहुतेक स्त्रिया बंधनात. त्यामुळे स्त्रीजीवनात मूलभूत फरक नाही. त्यामुळे आजच्या स्त्रीच्या जीवनमार्गाबद्दल तितकेच समाधान नाही. यासारखे मालतीबाईंचे स्त्रीविषयक विचार मुलाखतीतून व्यक्त झाले आहेत.

शकुंतला परांजपे यांचे स्वतंत्र, आत्मनिर्भर व्यक्तिमत्त्व होते. विचारात व कृतीमध्येही ठामपणा होता. पूर्ण विचार करूनच त्यांनी र. धो. कर्वे यांच्याबरोबर संततिनियमनाचे कार्य केले. त्यांची मार्मिक, प्रामाणिक वृत्ती लेखनातून व्यक्त होते. विरोध, टीका यांना बुद्धिवादाने


## *दशक अतर्क्य घटनांचे...*

मानवी जीवन म्हणजे महाभारतसदृश घटनांचा पट आहे. नियती नावाची शक्ती उलटसुलट घटनांचे चक्र फिरवीत असते. म्हणूनच मनुष्य हा नियतीशरण आहे आणि शरीरशरणही आहे. मनाच्या शक्ती पणाला लावून अध्यात्माच्या सोबतीने नियतीच्या एका अतर्क्य खेळाला सामोरे जाणारे आत्मानुभव....

***दशक अतर्क्य घटनांचे...***

नियतीला सामोरे गेलेले प्रामाणिक आणि सत्य अनुभव असले तरी हा हारजितीचा खेळ नाही आणि नियतीवर मात करण्याचा मानसही नाही. आहे तो प्राप्त परिस्थितीचा समंजस स्वीकार, स्वच्छ आणि साध्या शब्दांत बांधलेला...

लेखिका : माधुरी वैद्य

download Storytel from playstore and search for 'Dashak Atarkya Ghatananche' to listen OR click on below link https://www.storytel.com/in/

स्वीकारणारी वृत्ती, तसेच काळाच्या पडद्यावरचे अपवादात्मक 'सेल्फमेड' व्यक्तिमत्त्व कसे होते; याचा परिचय मुलाखतीतून होतो.

वडिलांकडून मिळणारे प्रोत्साहन, मिळालेली शिक्षणाची संधी, लेखनाची प्रक्रिया याविषयी बोलण्यातून गीता साने यांचे व्यक्तिमत्त्व उलगडत जाते. वडिलांनी पूर्णपणे स्वातंत्र्य दिल्याने त्यांचे स्वावलंबी व्यक्तिमत्त्व विकसित झाले. 'जे दिसलं, पटलं, ज्या विषयावर लिहावेसे वाटले त्या विषयावर लेखन केले. भोवतालच्या समाजातून, स्त्रियांच्या जीवनातून लेखनाची प्रेरणा मिळाल्याने बंड करणाऱ्या स्त्रिया आपल्या लेखनात नाहीत असेही त्या सांगतात.

''पटत नसेल तर एकमेकांना सोडून देणे इष्ट. पटेनासे झाले की फक्त स्त्रीलाच त्रास होतो असे नाही. पुरुषालाही होतो. दोघांनी एकमेकांशी बोलून सोडचिठ्ठी देण्याचे ठरवावे.'' असा काळाच्या पुढचा विचारही गीताताई व्यक्त करतात. धनबाद येथे पती माईन इंजिनिअर होते. तिथले जीवन बघताना सामाजिक कार्याची ओढ त्यांच्या मनात निर्माण झाली. गीताताईंनी वेलफेअर ॲडव्हायझरी कमिटीवर ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून दीर्घकाळ काम केले. 'भारतीय स्त्रीजीवन', 'चंबळच्या दस्युभूमीत'सारखी वेगळ्या विषयावरची पुस्तके आत्मप्रेरणेने त्यांनी लिहिली. मध्यमवर्ग आठ टक्के, बाकीच्या वर्गात परिवर्तन झाल्याशिवाय संपूर्ण चित्र बदलणार नाही. मध्यम वर्गातलं स्वातंत्र्य हे खरे स्वातंत्र्य नव्हे; हेच त्यांचे विचार मुलाखतीतून व्यक्त होतात.

या चारही स्त्रियांच्या लेखनाविषयी, लेखनाच्या वेगळेपणाविषयी लेखिका महत्त्वाचे विचार व्यक्त करते-



मालतीबाई बेडेकर

''पुरुष बौद्धिक पातळीवर जगणारे असतात आणि स्त्रिया स्वप्नाळू, हळव्या, भावोत्कट असतात. या पारंपरिक गृहीत कल्पनेलाच तडा गेलेला दिसतो.'' संक्रमण काळातील या चारी शलाकांच्या व्यक्तिमत्त्व आणि लेखनाविषयी असे म्हणावेसे वाटते की, या लेखिका सुधारक विचार आपल्या जीवनातून पारंपरिक कल्पनांना विरोध करून स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा सन्मान, अस्तित्वच सिद्ध करीत होत्या. चित्रपट, आकाशवाणी ही माध्यमे पारंपरिक प्रतिमेचाच गौरव करीत होती. संक्रमणकाळ असल्याने समाजात स्त्रीच्या जडणघडणीचा पारंपरिक प्रवाहच मध्यवर्ती ठिकाणी होता. परंतु त्याच्याकडे जागृत स्त्रियांच्या नवविचारांची, घडणीची धारा अल्प प्रमाणात का होईना, पुढे सरकत होती. त्याचे प्रतिनिधित्व या चार लेखिका करतात.

स्थित्यंतराच्या काळात नवविचारांचा प्रवाह नेहमीच मर्यादित असतो. काळाबरोबर समाजस्तरांतून नवविचारांचे झिरपणे होते. समाज जीवनाच्या, सांस्कृतिक जीवनाच्या पृष्ठभागावर शिक्षण, जीवन विस्तार, नोकरी यातून बदलते जीवनक्षेत्र यातून स्त्रीमनाची नवी घडण कशी आकार घेत होती. नवतेचे रुजणे कसे घडून येत होते, याची प्रक्रियाच या चारही लेखिकांचे व्यक्तिमत्त्व, विचार व साहित्यातून सिद्ध होते. प्रत्यक्ष वातावरणातून झेप घेऊन स्वत:ची जडणघडण सिद्ध करणारी उर्मी स्त्रियांमध्ये कशी निर्माण होत होती. याचा प्रत्यक्ष नमुना- 'प्रतिमा'च म्हणता येते. 'प्रत्यक्षाहुनी प्रतिमा उत्कट' असेच वर्णन करावेसे वाटते. हाच वसा स्वातंत्र्योत्तर काळातील पिढीत पुढे सरकताना दिसतो का? हे बघणेच महत्त्वाचे ठरते.

**डॉ. स्वाती कर्वे**
5th avenue, **ब्लॉक नं. ३०३,**
**शेठ उत्तमचंद गांधी मार्ग,**
**सिटी प्राईड, कोथरूडजवळ,**
**कोथरुड, पुणे ३८**

**स्त्रीस्वातंत्र्यवादिनी**
**(विसाव्या शतकातील परिवर्तन)**
**विनया खडपेकर**
**पॉप्युलर प्रकाशन: मुंबई:**
**आ: २:२००५**

# कृष्ण पडला गोंधळात

**सुभाष अबूज**

**संध्याकाळ होण्याच्या आधीपासूनच महा-दहीहंडी बघण्यासाठी नागरिकांनी गर्दी करणे सुरू केले. हळूहळू सगळे रथी-महारथी तिथे पोचले. दहीहंडी फोडण्याचे प्रयत्न सुरू झाले झाडांवर बसलेली पोरं लोणी, दुधाचा मारा त्यांच्यावर करत होते. पाच-सहा-सात थर केल्यानंतर बहुतेक मानवी मनोरे कोसळत होते. मग एका चमूने दहा थर करण्यात यश मिळवले. पण हंडीपर्यंत कुणी पोचू शकले नाही. आता टाळ्यांच्या अखंड कडकडाटात कृष्णाचा चमू प्रांगणात उतरला. लोकांनी खेळ नीट दिसावा म्हणून चांगली जागा मिळवण्यासाठी प्रयत्न चालू केले. त्यामुळे कोलाहल अजूनच वाढला.**



द्वारकानगरी आज खूप सजली होती. जिकडेतिकडे रंगबिरंगी पताका-तोरणं लागली होती, निरनिराळ्या प्रकारचे छोटेमोठे ध्वज फडकत होते आणि ठिकठिकाणी ढोल-ताशे आणि बासरी या वाद्यांच्या साथीनी गायन आणि नृत्य उत्स्फूर्तपणे सुरू होते. आदल्या रात्री शहरभर नेत्रसुखद रोषणाई केली गेली होती. आज या नगरीचा सर्वात मोठा आणि अख्खं नगर उत्साहाने सामील होत असणारा दहीहंडीचा सोहळा होता.

झुगझुगते उंचउंच मानवी मनोरे उभे करून दहीहंडी फोडण्याचे कार्यक्रम सकाळपासूनच सुरू झाले होते. प्रथम लहान मुलांचे खेळ

जागोजागी झाल्यानंतर आता युवकांची पाळी होती. चौकाचौकात गोपांच्या टोळ्या दहीहंड्या फोडत होते आणि नागरिक तो थरार अनुभवत होते. पण तरी प्रत्येक व्यक्ती संध्याकाळी होणार असलेल्या महा-दहीहंडीची मोठ्या आतुरतेने वाट बघत होती.

श्रीकृष्णाच्या इच्छेप्रमाणे आणि त्याच्या नेतृत्वाखाली, सगळा यादव समाज गोकुळ-वृंदावन सोडून द्वारकेला आला त्या वर्षापासूनच दरवर्षी हा दहीहंडी सोहळा प्रचंड उत्साहाने आणि मोठ्या थाटामाटात साजरा करण्याची प्रथा पडली होती. मुख्य सोहळा सूर्यास्ताच्या थोड्या आधी सुरू होई. कृष्ण आणि बलराम यांचे भव्य, पाच-मजली वाडे समोरासमोर होते. त्यांच्यामधील विस्तीर्ण पटांगणावर हा समारोह होत असे. दोन्ही वाड्यांच्या सर्वोच्च शिखरांना एक दोर घट्ट बांधण्यात येई. त्या दोराच्या मधोमध नगरातील सर्वोच्च दहीहंडी लटकवण्यात येई. त्या जागेजवळच काही ऊंच झाडे होती. मात्र ती दहीहंडीइतकी ऊंच नव्हती. त्यावर मुलंमुली चढून बसायचे आणि तिथून दही, दूध, लोणी आणि पाण्याचा वर्षाव, दहीहंडीसाठी मानवी मनोरे बनवणाऱ्या गोपांवर करायचे.

त्या दहीहंडीत दही, लोणी तर असायचंच पण त्याशिवाय तिच्यात शिगोशीग भरल्या असायच्या सोन्याच्या मोहरा, हिरे आणि माणकं. नगरातली मोठीमोठी प्रतिष्ठित मंडळी ती फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या गोपांच्या टोळ्यांमध्ये असायची. पण कृष्णाचा चमूच दरवर्षी ती फोडण्यात यशस्वी होत असे. कृष्णाच्या चमूत पेंदया, बलराम, प्रद्युम्न, आणि सात्यकी असे मोठेमोठे म्होरके होते. कृष्ण स्वतः सगळ्यात वरच्या थरावर चढून दहीहंडी फोडत असे. ही दहीहंडी फोडायला बारा मानवी थर लागत आणि कृष्णाच्या चमूव्यतिरिक्त इतर कुणालाच हे आव्हान आतापावेतो झेपलं नव्हतं. दहीहंडीतला प्रसाद सगळ्यांना वाटला जाई आणि मोहरा, हिरे आणि माणकं विकून मिळणाऱ्या द्रव्याचा उपयोग द्वारकेतील एकाकी वृद्धांच्या सेवाशुश्रूषेसाठी केला जाई.

संध्याकाळ होण्याच्या आधीपासूनच महा-दहीहंडी बघण्यासाठी नागरिकांनी गर्दी करणे सुरू केले. हळूहळू सगळे रथी-महारथी तिथे पोचले. दहीहंडी फोडण्याचे प्रयत्न सुरू झाले झाडांवर बसलेली पोरं लोणी, दुधाचा मारा त्यांच्यावर करत होते. पाच-सहा-सात थर केल्यानंतर बहुतेक मानवी मनोरे कोसळत होते. मग एका चमूने दहा थर करण्यात यश मिळवले. पण हंडीपर्यंत कुणी पोचू शकले नाही. आता टाळ्यांच्या अखंड कडकडाटात कृष्णाचा चमू प्रांगणात उतरला. लोकांनी खेळ नीट दिसावा म्हणून चांगली जागा मिळवण्यासाठी प्रयत्न चालू केले. त्यामुळे कोलाहल अजूनच वाढला.

कृष्णाच्या चमूनी मनोरा उभारणं सुरू केलं. पेंदया अर्थातच सगळ्यात खालच्या थरात उभं राहून पाया मजबूत करण्यात भरपूर योगदान देत होता. त्वरेनी पण काळजीपूर्वक एकेक थरानी मानवी मनोरा वर चढत होता. मध्येच कुणीतरी थोडंसं घसरत होतं, इतर मंडळी त्याला सावरत होती. प्रेक्षकांची उत्सुकता सतत वाढत होती. नेहमीप्रमाणे कृष्ण थोड्याच वेळात बाराव्या थरावर चढून हंडी फोडणार याबद्दल कुणाच्याही मनात संशय नव्हता.

आता मनोऱ्याचा अकरावा थर उभारला गेला आणि होऊ शकतो तेवढा स्थिरस्थावर झाला. कृष्ण तयार होताच. त्याने हंडीला प्रणाम केला आणि नेहमीच्या अदम्य आत्मविश्वासानी चढण्यास प्रारंभ केला.झाडांवरील पोरंसुद्धा तयार होतीच. त्यांनी दहयालोण्याचा तुफान मारा त्याच्यावर केलाा. कृष्णाचं अंगभूत कौशल्य लगेचच सगळ्यांना दिसून आलं. सराईतासारखा तो झपाझप पाच थर चढून गेला. त्याच्या चढण्यात सहजता आणि चापल्य होतं. आज काही वेगळं आहे असं त्याला मुळीच वाटत नव्हतं.

मात्र सहाव्या थरावर कृष्णाचा पाय अचानक घसरला. तो धडपडला. इतरांनी त्याला हात दिला, पाचव्या थरावरच्या बलरामानी त्याला सावरलं. आजवर असं कधी घडलं नव्हतं. कृष्ण विचारात पडला: हे अघटित घडलंच कसं?

कृष्ण आता म्हातारपणाकडे झुकला होता. कितीही नाही म्हटलं तरी शरीर काहीसं सुस्तावलं होतं. लठ्ठपणा जाणवू लागला होता, स्नायू शिथिल झाले होते. अजूनही तरुण असलेलं सावध मन चटकन काम करत होतं. पण शरीर किंचित मागे पडत होतं. तरुणाईमधली ती तडफ आता थोडीशी का होईना पण उतरणीला लागली होती.

या क्षणापर्यंत कृष्णाची पूर्ण खात्री होती की आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत तो नेहमीसारखा आणि नेहमीइतका यशस्वी कृष्णच राहणार आहे. आत्ता त्या विश्वासाला तडा गेला. आयुष्यात प्रथमच अस्वस्थ आशंकेने त्याच्या मनात शिरकाव केला. आपलं अवघं आयुष्य एका क्षणात त्याच्या नजरेसमोर तरळून गेलं. गोकुळ, वृंदावन, लढलेल्या आणि जिंकलेल्या असंख्य लढाया, कौरव-पांडव युद्ध, गीता, कुठल्याही परिस्थितीवर मात करण्यासाठी सतत योजलेल्या नवनवीन युक्त्या. आणि आता

हे जीवनाच्या संध्याकाळचं द्वारकेतील वास्तव्य. त्याला आठवले बालवयापासूनचे असंख्य वाद आणि अगणित कलह. विविध विचार पद्धती आणि कृतींमधले झगडे. प्रत्येक प्रसंगी त्यांनी आपलं म्हणणंच खरं, योग्य आणि चांगलं असल्याचा आग्रह धरला होता. आपली बुद्धिमत्ता, बळ आणि धूर्तता या त्रयीच्या जोरावर आपली इच्छा म्हणजे समाजाकरता कायदा हे समीकरण त्याने निर्विवादपणे प्रस्थापित केले होते.

आज दहीहंडीच्या सहाव्या थरावर त्याचा पाय घसरला होता. या क्षणी त्याला आठवला पेंदया, त्याचा बाळपणापासूनचा मित्र. आठवणीसोबतच आलं हसू. पेंदया कुठूनही मित्रांच्या टोळक्यापाशी पोचतो आहे असं दिसताच कोणीतरी मोठ्याने ओरडे, महाराज पेंदयांचं आगमन होत आहे. ते ऐकताच सगळे मित्र मोठमोठयाने खिदळू लागत. आपल्या कुणाला हसू आवरतच नसे. सुरुवातीला पेंदया थोडा नाराज होई. पण काही दिवसातच त्यानेही कोणीतरी असे ओरडले की स्वतःच हसणे सुरू केले. त्यानंतर महाराज पेंदया बसले आहेत, पसरले आहेत, उभे आहेत, हसत आहेत, असे ओरडून हसण्याच्या फैरी झडणं सुरू राही. पेंदयाची अशी टर उडवण्याची मूळ कल्पना संपूर्णपणे आपलीच होती. शिवाशिवी खेळामध्ये पेंदयावर राज्य असताना -- राज्य बहुतेक वेळ पेंदयावरच असे --पोरं त्याला मागून थपडा मारून हसत खिदळत पळून जात. कुठल्याही झाडावर पाचसहा हात सरसर वर चढलं की पेंदया त्यांच्यापर्यंत पोचू शकत नसे. मागून थपडा मारून पळणाऱ्या मुलांना पटकन वळून पकडणंसुद्धा त्याला जमत नसे. पेंदयाला असं सतत छळत राहणे हा आपल्या सगळ्या मित्रांचा आवडता उद्योग होता. अशा आणि इतर अनेक प्रकारे गलेलठ्ठ पेंदयाची चेष्टा आपण वर्षानुवर्ष, तो मोठा झाल्यानंतरसुद्धा, करत आलो. आपणच त्यामध्ये पुढाकार घेतला. पेंदयाने मात्र आपल्याला दिली अखंड आणि संपूर्ण साथ. तो सतत आपल्या मागे उभा होता. आजही तो या मानवी मनोऱ्याचा पाया मजबूत करण्याचं काम करतो आहे. कृष्णाला एक क्षणभर आपण हे काय करून बसलो, असं पुसटसं वाटून गेलं. पण झटकन त्यानं पेंदयाचा विचार मनातून काढून टाकला आणि तो सहावा थर चढून गेला.

आता त्याचे लक्ष्य होता सातवा थर. कृष्णानी तो चढणं सुरू केलं. आणि तो पुन्हा धडपडला. पुन्हा इतरांनी त्याला सावरलं. कृष्णानी शरीर तर पटकन सावरलं पण मनानी उभारी घेणं त्याला थोडं अवघड गेलं. आता त्याला आठवली राधा. तिचं आपल्यावर निरतिशय प्रेम होतं. आपलंही तिच्यावर. तिचं लग्न झालं राया गोपाशी. आपल्यावर प्रेम असल्यामुळे लग्नानंतरही ती आपल्याला भेटायला येत राहिली. रायाला ते पसंत नव्हतं. त्याच्या बहिणी सतत राधेवर पाळत ठेऊन असायच्या. राधा लपूनछपून आपल्याला भेटायला निघाली की बहिणी रायाला जाऊन सांगायच्या. राया तिला शोधत यायचा. सगळ्या यादव समाजाला राधेचं असं वागणं मान्य नव्हतं. ती केव्हाही, कुठेही निघाली की सगळ्यांच्या तीक्ष्ण नजरा तिला भाजून काढायच्या. राधेचे ते दिवस अशा नजरांपासून नजर चुकवण्यात जात होते. तिच्या मनाची घुसमट सतत सुरू होती. आपण करतोय ते योग्य नव्हे हे तिलाही ठाऊक होतं, पण तिचं आपल्यावरील प्रेम तिला समाजमान्य मार्गानी जाऊ देत नव्हतं. हे सगळं कळूनसुद्धा आपण तिला कुठल्याही प्रकारे थोडी तरी मदत होईल अशा रीतीने कधीच वागलो नाही. ती एक परस्त्री झाली होती. तिला त्या नात्याच्या मर्यादा पाळणं, आपल्या धर्माप्रमाणे वागणं आवश्यक होतं. पण आपण त्या गोष्टींकडे दुर्लक्षच केलं. आपण राधेवर आपलं प्रेम आहे असं म्हणतो पण आपण तिचा विचार कधीतरी केला का, असा प्रश्न कृष्णाला पडला. आणि तो भानावर आला. आपल्याला आज होते आहे तरी काय, असा प्रश्न पुन्हा एकदा त्याच्या मनात आला. पण त्यावर विचार करण्यात वेळ न घालवता त्यानं पुढचा थर चढून जाण्यावर मन एकाग्र केलं आणि तो सातवा थर चढून गेला.

आता कृष्ण आठवा थर चढण्यास सज्ज झाला. सातव्या थरावरच्या सगळ्या गोपांनी इतक्या वर्षात प्रथमच त्याला सांगितलं, जरा जपून. काळजी घे. कृष्णाने हसून मान डोलावली. पण आज त्याचं काही खरं दिसत नव्हतं. तो घसरलाच. इतरांनी त्याला हात दिला, त्याला तोल सावरायला मदत केली. कृष्ण गोंधळात पडला. हे होतं आहे तरी काय? अचानक त्याला आठवला कर्ण. महाभारत युद्धात कर्णाच्या अर्जुनाच्या-तोडीस-तोड तिरंदाजी कौशल्यामुळे पांडव संकटात सापडू नयेत म्हणून कर्णानी कौरवांकडून लढू नये, असा प्रयत्न आपण केला होता. कर्ण कुंतीचा मुलगा आहे हे आपणास अगदी प्रथमपासूनच ठाऊक होते. पण ती माहिती कर्णाला द्यावी असा विचार इतकी वर्षं आपण केला नव्हता. मात्र पांडवांवर संकट येऊ शकेल अशी शक्यता दिसताच आपण कर्णाकडे गेलो. तो बधला नाही, पण अर्जुन सोडून इतर भावांना मी युद्धात मारणार

नाही एवढं वचन मात्र त्यानं दिले. तेही काही कमी नव्हतं.पण आपण त्याची बाजू ऐकून घेण्याची तयारीसुद्धा कधी दाखवली नाही, हे कृष्णाच्या आता ध्यानात आलं.

त्याला आठवलं,पांडवांशी होऊ घातलेल्या युद्धामध्ये आपली मदत मागायला दुर्योधन आला होता. थोड्या वेळानी अर्जुन आला. आपली तेव्हा वामकुक्षी सुरू होती. दुर्योधन आपल्या उशापाशी उभा राहिला, अर्जुन पायाशी. जाग येताच आपल्याला दिसला अर्जुन आणि मग दुर्योधन. आपण सांगितलं, मी एकीकडे असेन, संपूर्ण यादव सेना दुसरीकडे. आणि मी युद्धात हाती शस्त्र घेणार नाही. अर्जुन म्हणाला, हे कृष्णा, मला तू आमच्या बाजूने हवास. दुर्योधनाला हायसे वाटले. त्याला हवी होती प्रचंड सेना. एकटा कृष्ण करणार काय? आणि आता तर तो म्हणतोय, मी शस्त्रसुद्धा हाती घेणार नाही. मग काय उपयोग त्याचा? आपण मात्र दुर्योधनाला काही सांगण्याचा विचारसुद्धा केला नाही. तू चूक करतो आहेस, असं त्याला समजावून सांगायचं का टाळलं आपण? सांगितलं असतं तरी दुर्योधनाला ते पटलं असतं,असं नाहीच. पण म्हणून आपण सांगणं टाळायला नको होतं.शिशुपालाला आपण शंभर वेळा संधी दिली. दुर्योधनाला एकतरी देणं योग्य ठरलं असतं ना.आपण एक बाजू आपली म्हटल्यानंतर दुसऱ्या बाजूचा वस्तूनिष्ठ विचारसुद्धा कधी करू शकलो नाही की काय?

कृष्णाला अजून एक प्रसंग आठवला. महाभारत युद्ध सुरू झालं होतं. एका सकाळीसकाळी दुर्योधनाला माता गांधारीचा निरोप आला, जन्मताना होता त्या अवस्थेत येऊन भेट. ही गोष्ट आपणास कळली. तिचा गर्भितार्थसुद्धा ध्यानात आला. आपण ताबडतोब दुर्योधनाला गाठलं. तो साहजिकच आपणास टाळू बघत होता. आपण त्याला सांगितलं, अरे, आपल्या मातेलाच भेटायला जात असलास तरी काय झालं? तू मोठा राजा आहेस. काही नाही तर निदान फुलांचे हे कटीवस्त्र तरी घालून जा. त्याने ते मान्य केले आणि आपला हेतू साध्य झाला. पण ही मायलेकांमधली बाब होती. अतिशय व्यक्तिगत बाब. तिचं पावित्र्य आपण राखायला हवं होतं. कृष्ण भानावर आला. काहीतरी निश्चितच बिघडलेलं आहे, असं त्याच्या मनात आलं. पण आता त्याला सवड नव्हती. तो आठवा थर चढून गेला.

नवव्या थरावर आपण घसरणार का, हा प्रश्न आणि त्यापेक्षा जास्त भीती त्याला जाणवली. आठव्या थरावरच्या मंडळींपैकी कुणीच त्याच्याशी एक अक्षरही बोलले नाही. पण त्यांना काय म्हणायचे आहे हे त्यांच्या चर्येवरून कृष्णाला कळत होतं. त्यानं नववा थर चढणं सुरू केलं. आयुष्यात कधी केलं नव्हतं एवढं एकाग्र केलं त्यानं आपलं मन आणि मगच उचललं पाऊल. पण घसरायचं ते तो घसरलाच. सहकाऱ्यांनी त्याला सावरलं. सगळे प्रश्नार्थक मुद्रेनी त्याच्याकडे बघत होते. त्याच्या मनात मात्र वेगळीच काहीतरी चक्रं फिरायला लागली होती. त्याला आठवलं, महाभारताचं युद्ध सुरू व्हायची वेळ होती आणि हातावर हात ठेवून अर्जुन बसला होता. मग त्याला युद्धाकरता तयार करण्यासाठी त्यानं गीता सांगितली होती. आत्मा अमर आहे, शरीर मर्त्य आहे. माणसाने निष्काम कर्म करत राहावे, त्याच्या फळाची अपेक्षा ठेवू नये. आपल्या वासना आणि इच्छांवर नियंत्रण ठेवावे, कर्तव्य करत राहावे, ज्ञानाची कास धरावी, वगैरे वगैरे. आणि मीच सगळ्या जगाचा उद्गाता आहे, सगळं विश्व माझ्यातून निर्माण होतं आणि माझ्यातच विलीन होतं; म्हणून तू माझं ऐक. त्याला आता वाटलं, हे काय सांगितलं आपण अर्जुनाला. असंही कर आणि तसंही. हेही नको करू आणि तेही. हाही तुझा धर्म आहे आणि तोही. मला शरण जा. मी तुला तुझ्या पापापासून मुक्त करीन आणि तुला मोक्ष मिळवून देईन. कर्ताकरविता अर्जुन आहे की मी? मी जर सगळं ठरविणार असलो तर मग कुठलीही मानवी व्यक्ती भलंबुरं कसं ठरवणार? आणि प्रत्यक्षात काय करणार? आपण काय करून बसलो ते लक्षात येऊन कृष्णाला धक्काच बसला.

आयुष्याच्या सुरुवातीपासून कोणत्याच प्रश्नाबाबतीत कुठल्याच प्रकारचा संभ्रम त्याला कधी पडला नव्हता. सगळे गुंते, सगळे प्रश्न सोडवताना त्याला कधीच कुठलीही अडचण आली नव्हती. आपली सगळी उत्तरं ही सगळ्यांकरता,सगळ्यात बरोबर, सगळ्यात चांगली आणि न्याय्यसुद्धा असणार हे त्यानं शंभर टक्के गृहीत धरलं होतं. त्याबद्दल त्याला कधीसुद्धा थोडीशीही शंका आली नव्हती. आपल्या शक्ती आणि युक्तीच्या बळावर त्याने आयुष्यभर जनमतावर हुकमत गाजवली होती. त्याच्या निर्णयाला तर सोडाच, पण त्याच्या मतालासुद्धा कोणी हरकतही घेणार नाही अशी परिस्थिति त्याने निर्माण केली होती.

आज दहीहंडीच्या नवव्या थरावरून घसरल्यानंतर इतक्या वर्षात प्रथमच कृष्णापुढे प्रश्न उभा राहिला, आपण करत आलो ते योग्य होतं का? त्याला आठवला पेंदया. त्याला धक्का बसला. आपल्या आनंदासाठी आपण त्याच्याशी जसं वागलो त्याचं त्याला कुठल्याही प्रकारे समर्थन करता येईना. आपण असं वागूच कसं

शकलो, असा त्याला प्रश्न पडला. पेंदयाची माफी मागावी असं त्याला वाटलं. पण त्यामुळे आपण त्याच्या आयुष्याची जी अनेक वर्षं नासवली आहेत ती थोडीच भरून येणार? आपण त्याच्या मनाला सतत चिघळत राहणारी जखम केली आहे, ती कशी बरी होणार?

मग त्याला आठवली राधा. कृष्णाला आपलं तोंड आपल्यापासूनच लपवावसं वाटलं. एका सन्मान्य विवाहित स्त्रीचा एवढा मोठा अपमान आपण करूच कसं शकलो! आपली बुद्धी आणि सारासार विचारशक्ती कुठे गेली होती? कृष्णाला राधेबद्दल विचारही करणं अशक्य झालं. त्यानं आपलं मन बंद केलं आणि नववा थर चढण्यावर लक्ष केंद्रित केलं. त्यानं एक पाऊल वर टाकलं. त्याला वाटलं आपण घसरणारच. पण तसं काही घडलं नाही. कृष्ण नववाच नव्हे तर दहावा आणि अकरावा थरही सहजीच चढून गेला. तो स्वतःच चकित झाला. त्याच्या सहकाऱ्यांनी सुटकेचा श्वास घेतला. आजचा प्रसंग तर निभावला, अशीच प्रत्येकाची प्रामाणिक भावना होती.

आता फक्त सरळ उभ राहायचं, दहीहंडी पकडायची आणि फोडायची. कृष्णानी उभं राहायला सुरुवात केली. अकराव्या थरावरच्या सात्यकी आणि प्रद्युम्न यांनी त्याचे पाय आपल्या हातांनी घट्ट धरून ठेवले. कृष्ण उभा राहिला. त्यानं दहीहंडीला पकडण्यासाठी एक हात ऊंच केला. त्याचा हात दहीहंडीला लागला. बरोब्बर त्याक्षणी तो घसरला. त्याने स्वतःला सावरण्यासाठी धडपड केली. सात्यकी आणि प्रद्युम्न यांनी त्याला धरून ठेवण्याचा प्रयत्न केला. कृष्णाचा एक हात दहीहंडी ज्या दोराला लटकवली होती त्या दोराला लागला. त्याने तो दोर पकडण्याचा प्रयत्न केला. पण ते त्याला जमलं नाही. तो कोसळला. सात्यकी आणि प्रद्युम्न यांनी त्याला धरण्यासाठी झटक्यानी हात त्याच्या दिशेनी लांबवले. पण त्या घाईत कृष्णाला धरण्याऐवजी त्यांनी त्याला धक्काच दिला. कृष्ण मानवी मनोऱ्याच्या थोडं बाहेर ढकलला जाऊन उलटा होऊन खाली कोसळू लागला. त्याच वेळी तो मनोराही कोसळला.

कृष्ण झपाट्यानं खाली येत होता. पण त्याच्या विचारांचा गुंता त्यापेक्षाही खूप जास्त वेगाने वाढत होता. पेंदया, राधा, कर्ण, दुर्योधन, पांडव, आपलं अवघं आयुष्य याबद्दलच्या विचारांच्या वाढत्या गुंत्यात कृष्ण पूर्णपणे गुरफटून गेला. त्या गुंत्याचं वरचं टोक दहीहंडी बांधली होती त्या दोराशी जुळलं होतं. पाचवा थर होता तिथपर्यंत कृष्ण वेगानं खाली कोसळत आला आणि तिथं आपल्याच विचारांच्या गुंत्यात उलटा लोंबकळत राह्यला.

द्वारकेचे नागरिक म्हणतात की आजही कधीतरी तो कुणालातरी सागरकिनाऱ्यावर तशाच लोंबकळत्या अवस्थेत दिसतो. खरंखोटं श्रीकृष्णच जाणे.


**सुभाष अबूज**


**फ्लॅट नं. ७०५, टॉवर ४**

**फॉरेस्ट ट्रेल्स,**

**भूगाव, पुणे ४११०२३**



**३६ वर्षांची परंपरा असलेल्या, मीना इनामदार यांच्या 'अप्रतिम'ला जरूर भेट द्या... ३००० ते ३०००० किमतीच्या साड्यांचा खजिना**



**अप्रतिम साडी**

**१ विजय अपार्टमेंट,**
**चाय कट्टा समोर,**
**मयूर कॉलनी,**
**कोथरूड, पुणे ३८**
**मो. ९८२२४५३०४१**




**मी सव्वीस वर्ष एका राष्ट्रीयीकृत बँकेत काम केलं. अतिशय श्रीमंत करणारे अनेक अनुभव त्या कालखंडात मिळाले. त्यावेळच्या काही आठवणी ....**

## डॉ. विनिता आपटे

**२०**०५ सालचा जून महिना. त्यादिवशी जबरदस्त पाऊस पडत होता. दोन दिवसांनी मुंबई मध्ये बँकेची बोर्ड मीटिंग होती त्यामुळे आमच्या मजल्यावर खूपच धावपळ सुरू होती. म्हणजे नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे आजचा दिवस नुसते कागद शोधण्यात जाणार याची मनोमन खात्री पटवून मी आणि आनंद मोडक आमच्या महत्त्वाच्या कामाकडे वळलो. आम्हाला 'आनंदयात्रा' या कार्यक्रमाच्या DVD तयार करायच्या होत्या. जुलै महिन्यात अमेरिकेला होणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संमेलनात बँकेचा बूथ होता त्यात या DVD तिथल्या आमच्या ग्राहकांना देता याव्यात म्हणून त्या वेळेत पूर्ण होणं गरजेचं होतं. रेकॉर्डिंग हातात होतंच. आनंदने एडिटिंग पण पूर्ण केलं होतं. तरी त्यावरचं artwork, त्यासाठीची approvals ,बूथचं design अशा अनेक गोष्टी अत्यंत हळूहळू पुढे जात होत्या. ते दोन दिवस जामच गडबडीचे गेले. बोर्ड मीटिंग झाल्यावर मुंबईहून परतायला जवळपास पहाट उजाडली. या दिवसांमध्ये मुख्यालयातल्या कामाचा आवाका समजत होता. एरवी मीटिंग्ज कंटाळवाण्या वाटत असल्या तरी त्यासाठी कशी तयारी करायला लागते याचं शिक्षण मिळत होतं. ऑफिस सुरू व्हायची वेळ नक्की असे पण संपेल कधी ते सांगता यायचं नाही. मुंबईहून परत आल्यावर ऑफिसला निघण्याच्या गडबडीत साहेबाचा फक्त मेसेज पहिला होता, काही महत्वाच्या कामाला जात असल्यामुळे थोडा उशिरा येतो आहे. मनात म्हटलं चला पहिला चहा तरी पुढच्या कामाचं नियोजन करत घेता येईल. असं मनात येईपर्यंत एकेक फोन यायला सुरुवात झाली. मी कशीबशी गाडी पार्क करून माझं टेबल गाठलं. आनंद आणि शेखर कामाचा ढीग समोर घेऊन बसले होते. मी त्यांना मला ज्या गोष्टी पाहिजे होत्या त्या विचारल्या व आलेल्या फोन कॉल्सना उत्तर द्यायला सुरवात केली. बराच वेळ मी फोनवरच बोलत होते. मधल्या काळात तापीकर साहेब येऊन परत धावत पळत कुठेतरी जाताना दिसले म्हणून आम्ही सांकेतिक खुणा करून काहीतरी पेटलेलं दिसतंय असं म्हणून परत हातातलं काम सुरू ठेवलं. दोन पाच मिनिटं गेली असतील, फोनवर बोलताना माझं लक्ष बाहेर गेलं तर साहेब तिथूनच मला खूण करून बोलवत होते. फोनवर मी काही महत्त्वाच्या गोष्टी बोलत होते त्यामुळे मीही खुणेनेच त्यांना येते म्हणाले पण ते हट्टाला पेटल्यासारखे तिकडे उभे राहूनच लवकर या लवकर या असं म्हणत होते. मी कसाबसा फोन ठेवला व धावत दारात गेले तर ते माझ्या पुढे चालताना दिसले. फक्त एवढंच म्हणाले गाडी काढा. माझ्या गाडीची किल्ली तेव्हा मी साडीलाच छल्ल्या सारखी अडकवलेली असायची त्यामुळे व त्यांच्या चेहऱ्यावरून काहीतरी गंभीर असावं असा विचार करून धावतच खाली गेले व गाडी काढून त्यांच्या जवळ नेऊन थांबवली. साहेब गाडीत बसले, जितक्या वेगात मी गाडी

काढली तशीच पुढे नेत विचारलं कुठे जायचंय, त्यावर त्यांनी उत्तर दिले ‘मला हार्ट अटॅक येतोय, संचेती मध्ये जाऊ. मी तोपर्यंत संचेतीपर्यंत पोचलेच होते पण हार्ट पेशंटला तिथे नेण्यात काहीच अर्थ नव्हता. एकतर त्यांना हार्ट अटॅक येतोय या शब्दांनी मलाच घाम फुटला होता, रुबी हॉस्पिटल जवळ होतं पण तिथल्या चक्रव्यूहातून त्यांना इमर्जन्सी वॉर्डपर्यंत कसं न्यायचं म्हणून म्हटलं प्रयाग मध्ये जाऊ. गाडी संचेती पासून मॉडर्न कॅफे च्या चौकापर्यंत आणली तोपर्यंत त्यांनी जोरात ओरडून मान टाकली. आता मात्र प्रयागपर्यंतसुद्धा पोचू की नाही असं वाटायला लागलं. माझ्या डोक्यात एकदम सूर्या हॉस्पिटल किणकिणलं पण तिथे जायचं तर वन वे मुळे डावीकडे वळू शकणं अशक्य होतं. मी कसलाही विचार न करता पूर्ण उलट्या दिशेने गाडी गर्दीत घातली. समोरून येणाऱ्या वाहनांनी जवळपास मला शिव्यांची लाखोली घातली असेल पण पुढच्या तिसऱ्या मिनिटाला मी गाडी सूर्या हॉस्पिटलच्या दारात लावली होती, तिथल्या गार्डला ओरडून व्हील चेअर आणायला सांगून पेशंटला त्यावर बसवलं व मी गाडी पार्क करून धावतच इमर्जन्सी वॉर्ड गाठला. तिथल्या लोकांनी भराभरा मला सूचना दिल्या त्यात प्रामुख्याने दहा हजार रुपये भरा, त्यापूर्वी एक फॉर्मवर सही करायला सांगितली त्यावर त्यांना ट्रीटमेंट देताना काही गडबड झाली तर जबाबदारी पेशंटच्या नातेवाईकांची असते असं सांगणारा तो फॉर्म होता. मी फक्त तिथल्या लोकांना सांगितलं की मी त्यांच्या घरी कॉन्टॅक्ट करते आहे पण त्यांच्या



घरच्यांचा फोन busy लागतोय. ते येईपर्यंत सहीसाठी थांबायला लागेल. तोपर्यंत तुम्ही ट्रीटमेन्ट सुरु करा. पैशांची व्यवस्था मी करते. मी बँकेत फोन करून आनंद किंवा शेखर कोणी फोनवर मिळतंय का बघत होते तेवढ्यात परत एक निरोप की कन्सेन्ट फॉर्मवर सही केल्याशिवाय कुठलीही ट्रीटमेंट सुरू करता येणार नाही. इकडे कुठलेच फोन लागत नसल्यामुळे मला काय करावं सुचत नव्हतं. शेवटी देवाचं नाव घेतलं आणि थरथरत्या हातानी फॉर्मवर सही केली.

त्यांच्या घरचा फोन अजूनही लागला नव्हता पण सुदैवाने त्यांचे बंधू जवळच होते व त्यांचा फोन लागला त्यामुळे घरच्या कोणालातरी निरोप तरी मिळाला होता. नंतर आनंद, शेखर व बाकी ऑफिसमधल्या लोकांना कळवेपर्यंत त्यांची ट्रीटमेंट सुरू होऊन औषधाला प्रतिसाद मिळतो आहे असा निरोप घेऊन वॉर्ड मधील डॉक्टर आले. ऑफिस मधूनही सगळे लोक आले, पैसे भरण्याची व्यवस्था झाली. एक मोठं संकट टळलं होतं. त्यादिवशी भारतातल्या ज्या ज्या शाखेत आमच्या ओळखीची लोकं होती त्यांनी मला फोन करून खूप कौतुक केलं. मला काही त्यात फारसं कौतुक वाटलं नाही. कारण मनातून मला माहिती होतं की त्या दिवशी देव पाठीशी होता नाहीतर जर काही वाईट घडलं असतं तर या कौतुक करणाऱ्या लोकांनीच माझ्याबद्दल त्यांना आवडणारे डायलॉग म्हणायला सुरुवात केली असती. कशाला असली रिस्क घ्यायची, सरळ ॲम्ब्युलन्स नी न्यायचं, पण आगाऊपणा कोण करेल इत्यादी इत्यादी . त्यांच्या बायकोनी तर माझ्यावर केससुद्धा केली असती पण या सगळ्याच प्रकारातून केवळ देव पाठीशी होता म्हणून ते वाचले व मला उगीचच ‘मी वाचवलं’ असा किताब मिळाला.



या नंतरचे दिवस खूपच गडबडीचे होते. जसजशी अधिवेशनाची तारीख जवळ येत होती तसतसे काम पूर्ण करण्याचे टेन्शन वाढत होते. त्यात तापीकर आजारी व रजेवर त्यामुळे प्रत्येक गोष्टीच्या approval साठी फारच यातायात होत होती.

तरीही रेकॉर्डटाईममध्ये काम पूर्ण करून DVD, बाकीचे बॅनर्स, brochure अशा सगळ्या गोष्टी ठरल्या वेळी कार्गोमध्ये रवाना झाल्या. अमेरिकेतल्या संमेलनात खूप लोक भेटले. महाराष्ट्राचे तेव्हाचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी आमच्या बूथचे उदघाटन केले होते. आता VDO कॉन्फरन्सिंग सर्रास होते पण त्या वेळी VDO कॉन्फरन्सिंग करून बँकेचे अध्यक्ष श्री. सुकोमल बसू व मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी संवाद केला. त्या संमेलनात तिथल्या बऱ्याच लोकांची खाती तिथूनच



उघडून घेतली. जवळपास बाराशे लोकं आमच्या बूथला भेट देऊन गेले. त्यांच्या विशेष मुलाखतीही आम्ही रेकॉर्ड केल्या होत्या. मध्यंतरी कधीतरी रशियाला जायचा योग आला होता. त्यावेळी तिथे राहणाऱ्या एका मराठी (तेही आपटेच ) कुटुंबाला भेटायला गेले. त्या वेळी त्यांनी मुद्दाम 'आनंदयात्रा' लावून माझं स्वागत केलं होतं. जवळपास पंधरा वर्षांनी ती DVD मी हातात घेतली, आनंदच्या आठवणींनी डोळ्यांच्या कडा ओलावल्या पण केलेल्या कामाचं कौतुक करणारे मराठी लोक परदेशात आहेत हे बघून मनातून खूपखूप आनंद झाला.

**डॉ.विनिता आपटे**

**७, हेमदत्ता अपार्टमेंट,**

**३८ मृत्यूंजय कॉलनी,**

**कोथरूड, पुणे ४११०३८**

## शोध मराठी शब्दांचा

विपुलश्रीच्या रजतवर्षानिमित्त आपण एक नवीन उपक्रम सुरू केला आहे. दर महिन्याला आम्ही पाच इंग्रजी शब्द इथे देणार आहोत. त्याला यथार्थ योग्य मराठी शब्द आपल्याला शोधायचाय. कदाचित त्याला मराठी शब्द अस्तित्वात असेल पण वापर केला नसल्यामुळे विस्मरणात गेला असेल. किंवा कदाचित त्याला मराठी शब्द नसेलच. तो जसाच्या तसा इंग्रजी शब्द आपल्या वापरात आला असेल. तर अशा इंग्रजी शब्दांना आपल्याला मराठी शब्द शोधायचाय किंवा निर्माण करायचाय.

**मागील महिन्याच्या शब्दांना वाचकांकडून आलेले पर्याय**

| | |
|---|---|
| बॉक्स ऑफिस | तिकिटघर, चित्रपटगृह, चित्रपटगृहातील गल्ला/कमाई |
| टीझर | चित्रश्रावक, चित्राची जाहिरात, झलक |
| स्टेथास्कोप | परिश्रावक, स्पंदकानळी, वैद्यकीय तपासक, वक्षवेध |
| स्टिरिओटाईप | रटाळ, सामान्यकृत मानसिक चित्रण, चाकोरी, रुळलेला मार्ग, तेच तेच |
| स्टेज फियर | रंगमंच धास्ती, मंचभय |

**या महिन्याचे शब्द आहेत,**

डेस्क

साईट

इव्हन

लिंक

पेनड्राइव्ह

सापडलेले शब्द ९८९०६०७४४० या नंबरवर पाठवायचे आहेत.

**संपादक**

# स्पर्धक

श्रेया ताम्हनकर



**दा**दरला 'फाइव गार्डन्स' भागात राहणारी वीणा आपल्या संसारात समाधानी होती. दोन मुलं, नवरा आणि सत्तरीची सासू हे तिचं कुटुंब. तिचं लग्न फार लवकर झालं असं म्हणता येणार नाही. पण बी. कॉम. झाल्यानंतर तीन वर्षांनी म्हणजे वयाच्या चोवीसाव्या वर्षी तिच्या अंगाला हळद लागली. नवरा अमोल कुठल्याशा कंपनीत मॅनेजर होता. त्यावेळी म्हणजे शहाऐंशी साली चांगला चार आकडी पगार होता त्याला. सुंदर, गुणी वीणाला पाहता क्षणी अमोलच्या घरच्यांनी पसंत केलं व लगेचच त्या दोघांचं लग्नही झालं.

वीणाला दोन मुलं. मोठा मुलगा अवनीश लग्नानंतर दोन वर्षात झाला. पण धाकटी मुलगी अनन्या मात्र अवनीशच्या पाठीवर दहा वर्षांनी झाली. तीही अवनीशने आपल्या मित्रांची भावंडं पाहून नवव्या वर्षी 'मलाही धाकटा भाऊ पाहिजे म्हणजे पाहिजे' असा हट्ट धरला म्हणून. त्यालाही इतर मुलांविरुद्ध स्वत:ची टीम हवी होती ना. त्याला हवा होता भाऊ, पण झाली बहीण. 'या बहिणीऐवजी भाऊ मिळेल का?'' यासाठी गुपचूप प्रयत्न त्याने देवाकडे करून पाहिले, पण ते व्यर्थ गेले हे काही वेगळं सांगायला नको.

त्यालाही आता बारा वर्षं उलटून गेली होती.

आईबाबा आणि आजी सतत मुलांच्या लाडाकोडात गुंतलेले असत. मुलंही हुशार होती. अवनीश इंजिनिअरिंग करत होता. अनन्या दादरच्या जे. बी. वाच्छा शाळेत सहावीला होती. शाळा जवळच होती. या वर्षापासून ती आपापली शाळेत जात होती व घरी येत होती. हे सगळं तिच्याच हट्टाखातर सुरू होतं. तिच्या मते आता ती मोठी झाली होती आणि एकटी जाऊ येऊ शकत होती. तरी वीणा तिला अर्धा रस्ता सोडायला जायची. रस्ता क्रॉस करून द्यायची. त्यानंतर अनन्या पुढे जायची.

अनन्या अभ्यासात हुशार, खेळातही हुशार, सगळ्यात भाग घ्यायची. सगळ्या शिक्षकांची लाडकी अशी शाळेतली एकमेव मुलगी होती ती. वर्गात तिचा नेहमी पहिला नंबर असायचा. वीणाला आपल्या मुलीचा फार अभिमान होता.

जशी सातवीला गेली तसं तिने आईला सांगितलं की घरापासून शाळेत ती एकटी जाणार आणि येणार. आईने अगदी जिन्यातसुद्धा यायचं नाही सोडायला. यावरून घरात थोडी बाचाबाची झाली खरी, पण बाबांनी मध्ये पडून लेकीची ही अट मान्य करवून घेतली. वीणा थोडी हिरमुसली झाली. तिचा मुलगा आधीच मोठा झाला होता. आता मुलगीही मोठी होत होती.

सगळं सुरळीत सुरू होतं. शाळा सुरू होऊन दोन महिने झाले. या वर्षी वाढलेला अभ्यास, त्यात स्कॉलरशिपची परीक्षा असणार होती. नेहमीप्रमाणे मुलांचा अभ्यास वीणाच घेत होती. युनिट टेस्ट झाल्या. ज्या दिवशी युनिट टेस्टचे मार्क्स समजले, त्या दिवशी अनन्या रागारागातच घरी आली. एकंदर तिचा नूर पाहून कदाचित कमी मार्क्स पडले असतील असं वीणाला वाटलं. पण सगळ्या विषयात पैकीच्या पैकी मार्क्स तर होते. मग काय झालं असं तिचं?

''पिलू, अगं काय झालं?'' ती आल्यापासून वीणा तिच्या मागेमागे होती.

''काही नाही. मला कुणाशीच बोलायचं नाहीये.''

''बरं, बोलू नकोस, तुला भूक लागलीय का? खायला काय करू? गोडगोड शिरा?''

''नको, मला काहीसुद्धा नकोय आणि आज जेवायलासुद्धा नकोय.''

इतका वेळ सुरू असलेला आरडाओरडा ऐकून आजी बाहेर आली. मागूनच वीणाला खुणावलं आणि तिथून जायला सांगितलं.

ही आपल्यापाशी काही बोलणार नाही हे वीणाच्या लक्षात आलं व भाजीचं निमित्त करून ती घराबाहेर पडली. आता ती तासाभरानेच परतणार होती.

''अनू, इकडे ये. माझ्याजवळ ये. शहाणं माझं बाळ ते.'' आजीने अनन्याला कुशीत घेतलं. ''हे बघ, आता घरात कुणीच नाही. तू मला आपलं सिक्रेट सांग बरं. मी सांगते ना तुला माझं सिक्रेट? आता तुझी टर्न. तू मला नाही का सांगणार?''

आता अनन्याचा धीर सुटला आणि ती आजीला मिठी मारून रडू लागली.

''ती साची काय समजते स्वत:ला!''

'साची!' हे नाव अनन्याच्या तोंडून पहिल्यांदाच येत होतं. या नावाची कुणी मुलगी अनन्याच्या वर्गातही नव्हती आणि तिची कुणी मैत्रीणही नव्हती.

''आता ही साची कोण?''

''अगं, असं काय करतेस! ती साची नाही का नवीन आलीये शाळेत!''

''असं होय. नवीन आलीये का ती मुलगी! बरं, मग काय केलं तिने?''

''अगं, काय केलं काय? तिलासुद्धा सगळ्या विषयात पैकीच्या पैकी मार्क्स मिळालेत आणि सगळ्या टीचर्सनी आम्हा दोघींना एकत्र उभं करून कौतुक केलं.''

''मग त्यात तुला चिडायला काय झालं एवढं?''

''पण आजी, त्या टीचर्सची फेव्हरेट मीच आहे ना! मला नाही आवडत ती साची. सगळ्या टीचर्स 'साची साची' करतात. मला विचारतच नाहीत आणि माझ्या फ्रेन्ड्स आता तिच्या फ्रेंड्स झाल्यात.''

थोड्या वेळाने वीणा भाजी घेऊन परतली. आजीकडून सगळी हकीकत तिला समजली. बाकी कहाणी तिने अनन्याकडून गोडीगुलाबीने काढून घेतली.

साचीचे आईबाबा दोघेही सर्जन होते आणि ते सगळे नुकतेच अमेरिकेहून परतले होते. पहिल्या दिवशी साचीची आई शाळेत येऊन सगळ्या टीचर्सना भेटून गेली होती.

'अनन्या हुशार आहे म्हणून साचीला तिच्या बाजूला बसवलं असेल. ती मुलगी नवीन असल्यामुळे टीचर्स कदाचित तिच्याकडे जास्त लक्ष देत असतील.' वीणाच्या मनात आलं.

साची आपल्यापेक्षा वरचढ आहे हे अनन्याच्या लक्षात हळूहळू येत होतं. आता रिझल्टनंतर तिची खात्री झाली होती.

अजून तीन महिने गेले. सहामाही परीक्षा झाली. रिझल्ट लागले. त्यातही दोघींना सारखेच मार्क्स.

आपल्या मुलीला असं अस्वस्थ पाहून वीणाला वाईट वाटत होतं. अनन्या नर्सरीपासून या शाळेत होती. तेव्हापासून ती पहिलीच यायची. तिच्यापेक्षा हुशार कुणीच नाही, अशी तिची इमेज होती. अशा वेळी ही कोण साची, कुठून आली, अनन्याच्या अस्तित्वाला धोकाच होती ती जणू. नेमकी हिच्या बाजूलाच बसतेय म्हटल्यावर दुर्लक्ष करायचं तरी कसं? टीचरना जाऊन सांगावं तरी कसं की माझ्या मुलीला असा असा त्रास होतोय. तिला दुसरीकडे बसवा, तिचे इतके लाड करत जाऊ नका आणि जमल्यास तिला एखादा मार्क कमीच द्या!

वीणाला आपले शाळेतले दिवस आठवू लागले. तीसुद्धा शाळेत अशीच होती. लांबसडक केस, दिसायला सुंदर, अभ्यासात हुशार, नेहमी पहिला नंबर पटकावणारी आणि आवाजही गोड, अगदी कोकिळेचा गळा. शाळेतल्या एकूण एक शिक्षकांची लाडकी अशी ती एकमेव मुलगी होती. तिच्याच मागोमाग होती हर्षाली. वीणाचा पहिला नंबर आणि हर्षालीचा दुसरा; फक्त एकदोन मार्कांचा फरक असायचा. हर्षालीला ते अंतर कधीच पार करता आलं नव्हतं. वीणाला आठवून हसू आलं.

खरंतर वीणा आणि हर्षाली एकाच सोसायटीमध्ये शेजारच्या बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या. असं असलं तरी दोघी कधीच एकत्र खेळत नव्हत्या. कुरळ्या केसांची हर्षाली दिसायला काही वाईट नव्हती. पण वीणासारखी सुंदरही नव्हती; वीणाला खूप मैत्रिणी होत्या. वर्गातल्या पन्नास मुलींपैकी अठ्ठेचाळीस मुली तिच्याच मैत्रिणी. हर्षाली आपल्यापेक्षा एकदोन मार्कांनीच मागे असते हे तिला चांगलं ठाऊक होतं. तिने हे अंतर पार करू नये अशी वीणाची मनोमन इच्छा असायची. दोघींची स्पर्धा होती की नाही हे त्या दोघींनाच ठाऊक. पण वीणाच्या मैत्रिणींना मात्र हर्षाली अजिबात आवडत नव्हती. त्या तसं वीणाकडे बोलूनही दाखवायच्या, म्हणायच्या,

''काय तिचे केस, काय तिचे दात, कशी दिसते! वर सगळीकडे पुढे पुढे असते, अगदी तुझ्या बरोबरीने. आणि दुसरा नंबर कसा काय मिळतो तिला!''

आपल्या मैत्रिणी हर्षालीची चेष्टा करतात हेही वीणाला आवडायचं. ती त्यात भाग घ्यायची नाही, पण त्याविरुद्ध काही बोलायचीही नाही. शाळेत क्लास रिप्रेझेंटेटिव्हसाठी हर्षाली उभी राहिली तर तिच्याविरुद्ध वीणाला उभं केलं. वीणाच जिंकून आली. वीणाला वाटलं की हर्षालीला वाईट वाटेल, ती रडेल, पण तसं काही झालं नव्हतं. उलट हर्षाली येऊन वीणाचं अभिनंदन करून गेली होती.

वीणा समोर आली की हर्षाली नेहमी हसायची, शाळेत जातायेता भेट झाली की सोबत करायची. पण वीणाला नेहमी तिच्या मैत्रिणी मागून येऊन गाठायच्या आणि एकाच सोसायटीमध्ये राहूनसुद्धा हर्षालीच्या वाट्याला वीणा कधीच आली नव्हती.

कधीतरी हर्षालीच्या घरासमोरून जाताना पेटीचे सूर ऐकू आले की वीणाला वाटायचं, हर्षाली आपल्यासारखं गाणं शिकायचा प्रयत्न करतेय. एका सुट्टीत हर्षालीला सायकल शिकताना वीणाने पाहिलं. तिला धडपडताना पाहून खरं तर तिला हसू येत होतं. दहावीच्या मोठ्या सुट्टीत हर्षाली मोपेड चालवायला शिकली. वीणाला वाटलं, 'काय करणार आहे मोपेड शिकून!'

दहावीचा रिझल्ट लागला.

वीणा कॉमर्सला गेली. तिला नंतर कळलं की हर्षालीने सायन्स घेतलं.

सायन्सपेक्षा कॉमर्स बरं, नाही का? पण तरी आपली स्पर्धा अजून सुरूच आहे, बरं का, हर्षाली! वीणाच्या मनात यायचं.

वीणा कॉमर्स ग्रॅज्युएट झाली. काही काळ एका ऑफिसमध्ये नोकरी केली.

## *लेखकांसाठी आवाहन*

विपुलश्रीच्या मासिक अंकासाठी कथा, ललित लेख, वैचारिक लेख अशा स्वरूपाचे लेखन जरूर पाठवावे. लेखन सुवाच्य अक्षरात कागदाच्या एका बाजूला पुरेसा समास सोडून लिहिलेले असावे. आपला पूर्ण पत्ता, फोन नं. लेखाच्या शेवटी लिहिलेला असावा. स्वीकृत लेखाविषयी दीड ते दोन महिन्यात पत्रव्यवहार केला जाईल. दोन महिन्यात उत्तर न आल्यास अस्वीकृत समजावे.

**लेखन पाठवण्याचा पत्ता – श्रीवत्स प्रकाशन, ६७, विपुल, शैलेश सोसायटी, कर्वेनगर, पुणे ४११०५२**

नंतर तिचं लग्न जमलं. त्या दरम्यान हर्षाली कुठे होती हे तिला नीटसं माहीत नव्हतं आणि माहिती काढण्यात इंटरेस्टही नव्हता. पण तिच्या आधी आपलं लग्न होतंय हे तिला कळवायला हवं म्हणून तिने तिला शोधून लग्नाचं आमंत्रण दिलं. हर्षाली लग्नाला आली होती. वीणाने तिला बोलून दाखवलंच, 'बघ, माझं लग्नही पहिलं झालं.'

त्यावर नेहमीप्रमाणे हसून हर्षालीने तिचं अभिनंदन केलं होतं.

आता ही साची कोण कुठून आली? होती ना चांगली अमेरिकेमध्ये... मग इथे का यायचं तिने माझ्या अनुला त्रास द्यायला?

वीणाच्या मनात सारखे साचीचे विचार येत होते.

साचीला म्हणे तिची आई रोज सकाळी कारमधून शाळेत सोडते. असं असेल तर ती मिटींगला कधी का येत नाही? तेवढा वेळ नसतो म्हणे त्यांना. कधीतरी शाळेत जाऊन टीचर्सना परस्पर भेटून साचीचा अभ्यास कसा चाललाय विचारते. अधूनमधून अनुलासुद्धा भेटते. का? माझी अनु म्हणे तिच्या मुलीची एकमेव मैत्रीण आहे. घरी आली तरी साची फक्त अनुबद्दलच बोलत असते. मग आपल्या बेस्ट फ्रेंडला कुणी असं त्रास देतं का?

अनुकडून नंबर घेऊन तिने एकदा वीणाला फोनही केला होता आणि 'एकदा भेटू या' असंही म्हणाली होती.

आता तर तिला भेटायलाच हवं. पण भेटून सांगणार काय? तुझ्या मुलीला घेऊन कुठेतरी दुसरीकडे जा. असं कसं सांगणार? बघू. आधी भेटू तर खरं.

वीणाने मनाची तयारी केली.

कुठे भेटायचं? आपल्या घरी, तिच्या घरी की कुठेतरी बाहेर? आपल्या घरीच ठीक आहे. फ्लॅट नुकताच रिनोव्हेटही केलाय. अमोलच्या आवडीचं इटालियन मार्बलचं फ्लोअरिंग बघून तर ती भारावूनच जाईन. साचीलाही सोबत आणायला सांगू. तीही नजरेखालून घालेल अनुची मेडल्स, ट्रॉफीज. होऊ देत तिलाही जरा इम्प्रेस्ड आणि काय झालं ते दोघे सर्जन असले म्हणून. माझा नवराही आर्किटेक्ट आहे आणि मी माझ्या शाळेतली टॉपर! आपण का कमीपणा घ्यायचा!

वीणाने साचीच्या आईला फोन केला. मागच्या फोनकॉलमध्ये तिने आपला घरचा नंबर दिलाच होता. ती तर तयारच नव्हती घरी यायला, पण वीणाने आपल्या सासूबाईंच्या आजारपणाचं निमित्त केलं व त्यावर साचीच्या आईला काही फारसं बोलता आलं नाही.

वीणाने घर सजवलं. हॉलमध्ये आपल्या कलेक्शनमधली पेंटिंग्ज लावली, डायनिंग टेबलवर इंपोर्टेड क्रॉकरी सजवली. साची आपल्या वडिलांसोबत नेहरू प्लॅनेटोरियमला गेलीये व ती आपल्यासोबत येणार नाही असं साचीच्या आईने वीणाला कळवलं तसं वीणा मनातल्या मनात हिरमुसली.

पण ठीक आहे, साचीऐवजी तिची आई इम्प्रेस्ड होईल.

ठरल्याप्रमाणे साचीची आई वीणाच्या घरी आली. बेल वाजवली.

उगाचच फोन केला त्या दिवशी. पण करणार काय? साची इतकं बोलते अनन्याविषयी की मला राहवलंच नाही. सहज नंबर घेतला आणि आईचं कौतुक करायला फोन केला, एवढंच! ओघाओघाने आपला नंबर देणं आलंच की. मी तर टाळतच होते, पण अनन्याच्या आईने फारच आग्रह केला. ती तर लंचलाच बोलवत होती. पण ते कसंबसं टाळून हे संध्याकाळचं चहापानाचं ठरवलं. पण नेमकी साचीसुद्धा सोबत नाही. आता मी एकटीने बोलायचं काय या सगळ्यांशी?

दार उघडायची वाट पाहत साचीची आई ओशाळल्यासारखी उभी होती.

वीणाने दार उघडलं.

वीणाला समोर पाहून साचीच्या आईच्या चेहऱ्यावरचे गोंधळलेले भाव कुठच्या कुठे गेले आणि नेहमीचं हसू पसरलं. आता तर तिच्या गोबऱ्या गालांवर ते सुंदरही दिसत होतं. ती जोरात ओरडली, ''वीणा तू? अगं, तू इथे कशी?''

वीणाने अजूनही ओळखलं नव्हतं.

''अगं, ओळखलं नाहीस का मला? मी हर्षाली आणि साचीची आई. अनन्या तुझीच मुलगी ना!''

'हर्षाली' नाव ऐकताच वीणा चमकली.

''हर्षाली.. अगं हां... किती वर्षांनी! ये ये आत ये. ये बस. मी पाणी आणते.' तिला सोफ्यावर बसवून पाणी आणायला वीणा आत गेली.

हर्षाली आता कुठे निर्धास्त झाली होती.

ही हर्षाली! किती वेगळी दिसतेय! ही सर्जन आहे आणि हिचा नवरासुद्धा सर्जन! हिचे केस मात्र आहेत तसेच आहेत. पण फारच सुंदर दिसतेय आता. केवढी शिकलेली आणि मी फक्त कॉमर्स ग्रॅज्युएट. हिला कळलं तर म्हणेलच की आता मी गेलेय तुझ्या पुढे. ते काही नाही. हिला काही कळूच द्यायचे नाही आणि हिची

मुलगी साची! त्या साचीमुळे माझ्या अनुला का त्रास? एक बरं झालं. अनु आजीसोबत आत झोपलीये ते. बाहेर कुणीच नाहीये. हिच्याशी स्पष्ट बोलता तरी येईल.''

वीणा पाणी घेऊन बाहेर आली.

''हे काय हर्षाली, तू मला लग्नाला नाही बोलावलंस!''

''अगं, फारच घाईत झालं लग्न माझं.''

''का गं? का एवढ्या घाईत?''

''काही नाही गं. आम्हाला यु.एस.ला जायचं होतं. म्हणून घाईत केलं.''

''आणि एकच मुलगी का तुला? मला बघ दोन मुलं. इथेसुद्धा मीच तुझ्या पुढे.''

ते ऐकून हर्षाली पुन्हा तसंच हसली.

''का गं हसलीस?''

''काही नाही गं, असंच.''

''तू शाळेतसुद्धा असंच हसायचीस. तुला कधी वाटलं नाही का माझ्यापुढे जावं. माझ्यापेक्षा जास्त मार्क्स मिळवावेत, सगळ्यांची शिक्षकांची, मैत्रिणींची तूच लाडकी असावीस?''

''का? असं का वाटणार? आपली काय शर्यत होती का?''

''आपली? शर्यतीसारखंच होतं ना? मी पुढे, तू मागे.''

''कोण म्हणतं? हां, तुझ्या काही मैत्रिणींना वाटायचं, मी तुझ्याशी स्पर्धा करतेय म्हणून.''

''पण आपल्यामध्ये एकाच पॉइंटचा फरक असायचा ना! तुला राग नाही का यायचा माझा?''

''मला का राग येणार? माझे मार्क्स ते माझे मार्क्स. तुझे ते तुझे. त्यात मी रागावून काय होणार?''

''पण तुला माझा हेवा वाटला असेल ना? सगळ्यांना मीच आवडायचे.''

''लोकांना आवडणं का आपल्या हातात असतं, वीणा? कुणाला कोण आवडावं हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. तू जशी सगळ्यांना आवडायचीस तशी मलाही मैत्रीण म्हणून आवडायचीस. सगळ्यांना मदत करण्याचा तुझा स्वभाव, गोड गळा, अभ्यासात हुशार. अशा मुलीची मैत्रीण म्हणून मिरवायला सगळ्यांनाच आवडतं. मलाही आवडायचं.''

''बरं झालं तू हे बोललीस ते. माझ्या मनावरचा ताण कमी झाला.''

कॉफी आणि स्नॅक्स आणायच्या निमित्ताने वीणा पुन्हा आत गेली.

''मी येऊ का गं मदतीला?'' हर्षालीने बाहेरून विचारले.

त्यावर वीणाने 'नको गं, आलेच.'' उत्तर दिलं.

तिला स्वत:साठी दोन मिनिटं हवी होती.

''माझ्याशी कधी कॉम्पिटिशन नव्हतीच म्हणतेय. बरं, ते जाऊ देत. पण अनुचा विषय कसा काढू?''

वीणा कॉफीचा ट्रे घेऊन बाहेर आली.

''तुझी अनु खूपच गोड आहे गं?''

''असणारच. शेवटी मुलगी कुणाची आहे!'' वीणा म्हणाली.

हर्षालीचं पुन्हा तेच हसू उत्तरादाखल आलं, ''फार मदत करतेय ती माझ्या साचीला. यु.एस. कल्चरमधून इथे ॲडजस्ट करायला फार कठीण जात होतं. निदान शाळेची फ्रंट तरी अनुमुळे सुकर झाली.''

''पण माझ्या अनुचं काय? तुझ्या

# कै. प्रभाकर वैशंपायन पुरस्कार

**गेली काही वर्षे आम्ही संपूर्ण वर्षभरातील उत्कृष्ट सदराला पारितोषिक देत आहोत. जानेवारी ते ऑक्टोबर पर्यंतच्या मासिक अंकामध्ये जी विविलोकप्रिय सदराला कै. प्रभाकर वैशंपायन पारितोषिक देण्यात येते.**

**कै. प्रभाकर वैशंपायन हे विपुलश्री मासिकाचे पहिल्या अंकापासून साक्षेपी वाचक होते. त्यांच्या नातेवाईकांनी त्यांच्या स्मरणार्थ हे पारितोषिक देण्याचे ठरवले आहे.**

साचीमुळे तिला फार त्रास होतोय.''

''हो ना. साची म्हणे सारखी पुढे पुढे करते. सगळ्या टीचर्स आता अनुऐवजी साचीचे लाड करतात. साचीला अनुएवढेच मार्क्स मिळतात. आधी वर्गात कुणीच नव्हतं एवढे मार्क्स मिळवणारं. पण आता साची आली तर अनुला उगाच कॉम्पिटिशन वाटतेय. तू प्लीज सांग ना साचीला. जशी आपली कॉम्पिटिशन होती तशी त्यांची नाहीये.''

''एक मिनिट वीणा. आता येतंय सगळं माझ्या लक्षात. तो फोन, हे सगळं कॉफी, स्नॅक्स का चाललंय ते. आणि एक लक्षात घे. आपली कॉम्पिटिशन कधीच नव्हती. ते फक्त तुला आणि तुझ्या मैत्रिणींना वाटत होतं. मला नेहमी डॉक्टर व्हायचं होतं. माझा मार्ग वेगळा होता. तू तुझ्या मार्गाने जात होतीस. माझ्या बुद्धीनुसार मला मार्क्स पडत होते आणि ते योगायोगाने तुझ्यापेक्षा जरासे कमी असायचे. जे जर तसं नसतं तर तूसुद्धा मैत्रीण म्हणून माझा स्वीकार केला असतास. अशी उगाचच कॉम्पिटिशनच्या नावाखाली जळफळत बसली नसतीस. आणि काय, तुझं लग्न आधी झालं, तुला दोन मुलं आहेत. अगं, ते का आपल्या



हातात असतं. तुला कळत कसं नाही? आणि राहिला प्रश्न साचीचा. तर ती दिवसभर तुझ्या अनुचं कौतुकच करत असते, सांगत असते, ''अनु तिला कसं मराठी शिकवते, इतर गोष्टी कशा समजावते. मी तर इथे अनुला आणि तिच्या फॅमिलीला भेटायला आले होते. पण शेवटी ती तुझीच मुलगी ना! मला इथे माझी स्पर्धक भेटली आणि माझ्या मुलीचीही. उगाचच आले मी. निघते आता.''

(कथेतील सर्व पात्रे काल्पनिक आहेत.)

**श्रेया ताम्हनकर**
एँ४/१२, सनसिटी सोसायटी,
सनसिटी रोड, आनंदनगर,
वडगाव बुद्रुक, पुणे ४११०५१

**बँक ट्रान्सफरसाठी सारस्वत बँकेतील आमच्या खात्यामध्ये वर्गणीची रक्कम जमा करावी.**

Account Name- Shreevatsa Prakashan
Account Number - 091100100000038
Account type - current IFSC Code - SRCB0000091
Google Pay Number - 9890607440

**आपली वर्गणी जमा झाल्यावर मासिकाच्या कार्यालयात फोन करून अथवा मेसेज करून आपले पूर्ण नाव, संपूर्ण पत्ता, पिन कोड, दूरध्वनी व मोबाईल नंबर पाठवावा.**

**तसेच आपण नियतकालिकाची किती वर्षांसाठी आणि कोणत्या महिन्यापासून वर्गणी भरत आहात याचाही स्पष्ट उल्लेख करावा.**

**-संपादक**

## दिवेलागण

स्वतःसाठी आणि अप्रत्यक्षपणे इतरांसाठीसुद्धा दिवेलागण करणारी ही सामान्य माणसं मला दररोज भेटत असतात. ऐकिवात नसलेल्या दुर्मिळ आणि दुर्दम्य आजारांना, वा अकल्पित विकृत प्रसंगांना सामोरं जाताना ती प्रथम खचतात पण हळूहळू त्या दुःखाशीच त्यांचे मैत्र जुळत जाते. एक वेळ तर अशी येते की त्यांचे दुःख पाहून आपण गोठून जातो पण ती मात्र जराही असहाय नसतात. उलट तुमचेच निजी संघर्ष लढण्यास ही माणसे तुम्हाला प्रेरणा देतात. 'दिवेलागण' हे सदर अशाच सर्वसामान्य माणसांनी दाखवलेल्या दैवी धीरोदत्त वृत्तीचा जाहीरनामा आहे. यातल्या व्यक्ति व वृत्ती शंभर टक्के खऱ्या आहेत, काल्पनिक आहेत ती त्यांची नावे, स्थळं-संदर्भ आणि अपरिहार्य असणाऱ्या शब्दजोडण्या. अर्थात या सदरात आलेल्या ज्या काही वीर-वीरांगनांनी आपली नावे उघड करण्यास हरकत घेतली नाही, त्यांचा तिढा आणि लढा तर त्यांच्याच नावासकट नोंदवला आहे.

# चित्रसरस्वतीचा सुपुत्र

आशुतोष उकिडवे

ब्रिटीश राजवटीच्या गुलामी रेट्याखालीही टिकून राहिलेली, नव्हेतर बहरलेली भारतीय हस्तकला व कलासंस्कृती हा माझा चिंतनाचा, अभ्यासाचा आणि पुढे येऊ घातलेल्या आगामी पुस्तकाचाही विषय.त्या अनुषंगाने, पुस्तकासाठी एक अनुरूप पोट्रेट करून घ्यावे असा माझा फार दिवसांचा मानस होता. पण सुयोग्य चित्रकार जंग जंग पछाडूनही मिळत नव्हता. भेटलेले चित्रकार हे खरंच व्यावसयिक व सफाईदार कौशल्य असलेलेच होते. पण तरीही, मला अभिप्रेत असलेला भाव, देहबोली आणि जिवंतपणा त्यांच्या अन्य पोट्रेट्समधून दिसत नव्हता. पोर्ट्रेट म्हणजे व्यक्तिचित्र. पण ते केवळ रूपचित्र नको तर ते वृत्तीचित्र असावे, रूपासोबतच, त्यात साकळलेलं `रूपक' सुद्धा चित्रातून झळकावे असा माझा ठाम आग्रह होता.या निकषावरचा, पुणे, औरंगाबाद, नाशिक असे लांब लांबवरचे वळसे घेत चाललेला माझा अथक शोध अखेरीस थांबला कारण मुंबईतल्या, कलाकारांची पंढरीच असलेल्या आमच्या विलेपार्ल्याच्या कुशीतच, विलक्षण प्रतिभेचा एक अवलिया मला गवसला.तो कलाकार म्हणजे आदरणीय श्री. चंद्रशेखर पंत उर्फ पंतसर. साठीचा साकव ओलांडूनही घनदाट राहिलेले लांब चंदेरी केस, चेहऱ्यावरचे क्षणभरासाठीसुद्धा लुप्त न होणारे प्रसन्न हास्य आणि चष्म्याआडचे मिश्कील डोळे अशा रूपातच ते मला भेटले. ती आमची पहिली भेटही मजेशीर होती. त्यांच्या घरात शिरल्यावर समोरच लिफ्ट दिसली. मी चक्रावलो. जुन्या दोन मजली बिल्डिंगच्या तळमजल्यावर राहणाऱ्या सरांचा duplex flat असावा हे जरी मान्य केले तरी इतक्या खुज्या उंचीवरच्या पहिल्या मजल्यावर जायला चक्क अंतर्गत, खासगी लिफ्ट? शिवाय वर जायचा जिनाही कुठे दिसत नव्हता.मी लिफ्टचा बंद दरवाजा उघडण्याचा निष्फळ प्रयत्न करू लागलो, तोच लिफ्टच आतून दरवाजासारखी उघडली आणि जाणवलं की ती लिफ्ट नसून, लिफ्टचे चित्र धारण केलेला साक्षात दरवाजाच होता. पल्याड अवखळ हसत पंतसर उभे होते. मी चकित झालो. माणसं सोडाच, पण लिफ्टही खरी वाटावी असे हुबेहूब पोर्ट्रेटच

सरांनी लिफ्टचे केले होते. ती खोली म्हणजे सरांचा चित्रकक्ष होता. छोटेखानी, पण सरांनी आजवर केलेल्या विविध माध्यमातील, बहुशैलीतल्या चित्रांमुळे, नितांत सुंदर आर्ट गॅलरीची कला-ओज त्याला आली होती. सरांनी लक्षपूर्वक माझी पोर्ट्रेटसंबधीची मते ऐकली, जणू ती स्वतःत भिनवली आणि दोन महिन्यांनी तयार झालेले पोर्ट्रेट लाजवाब ठरले. कल्पना माझी, मॉडेल कुणी दुसरी. पण सरांनी मूर्तात दडलेल्या अमूर्ताचा अतिशय मोहक लावण्यपट कॅनव्हासवर उलगडला होता. मी थक्क झालो. पण तोपर्यंत सरांशी झालेल्या बऱ्याच भेटीतून अशा थक्क होण्याला मीही सरावलो होतो. कारण जीवन नावाच्या कॅनव्हासवर विधात्याने रंगवलेलेले चंद्रशेखर पंत नावाचे चित्रसुद्धा अशा अनेक सौम्य-भीषण फटकाऱ्यांतून साकारले होते.




**चित्रकार चंद्रशेखर पंत**

मुंबईत जन्मलेले सर, वडिलांच्या बदलीमुळे लहानाचे मोठे झाले ते मात्र बडोदा आणि अहमदाबाद इथे. साहजिकच मराठीसोबत गुजराथी भाषेवरही प्रभुत्व आले. शाळा कॉन्वेंट म्हणून इंग्लिशही उत्तम. वडील All India Radio वर नोकरीला तर आई संस्कृत भाषेची तज्ज्ञ व लेखिका-कवयित्री. त्यामुळे उत्तम संस्कारात सर वाढले. पण तरीदेखील या संस्कारात मध्यमवर्गीय विचारसरणी आणि त्यातून येणारी 'धोपटमार्गा सोडू नको' अशी सावधगिरी होतीच, जी मुक्त विचारांच्या कलंदर सरांना मात्र जाचक ठरली. त्यांना चित्रकलेचे रीतसर शिक्षण घ्यायचे होते. पण मेजवानीचे कितीही देखणे चित्र काढले तरी त्यात रेखाटलेल्या राजस पक्वान्नांनी पोटाची खळगी भरत नाही असे मानण्याचा तो काळ. साहजिकच चित्रकलेपासून सरांना लांबच ठेवले गेले. परंतु सरांच्या मूळ आदिम प्रेरणा या रेषारंगांच्या होत्या.ते हिरमुसले पण हरले नाहीत. त्यांच्या लहानपणी दिवाळीत मिठाईचे टीनचे डबे यायचे ज्यावर त्या काळचे दिग्गज चित्रकार एस. एम. पंडीत यांची पौराणिक चित्रे छापलेली असायची. 'सीताहरण', 'लक्ष्मणरेषा' असे विषय असलेल्या चित्रातल्या व्यक्तिरेखा सरांना भारावून टाकायच्या. मग सर आपल्या पद्धतीने गुपचुपपणे ही चित्रे तशीच्या तशी नकलवायचा प्रयत्न करायचे. ना हातात रंग होते ना ब्रश. दहा पैशाला मिळणारी साधी शिसपेन्सिल आणि रंगीत तेलकट-झिजट खडू. एवढ्याशा नगण्य सामग्रीवर दहा वर्षांचे सर भान हरपून आपली एकलव्याची साधना चालूच ठेवायचे. कधीही न पाहिलेले वा भेटलेले एस. एम. पंडीत, सरांचे दैवत होते. एकदा खेळताना त्यांचा चेंडू माळ्यावरच्या अडगळीच्या खोलीत जाऊन पडला. तो घ्यायला म्हणून सरही वर चढले. पण चेंडू दिसत असूनही सरांचे लक्ष वेधले ते Times of India च्या एका जुन्या वृत्तपत्रावर. You said it मथळा असलेल्या कार्टून कोपऱ्यात, प्रख्यात व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांचा तो सुप्रसिद्ध The common man सरांना चक्क बोलवत होता. सर झपाटले. कसल्याशा विचित्र ऊर्मीत चेंडू न घेताच ते वर्तमानपत्र घेऊन खाली उतरले आणि हाताशी लागेल त्या कागदावर, ते व्यंगचित्र तसेच्या तसे काढू लागले, एकदा, दोनदा... वीसाव्यांदा. आजूबाजूचे भानही त्यांना नव्हते. या विधुळेपणाबद्दल अर्थातच आईचा ओरडा आणि धम्मकलाडू खावे लागले पण चित्र नावाच्या झाडाने काही सरांना सोडले नाही. दहावी झाल्यावर, वडिलांची बदली मुंबईला झाली आणि पंत परिवार पार्ल्याला स्थिरावला. आईवडिलांनी सक्तीने त्यांना विज्ञान शाखेत प्रवेश घ्यायला लावला, ज्यात सरांना काडीचेही औत्सुक्य नव्हते. म्हणून सर एकदा आईवडिलांच्या नकळत, तमाम चित्रकारांचा स्वर्गलोक असलेल्या जेजे स्कूल ऑफ आर्टसकडे प्रवेश मिळतोय का म्हणून बघायला गेले. परंतु तिथल्या मुख्य संचालकांनी त्यांना तुमच्याकडे चित्रकलेची साधी प्राथमिक प्रवेशपरीक्षा पास झाल्याचेही सर्टिफिकेट नाही म्हणून बाहेरचा रस्ता दाखवला. खिन्न मनाने सरांनी जे जे स्कूलची ती 'चित्रपावन' वास्तू सोडली खरी पण त्या वास्तूने, त्यांच्याच नकळत, त्यांच्या डोक्यावर 'तथास्तु- हस्त' आधीच ठेवला होता.

B.Sc ला असलेले सर आता अठरा-एकोणीस वर्षांचे होते. स्त्रीदेहाचे तारुण्यसुलभ आकर्षण असण्याचा तो काळ. पोर्नोग्राफी हा शब्दही तेव्हा इंग्रजी भाषेच्या शब्दकोशात कदाचित नसावा आणि तत्कालीन मराठी मध्यमवर्गीय समाज तर याबाबतीत भलताच सोवळा. एकदा सरांच्या एका मित्राने त्यांना गोऱ्या नग्न महिलांचे कृष्णधवल फोटो छापलेले एक विदेशी पुस्तक दिले. विविध पोझेसमधल्या कमनीय देहाकृती आणि आकर्षक चेहरा लाभलेल्या त्या स्त्रियांचे उन्मादक फोटो त्यांच्या मित्राप्रमाणे त्यांनाही आवडले. परंतु त्यात वासना नव्हती. कॅमेराने पकडलेली ही नग्नता आपण रेघावळीत सामावू शकतो का या विचारातच त्यांना प्रचंड थरार आणि आव्हान जाणवले. त्या वेळी न्यूड पेंटींग असा चित्रशैलीचा प्रकार असतो हेही सरांच्या गावी नव्हते आणि सर तासंतास रियाझ करावा तसे छुपेपणे या फोटोंची साध्या पेन्सिलीच्या तुकड्याने चित्र काढत गेले. त्या पुस्तकात जवळपास दीडशे फोटो होते. प्रत्येक फोटोचे चित्ररूप ते तंतोतंत तसेच येईपर्यंत अनेक वेळा सरांनी गिरवले, ज्यामुळे साध्या शिसपेन्सिलीतूनही अत्युत्तम shading करणे त्यांना साधले जाऊ लागले. पण या सगळ्यात ना वेळेची शुद्ध होती ना तहान-भुकेची जाणीव. अर्थात हे 'पापकर्म' फार काळ लपून राहिले नाही. असले 'अश्लील' फोटो पाहतोस, नव्हे तर त्यांची दळभद्री चित्रेही काढतोस म्हणत कर्मठ वडिलांनी, कोवळ्या तरुण शेखरला उभा आडवा फोडून काढला आणि B.Sc झाल्या झाल्या, ते चित्रभूत डोक्यातून कायमचे निघून जावे म्हणून त्याला एका औषधी कंपनीत, Medical Representative (MR) म्हणून चिकटवूनही टाकले. B.Sc चा अभ्यासक्रम जितका कंटाळवाणा त्यापेक्षा अधिक रटाळवाणा असा हा आयुष्याचा भाग होता. ना भरगच्च पगार, ना मानाचा हुद्दा ना उच्चशिक्षणाचे पाठ-वलय. अशा या य:कश्चित अस्तित्वात सरांचे शरीर जगत होते पण मन मात्र रंगसंवेदनांमध्ये अडकले होते. नुसती तडफड तडफड होत होती जिवाची. त्यात भर म्हणजे, सरांना उत्तम गुजराथी येत असल्याने, कंपनीने त्यांना, गुजराथमधल्या नडियाद नावाच्या आडबाजूच्या प्रांतात पाठवले. तिथल्या एका चाळीत छोट्याशा भाड्याच्या खोलीत सर राहू लागले. बाकी सारे रसहीन असले तरी कलाकाराला आवश्यक असलेला एकांत आणि मोकळा वेळ सरांना मिळाला. वळवाच्या एखाद्या चुकार सरीतूनही खडकावरचे चिवट बीज अंकुरावे तसा सरांमधला हाडाचा कलाकार परत जागृत झाला. त्या वेळी पाचूसारख्या डोळ्यांची सारिका ही नटी खूप प्रसिद्ध होती. सरांनी त्या गचाळ खोलीच्या प्रवेशद्वारावरच सारिकेला उभे केले. चित्रात इतकी नजाकत व सफाई होती की खोलीवरून जाणारे येणारे लोक प्रत्येक वेळी आश्चर्याने तिथे थांबत. वीज बेभरवशाची असल्याने उग्र वासाचा नि धूर सोडणारा स्पिरीटचा दिवा बहुतेक वेळा खोलीत लावावा लागायचा. पण ती चिमुकली खोली कोंदटून टाकणाऱ्या काळ्या धुरातसुद्धा सरांनी चित्रमाध्यम शोधले आणि धूर जिथे जाऊन समर्पित होतो ते खोलीचे छत म्हणजे सरांचा कॅनव्हास ठरले. त्या काजळीतून सरांनी ते abstract शैलीतले छतचित्र असे काही चितारले की खोलीचा घरमालकसुद्धा खूश होऊन गेला. पुढे काही वर्षांनी लग्न झालेले सर अंजलीवहिनींना घेऊन ते चित्र दाखवायला परत तिथे गेले तेव्हासुद्धा दारावरची सारिका आणि छतावरची चित्रे, मालकाने संजीवन म्हणून जतन करून ठेवली होती.

लग्नानंतर, पूजा आणि अभिजितच्या जन्माबरोबर प्रापंचिक जबाबदाऱ्या आणखी वाढल्या. नोकऱ्या बदलूनही पगार काही



वाढत नव्हता. मधल्या काळात सरांनी स्क्रीन प्रिंटींग शिकून घेतले होते. सुदैवाने अंजलीवहिनींची सक्रिय साथ होती म्हणून चाकोरीबद्ध नोकरीत पिचलेल्या सरांनी मग नोकरी सोडण्याचा धाडसी निर्णय घेतला. दोघांनी मिळून शुभेच्छाकार्ड, लेटरहेड्स, लग्नपत्रिका छपाईची कामे सुरू केली. सर अतिशय मनापासून, कलात्मक स्वरूपात ही कामे करायचे पण ग्राहक वेळेवर कामाचे पैसेच द्यायचे नाहीत. आपल्या हाताखालच्या माणसांचे पगार मात्र सर स्वतःच्या मिळकती मोडून द्यायचे. मोठ्या उमेदीने स्थापन केलेला व्यवसाय अखेरीस डबघाईला आला आणि बंद पडला. मुलांचे शिक्षण, उदरनिर्वाह आता करायचा तरी कसा? का परत प्रौढ वयात नोकरी शोधायला वणवण फिरावे लागणार? सर अतिशय अस्वस्थ झाले. पण त्यांच्या अंगभूत प्रतिभेला सिद्ध करणारी एक अनोखी संधी, परेश नावाच्या त्यांच्या एका मित्राने त्यांना दिली. 'बादशहा' या प्रसिद्ध मसाल्याचे मूळ व्यवस्थापक नुकतेच दिवंगत झाले होते. त्यांचे १२ X १६ चे मोठे तैलरंगातले पोर्ट्रेट करायचे एकुलते एक काम त्यांना त्या प्रदीर्घ बेकारीच्या काळात मिळाले आणि सरांनी जीव ओतून त्याचे सोने केले. त्याचा चांगला मेहनताना मिळाला आणि मग त्या मित्रातर्फे अशा स्वरूपाची कामे त्यांना सातत्याने मिळत गेली. सरांचे नाव होऊ लागले, थोडेसे आर्थिक स्थैर्य येऊ लागले आणि विश्वास ठेवा वा ठेवू नका पण निराशेच्या आणि ओढग्रस्तीच्या परिस्थितीतून सरांना बाहेर काढणारा हा परेशच एक दिवस अचानक गायब झाला जो सरांना परत कधीही दिसला नाही वा भेटला नाही. जणू सरांच्या आयुष्याची चित्रवाट सुकर करण्यासाठीच तो आला होता आणि हेतू साध्य झाला तसा तो मानवी रूपातला फरिश्ता अंतर्धान पावला.

सरांना स्वतःत वसलेल्या स्वयंभू चित्रकाराची जाणीव होतीच पण ती ओळख आता अन्यांनाही लागू लागली. The Art Society of India. व संस्कारभारती या कलेला वाहिलेल्या संस्थांत सभासद म्हणून त्यांचा शिरकाव झाला आणि कधीही न पाहिलेली अलिबाबाची गुहाच समोर उघडली. त्या संस्थेचे झाडून सारे सभासद चित्रकलेतले दिग्गज होते. जॉन फर्नांडिस, विजय आचरेकर, वासुदेव कामत... पंतसर वगळता बहुतेक सर्वांचेच क्रमिक व रीतसर कलाशिक्षण झाले होते. त्या सर्वांच्या, तांत्रिकदृष्ट्या विशुद्ध असलेल्या कलाकृती पाहताना सरांना आपले चित्रकार म्हणून असलेले न्यूनत्व,अपूर्णत्व जाणवायचे. बेचैनी वाढायची. त्यातून सरांनी आपले निरीक्षण वाढवले. त्यांच्यासोबत बाहेर जाऊन निसर्गस्थित स्थानांचे चित्रण (out-door painting) करताना सर, हे सर्व रथीमहारथी कुंचला कसा धरतात, रंगाचे विरळ-दाट फटकारे कसे मारतात, चित्राबद्दल कसा विचार करतात, कसली माध्यमं वापरतात हे आपले आपण अभ्यासू लागले. अर्थात वासुदेव कामतांसारख्या मातब्बर तरीही मोठ्या मनाच्या कलाकाराने त्यांना प्रोत्साहन दिले, वेळोवेळी मौलिक मार्गदर्शन केले. रोज सराव असावा ज्यातून सदासज्जता येते इतकी की छंद आणि व्यवसाय हे एकरूप होऊन जातात. केल्या कामाचा मोबदला मिळतो आणि घेतल्या श्रमाचा चित्तानंद. हे दोन्ही मिळाले तरच चित्रकाराच्या प्रतिभेला पूर्णत्व येते. छंदा व धंदा यांची सुचित्रित सांगड कशी घालावी हे सांगणारा कामत सरांचा हा सल्ला, सरांनी बीजमंत्र म्हणून जपला. अफाट मेहनत घेतली. 'सफरचंद' हे फळ काढताना त्यातल्या साऱ्या रंगछटा तशाच्या तशा आणणे म्हणजे आव्हान नव्हे, त्यातून फार तर बघणाऱ्यांकडून कौतुक तुमच्या वाट्याला येईल. परंतु दिव्यप्रतिभेच्या जर समीप जायचे असेल तर सफरचंदाच्या नैसर्गिक रंगात तुमची रंगछटा शोधा, तिची निर्मिती करा - खरे आव्हान आणि म्हणून कार्यपूर्तीचा शुद्ध दिव्यानंद तिथे आहे हे सत्यसुद्धा सरांना अशा कलामुशाफिरीतूनच उमगत गेले .



असं म्हटलं जातं की चित्रकार हा अबोल, अंतर्मुख असतो. रंग हीच त्याची बोली असते आणि कुंचला-कॅनव्हास त्याची भाषा. म्हणून समाजात वावरताना तो बावरतो. पण पंतसर मात्र अशा मुखदुर्बळ कुळीचे नव्हेत. ते उत्तम वक्ते आहेत. मराठी-हिंदी-गुजराथी-इंग्लिश या चारही भाषांमधून ते आत्मविश्वासाने व्यक्त होतात. फरड्या इंग्रजीतून ब्लॉग लिहितात. पण चुकतमाकत, स्वकष्टाने

कमावलेली चित्रकला आपण दुसऱ्याला शिकवू शकतो असे त्यांना कधी स्वप्नातही वाटले नव्हते. परंतु तसे घडले खरे. आधी ओळखीच्या कुणाला शिकवले, त्याची ख्याती सर्वदूर पसरली. कलावंत म्हणजे लहरी, आत्ममग्न काहीवेळा विक्षिप्त अशी एक साधारणपणे कल्पना असते. या उलट सर मात्र मनमिळाऊ. जसे श्रेष्ठ चित्रकार तितकेच भल्या व आनंदी स्वभावाचे. त्यांच्याकडे शिकताना नुसती चित्र काढणेच जमत नाही तर मन प्रसन्न व ताणमुक्तही होते हाच सर्वांचा अनुभव. एकदा सरांच्या क्लासला डॉ कुंती हणमंते नावाची एक नेत्रतज्ञ आली, जिचे वडील एकेकाळी जे जे स्कूल ऑफ आर्टसचे डीन होते आणि सर स्तंभित झाले. कारण कित्येक वर्षांपूर्वी, नियमानुसार प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दाखला नसलेल्या सरांना, जे जे त प्रवेश नाकारणारे तेच ते हणमंते सर होते. पुढे बिंदुशैलीचे अध्वर्यू एन एस बेंद्रे या विख्यात चित्रकारांची स्नुषा श्रद्धा बेंद्रेसुद्धा सरांकडेच शिकायला यायची. अशा मौखिक प्रसिद्धीतून केवळ विद्यार्थीच नव्हेत तर हौस म्हणून चित्र काढायला शिकणारे प्रौढसुद्धा मोठ्या संख्येने यायला लागले. वर्गांनी शंभरी पार केली. सरही यात मनापासून रंगले. क्लासच्या सहली, अन्य चित्रकारांची व्याख्याने व प्रत्यक्ष चित्रसादरीकरण असे कितीतरी उपक्रम सरांनी सुरू केले. गुरुपौर्णिमेला भेटवस्तू न आणता, त्या ऐवजी, स्वहस्ते काढलेले, रंगवलेले एकच ग्रीटिंग कार्ड प्रत्येकाने आणायचे असा दंडकच सरांनी घालून दिला.

शिकवता शिकवता, सरांनी चित्रकला विषयावर पुस्तके लिहावीत असा सर्वांचा आग्रह होता आणि सरांनाही ती गरज वाटत होतीच. मुळात चित्रकला ही चौसष्ट कलांमधली एक स्वर्गविद्या. परमेश्वरी अनुग्रह असेल त्यांनाच ही वश होणार. स्थिर हात, प्रमाणबद्ध बाहयाकृती, अचूक रंगभान, कल्पकता व तशीच लालित्यपूर्ण मांडणी हे सारे त्या विधात्याचे विभ्रम सरांकडे कुठल्याही प्रशिक्षणाशिवाय उपजतपणे आले होते. शिवाय, अन्य थोर चित्रकारांची कला अभ्यासून अतिशय परिश्रमाने सरांनी चित्रकलेतले अवघड बारकावे आत्मसात केले होते. चित्र शिकतांना येणारी आव्हाने नि अडथळे म्हणूनच त्यांना चांगलेच परिचित होते. स्वानुभवावर मिळालेले हे ज्ञान विद्यार्थ्यांना कसे द्यायचे हे त्यांना नेमके ठाऊक होते. म्हणूनच सरांनी,पेन्सिल लँडस्केप्स, स्थिरचित्र, पोर्ट्रेट आणि चारकोल पेंटींग अशा चार मुख्य चित्रशैलींवर चार मोठी, सचित्र पुस्तके लिहिली. अतिशय खोलात जाऊन, बारीकसारीक मुद्यांचे विवेचन करणारी, त्याला अनुरूप प्रात्यक्षिक-चित्रे असणारी, इंग्रजीत लिहिल्याने सर्वांनाच समजणारी अशी ती विस्तृत व उपयुक्त पुस्तके होती. सर स्वतः प्रिंटिंग तंत्राचे जाणकार असल्याने, रेखाटनांना उठाव देणारा पुस्तकाचा कागद जाड, गुळगुळीत होता. भक्कम बांधणी, आकर्षक रूप, ठळक व निर्दोष छपाई होती. प्रकाशकही उत्साही आणि कसलेला निघाला. दणक्यात, भरपूर प्रती छापल्या गेल्या. सारेच उत्सुकतेने वाट पाहत असलेली ही पुस्तके, हे चित्र-प्रतिभेचे दस्तावेज, वाचक-विद्यार्थी भेटीसाठी सज्ज झाले. पण घात झाला. २६ जुलै २००५ चा तो ढगफुटीचा दिवस मुंबईत महाप्रलय घेऊन आला. रात्रंदिवस मेहनत घेऊन सिद्ध केलेले ते सर्व चित्रग्रंथ पाण्याखाली गेले. सरांकडे राहिली ती फक्त त्यांची स्वतःची प्रत. सरांना फार मोठा धक्का बसला पण त्याने ते उन्मळून वगैरे काही पडले नाहीत. आनंदयात्री असलेल्या सरांनी आपले काम त्याच अविचल निष्ठेने चालूच ठेवले.

पोर्ट्रेट म्हणजे पंतसर हे समीकरणच तोपर्यंत तयार झाले होते. समोर जिवंत मॉडेल असो वा त्याचा फोटो, वा स्मृतिछबी, एखाद्या X-ray मशीनप्रमाणे सरांची तीक्ष्ण नजर शरीर भेदून आतल्या आत्मा नामक गाभ्यापाशी पोचते. प्रत्यक्षाहुन प्रतिमा उत्कट असे पोर्ट्रेट तयार होते जे खऱ्या फोटो वा त्या व्यक्तीच्या थेट दर्शनापेक्षा जास्त लोभस असते. भावमुद्रेची 'पंतमुद्रा' त्यावर कशी नोंदवली जाते हे सरसुद्धा सांगू शकत नाहीत. पण अवचितपणे एका विद्युतभारित क्षणी, तो अलौकिक दृश्य-परिणाम साधून जातो हे मात्र खरे. यातूनच सरांच्या हातून आजवर शेकडो पोर्ट्रेटस झाली आहेत, ज्यातली कित्येक मान्यवर व्यक्तींची आहेत. संगीताचे शिक्षण नसूनही सर उत्तम गातात. गाण्याच्या या हौसेतूनच सरांनी मुकेश, रफी, आशा असे कितीतरी गायक आपल्या बोटातून कॅनव्हासवर उतरवले आहेत. किशोरीताई आमोणकरांचे गुरु श्री राघवेंद्र स्वामी यांचे सरांनी केलेले चित्र खुद्द ताईंनाच भेट देण्याचा योग सरांना आला. चित्र पाहून ताई भारावून गेल्या आणि आपल्या मातोश्री मोगुबाई कुर्डीकर यांचे पोर्ट्रेट त्यांनी सरांकडूनच करून घेतले. पुढे सर व अंजलीवहिनींबरोबर ताईंचा स्नेह अतूट राहिला. दीनानाथ मंगेशकर व माई मंगेशकर अशा दोघांचे पोर्ट्रेट सरांनी केले ज्याला लतादीदींनी मनापासून दाद दिली. शास्त्रीय संगीतातल्या या स्वर-ताल गंधर्वांच्या मांदियाळीची एक अप्रतिम पोर्ट्रेट



सरांची चित्रसमाधी

शृंखला सरांनी चितारली जी अतिशय गाजली. अशा पोर्ट्रेटच्या माध्यमातूनच पंडित जसराज, भीमसेन जोशी, संतूरवादक शिवकुमार शर्मा, मंगेश पाडगावकर, परीक्षित सहानी यांसारखी थोर मंडळी सरांच्या घरी अगदी जेवायलाही येऊन गेली, ज्यात जगप्रसिद्ध तबलावादक झाकिर हुसेनही होते. झाकिरभाईंचा उल्लेख करताना सरांची इतका वेळ उत्साही, आनंदी असलेली चर्या थोडी गंभीर झाली. चष्म्याआडचे डोळे किंचित पाणावल्यासारखे वाटले. कारण सरांपेक्षाही झाकिरभाईंची मैत्री आणि काकणभर जास्त माया सरांच्या मुलावर, कै. अभिजीतवर होती.

मनाविरुद्ध क्रमिक शिक्षणाची सक्ती असलेले बालपण अनुभवलेल्या सरांनी आपल्या पूजा व अभिजीत या दोन्ही मुलांना त्यांच्या मनासारखे वाढू दिले होते. कलेचा वारसा सुदैवाने दोन्ही मुलात उतरला. पूजा कथ्थक नृत्यात पारंगत झाली तर मुंबई विद्यापीठातून भूगोल विषयात MA केलेल्या अभिजीतला संगीत व तालवाद्यांत गोडी होती. खरेतर तो चतुरस्त्रच होता. पेटी, तबला वाजवायचा; शिवकुमार शर्मा यांचे पट्टशिष्य डॉ. फडणवीस यांच्याकडून त्याने संतूरचे धडे गिरवले होते. उत्तम फोटोग्राफी करायचा. शिवाय सर्वांबरोबर मिळूनमिसळून वागायची वृत्ती असल्याने त्याचा लोकसंग्रहसुद्धा अफाट होता.

दरवर्षी, झाकिरभाई आपल्या वडिलांचा म्हणजे श्रेष्ठ तबलाकार उस्ताद अल्लारखा खानसाहेबांचा स्मृतिदिन मुंबईत साजरा करतात. त्यांना संगीतवंदना देण्यासाठी देशोविदेशीचे अव्वल कलाकार, विशेषतः तालवादक येतात आणि आपली कला पेश करतात. या सगळ्यात अभिजीत त्यांच्यासोबत असायचाच. एकेवर्षी उजबेकिस्तानचे प्रसिद्ध डफलीसदृश वाद्य वाजवणारे अब्बोस कोसीमोव आले होते. त्यांना विनाव्यत्यय रियाज करता यावा म्हणून झाकीरभाईंच्या सांगण्यावरून अभिजीतने त्यांच्या राहण्याची सोय घरीच केली होती. त्या अल्पकाळात अब्बोस यांनी उजबेकिस्तान हा देश, त्याची भौगोलिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये, विशेषतः त्यांची अभिजात लोकसंगीत परंपरा याविषयी अभिजीतला सांगितले. अभिजीतला त्याच्या अभ्यासाची दिशा मिळाली आणि त्याने त्याच्या Ph.D. चा विषयही ठरवून टाकला - comparative study of socio-economic aspects of a life of a musician in Uzbekistan and India. कधीही, कुणीही न कल्पिलेल्या या आगळ्या विषयावर, पुढची पाच वर्षे नेमस्तपणे त्याने संशोधन केले. कितीतरी वेळा उजबेकिस्तानला जाऊन आला. श्रमाचे चीज झाले आणि २०१९ साली मुंबई विद्यापीठाची डॉक्टरेट अभिजीतला मिळाली. सर आणि अंजलीवाहिनींसाठी हा फार मोठा भाग्याचा दिवस होता. पण हा आनंद अल्पजीवी ठरला. पुढच्याच आठवड्यात विद्यापीठातून अभिजीत परतला तो असह्य डोकेदुखी घेऊनच. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून डॉक्टरांनी तत्काळ MRI केला आणि चौथ्या स्टेजला पोचलेल्या जीवघेण्या ब्रेनकॅन्सरचे निदान झाले. त्याला वाचवण्याची पराकाष्ठा सरांनी व कुटुंबीयांनी केली पण दुष्काळात तेरावा तसा दुर्दैवाने तो संचारबंदीचा महाबिकट करोनाकाळ होता. प्रत्येक टप्प्यावर अडचणी येत होत्या आणि रोगनिदान झाल्यापासून दहा महिन्यातच,म्हणजे २०२० साली, वयाच्या अवघ्या सदतिसाव्या वर्षी अभिजीतचे दुःखद निधन झाले.

रूपसुंदर आल्हाद-छटांचे, तलम कुंचल्याच्या नाजूक-वेचक सलगीतून साकारू पाहणाऱ्या एखाद्या देखण्या निसर्गचित्रावर, नियती नामक दुष्टासुराने क्रूर-काळे, बेबंद फराटे ओढून ते चित्र बरबटून टाकावे तसा तो क्षण. पंतसर समूळ हलले. मृत्यू अटळ आहे त्याबद्दल शोक नव्हता पण तो अकाली, आकस्मिक होता याची खंत मुळाशी होती. परंतु स्थितप्रज्ञ सरांना तितक्याच खंबीर अंजलीवहिनींची साथ होती. लेक पूजा आणि नाट्यक्षेत्रातला अभिनेता, दिग्दर्शक असलेला समंजस जावई 'सुदीप मोडक' सरांसोबत होते. तो क्षण ते जगणे हेच अंतिम सत्य मानणारे सर यातून मग लवकरच बाहेर आले. घडून गेलेल्या अक्रिताचा आक्रोश, माणसाला वर्तमानकाळातही तेच अक्रीत स्मृतींच्या रूपात परतपरत जगायला लावतो. म्हणून मन जडलेले एखादे पेंटिग ज्या तटस्थपणे चित्रकार ग्राहकाच्या ते हवाली करतो त्याच साक्षी भावनेने सरांनी अभिजीतच्या अकाली मृत्यूकडे बघितले. सरांच्या चित्रकक्षेत,

त्यांच्या आईवडिलांची तसेच अन्य प्रसिद्ध वा अपरिचितांची कितीतरी पोर्ट्रेटस आहेत, पण अभिजीतचे मात्र नाही कारण ते पोर्ट्रेट त्यांनी स्वतःच्या उरात जपून ठेवले आहे.

नेहरू सेंटर, बजाज आर्ट गॅलेरी अशा प्रतिष्ठित ठिकाणी भरलेली चित्रप्रदर्शने असोत वा न्यूयॉर्क म्युझियम,Amsterdam स्थित पर्यावरण संस्थेची ब्रोशरस् असो वा मित्र भीमसेन जोशी, लतादीदी यांच्या बोलण्याच्या लकबेची गंमत म्हणून केलेली नक्कल असो, राजा मिडासाचा सुवर्णस्पर्श सरांच्या बोटां-वाणीतून होतोच आणि ऐकणारा-पाहणारा मोहित होऊन जातो. परंतु आजवरच्या चढउतारांनी भरलेल्या चित्रप्रवासात खुद्द सरांनाच माणूस व चित्रकार म्हणून संमोहित करणारे क्षण कुठले असे विचारले असता सर ताडकन उत्तरतात, एस एम पंडित आणि आर. के. लक्ष्मण या दोन द्रोणाचार्यांनी सरांना दिलेले दर्शन, आणि त्यांचा थेट मिळालेला दिव्याशीर्वाद.


वृद्ध झालेले एस. एम. पंडित यांचे दिव्यचरण सरांच्या मठीला लागले तो दिवस सरांना आज असल्यासारखा आठवतो. लांब पांढरीशुभ्र दाढी, डोक्यावर जटांचा बुचडा, भवताल प्राशू पाहणारे मोठे डोळे, अंगात पांढरी लुंगी अशा वेशातले ऋषिमुनि व्यक्तिमत्त्व त्यांच्या घरी अवतरले. अंजलीवहिनींना फक्त अर्ध्या केळ्याची, अर्धा कप दुधात कुस्करलेली शिकरण जेवण म्हणून करायला सांगितली. सरांची चित्रे मोठ्या आस्थेने पाहिली. सरांचा हात हातात घेऊन अंजलीवहिनींना म्हणाले याच्या तळव्यावर खुद्द सरस्वतीने ओढलेल्या चित्ररेखा आहेत, याला प्रपंचात अडकवू नका, ती जबाबदारी तुम्ही घ्या आणि




याला कलेच्या साधनेसाठी मुक्त करा. सर शहारले. लहानपणी ज्यांची चित्रे, प्रेरणा म्हणून समोर ठेवली होती, ती बोटेच सरांचे हात शुचिर्भूत करत होती.

आर. के. लक्ष्मण या दुसऱ्या मानस गुरूंबरोबरची प्रथम भेटसुद्धा अशीच अविस्मरणीय ठरली. आपली काही व्यंगचित्रे घेऊन पंतसर Times of India च्या इमारतीतल्या लक्ष्मण सरांच्या ऑफिसात अनाहूतपणे गेले. लक्ष्मण सर त्या वेळी दुसऱ्या दिवशीच्या अर्कचित्राच्या कामात मग्न होते. तरीही त्यांनी कौतुकाने सरांचे रेषाकाम पाहिले, मार्मिक टिप्पणीमधली खुसखुशीत भाषा तपासली आणि ते अतिशय खूश होऊन गेले, इतके की सरांना आपल्या ऑफिसातच बसवून ठेवून आपले काम स्वतःच्या डोळ्याने



चंद्रशेखर पंत यांची काही तैलचित्रे

पंतसरांना पाहू देण्याची कुणालाही सहजासहजी न मिळणारी संधी त्यांनी दिली. पुढे जेव्हा जेव्हा लक्ष्मणसरांची चित्रप्रदर्शने वा व्याख्याने असायची त्या वेळी सरांना, त्यांचे अगत्याचे, वैयक्तिक आमंत्रण मिळायचे.

इतकी वर्षे दूरस्थ, मनस व मूक राहिलेले गुरु-शिष्याचे नाते योग्य वेळ येताच प्रगटले आणि एस. एम. पंडित व आर. के. लक्ष्मण यांचा कृपाप्रसाद पंतसरांना मिळाला.

सरांची पोर्ट्रेट ही त्यांच्यासारखीच सदैव प्रसन्न, टवटवीत असतात. क्वचित एखादे गंभीर असू शकेल पण दुर्मुखलेले कधीच नसते. या भूतलावर जन्मताना प्रत्येकाला अस्तित्वाचा प्रकाश असतो ज्याचीच आभा सरांच्या हातून घडणाऱ्या समग्र पोर्ट्रेटला व्यापून राहते. पाहणारा सरांचं भरभरून कौतुक करतो. सर मात्र हुरळून जात नाहीत. उलट मंद हसत ते चित्र, सर संबंधिताच्या ताब्यात देतात आणि त्यातून बाहेर पडतात. ही निर्विकारता (detachment), पुढच्या पोर्ट्रेटमध्ये परकायाप्रवेश करताना सरांच्या उपयोगी पडते. कारण मग ते स्वतःच त्यात संपूर्ण रममाण होतात. चार चुटक्यांचे हे जीवन दोन घुटक्यात संपते, म्हणून प्रत्येक क्षण हा सण समजून जगायचा. जे बरेवाईट घडले, ना त्याचा शोक बाळगायचा, ना, जे हवे होते ते घडले नाही किंवा घडत नाहीये म्हणून त्याची खंत करायची. मस्तमग्न सरांचे हे साधे सोपे जीवन तत्त्वज्ञान आहे. अर्थात दोन दोन महायुद्धे पचवलेल्या युरोपियन देशांनी जसे आपल्या कलासंस्कृतीचे संवर्धन केले, विविध कलाशाळा निर्मून जगाच्या इतिहासात आपली निजखूण रोवली, तसा प्रयत्न भारतातही व्हायला हवा; इथल्या प्रतिभावंत चित्रकरांचा उचित सन्मान व्हायला हवा; शाळेत चित्रकला हा विषय केवळ श्रेणी मिळण्यापुरताच शिकला-शिकवला न जाता, त्याकडे एक स्वतंत्र, कारकिर्द घडवू शकणारे क्षेत्र म्हणून पाहिले जाईल,असे प्रयत्न राज्य व राष्ट्र पातळीवर व्हायला हवेत असे मात्र सरांना मनापासून वाटते. १९३८ साली ब्रिटिश राजवटीने सुरू केलेला आणि आजतागायत तोच कायम असलेला चित्रकलेच्या elementary परीक्षेचा कालबाह्य अभ्यासक्रम बदलण्यासाठी सरांनी पुष्कळ प्रयत्न करून बघितले पण त्याला यश मिळाले नाही ही मात्र खंत सरांना आजही वाटते.

वयानुसार सर थकल्येत पण डोळ्यातली सजगता, मनातली मिश्कीली आणि बोटातली जादू मात्र अम्लान आहे. नुकतेच सर झांबियाला पर्यटनासाठी म्हणून गेले होते. तिथून व्हॉटसअपवर सरांनी जंगलातल्या एका डेरेदार वृक्षाचा फोटो टाकला आणि खाली कोडे घातले. झाडात एक मोठे वन्य श्वापद दडून बसलेय. कुठले सांगा बघू? आम्ही सगळेजण, फोटो zoom करून, डोळे फाडून फाडून झाडाखाली, वर, मागे तो वन्य पशू शोधतोय पण मिळता मिळेना. दुसऱ्या दिवशी सरांनी सचित्र गौप्यस्फोट केला. खराखरा कुणी पशू नसून, संपूर्ण झाडाच्या बाह्याकारात, एक सोंड उंचावलेला मायावी गजराज सामावला होता. त्या फोटोतल्या हत्तीची सरांनी काढलेली outline इतकी नेमकी व रेखीव होती की आम्हीच खजील झालो, की अरे ही सहज साधी वाटणारी चित्राकृती, आपल्या कुणाला कशी नाही हुडकता आली?

वाटलं पंतसर म्हणजे 'a king without crown' - मुकुटावाचूनचा राजा आहेत. जे जे स्कूल ऑफ आर्टस् सारख्या नामांकित किंवा कुठल्याच साध्याशा चित्रशाळेतही त्यांचे शिक्षण झाले नाही. नोकरीही भलतीच जिथे चित्रकला कशाशी खातात हेच माहिती नव्हते म्हणून त्यासंबंधित प्रशिक्षण, हुरूप वा संधी कधी नोकरीतून मिळाल्या नाहीत. परंतु तरीही सरांनी आपली एकतर्फी साधना चालूच ठेवली. प्रापंचिक संकटांनी जेरीस न येता, कुंचलामयी रेषेत आपली मनःशांती शोधली. भगीरथ प्रयत्नातून एक चित्रकार म्हणून चक्क आध्यात्मिक उंची गाठली, इतकी की खुद्द देवी सरस्वतीलासुद्धा स्वतःचे पोर्ट्रेट पंतसरांकडूनच करून घेण्याचा मोह पडावा. चित्रकलेच्या वेड्या नादाने गजान्त लक्ष्मी त्यांना प्रसन्न झाली नाही. पण चित्रशारदेचा चिरंतन वरदहस्त मात्र एखाद्या हिरेजडित किरीटाप्रमाणे सरांच्या माथ्यावर कायम झळकत, विलसत राहिला.

रंगकल्लोळाच्या या चित्रसम्राटाला म्हणूनच उपरा मुकुट वा प्रभावळीची वेगळी गरज असायचे काही कारण नाही.

**आशुतोष उकिडवे**
**१०३, सन्निवास,**
**प्रार्थना समाज रोड,**
**विलेपार्ले (पू.), मुंबई ४०००५७**

# सहावा कोण?

**लीनता साने**

**आ**ज कितीतरी महिन्यांनी त्या दोघीच दिवसभर भेटणार होत्या.

मिहीर आणि साकेतच्या शाळेची ट्रीप होती आणि मुग्धाने आज रजा घेतली होती.

तसे दोन्ही कुटुंबांचे अधून मधून काही ना काही कार्यक्रम व्हायचे, पण त्या दोघीच अशा आज बऱ्याच दिवसांनी भेटणार होत्या.

ट्रीपसाठी लवकर उठून डबा केलाच होता. नवरे आपापले डबे घेऊन कामाला गेलेच असते, त्यामुळे शाळेत मुलांना सोडून, तेथूनच निघायचे असे ठरले होते. आधी थोडा वॉक घेऊन मग ब्रेकफास्टला वैशालीत... कितीतरी वर्षांनी... नंतर



थोडेफार शॉपिंग, जेवण, नाटक असा भरगच्च प्रोग्रॅम होता.

कोणालाही हेवा वाटेल अशी त्यांची मैत्री होती, अगदी प्रायमरी शाळेपासून! शिवाय घरे पण जवळ, त्यामुळे नेहमीच एकमेकींकडे जाणे-येणे. नंतर कॉलेजही एकच. सुदैवाने नवरे पण दोघींना पुण्यातीलच मिळाले आणि त्यांचे पण एकमेकांशी चांगले जमले. पुढे दोघींचे मुलगेही एकाच शाळेत, एकाच वर्गात. मिहीर आणि साकेतचे पण छान जमत असे. दोघेही अगदी घट्ट मित्र होते. ऐकणाऱ्यांना गंमत वाटत असे. जिवलग मैत्रिणींची मुले, पण त्यांचीही तितकीच घट्ट मैत्री! फक्त मुग्धा नोकरी करत होती आणि वर्षा मात्र घरीच असायची. नवऱ्याच्या श्रीमंतीमुळे आणि उत्तम व्यवसायामुळे तिला तशी गरजही नव्हती.

अगदी मुद्दाम ठरवूनही जमले नसते अशी दोघींची आयुष्ये अगदी समांतर चालली होती.

पुढचे वर्ष बारावीचे असल्याने मिहीर आणि साकेत आज उत्साहाने ट्रीपला गेले होते. दोघेही अभ्यासात हुशार असले तरी चांगल्या डिग्रीसाठी बारावीत चांगले क्लास आणि भरपूर अभ्यास आवश्यक होता. त्यामुळेच मुग्धा आणि वर्षाने पण आज मनसोक्त मजा करायचे ठरवले होते. पुढचे वर्ष त्यांचे पण फारसे एकत्र भेटणे झाले नसते.

मुलांच्या बसेस निघाल्यावर या दोघी पण पार टेकडीच्या पायथ्यापर्यंत फिरायला जाऊन वैशालीत आल्या होत्या. कॉलेज जीवनातील गमती जमती, चिडवा चिडवी आठवून दोघी भरपूर हसत होत्या. खूपच दिवसांनी इतका निवांत मोकळेपणा दोघींना मिळाला होता. संध्याकाळी सात-साडेसातपर्यंत मुले ट्रीपहून येणार होती, त्यांना घेऊनच घरी परतायचे ठरले होते.

भरपूर गप्पा आणि नाश्ता झाल्यावर दोघींचा मोर्चा लक्ष्मी रोड आणि तुळशीबागेकडे वळला.

पुलंनी म्हटल्याप्रमाणे जगातील कोणतीही वस्तू मिळण्याचे ठिकाण म्हणजे लक्ष्मी रोड आणि बायकांना वेडं करण्याचे ठिकाण म्हणजे तुळशीबाग! त्यातूनही निवांत वेळ आणि पुरेसे पैसे असले म्हणजे, अगदी दुग्ध-शर्करा, मणिकांचन वगैरे वगैरे...

बघता बघता वेळ आणि पैसे कसे संपत आले हे दोघींनाही कळले नाही. दोन वाजल्यावर मात्र आता खरेदी बास असे त्यांनी ठरवले. बालगंधर्वला खूप गाजलेल्या तीन वाजताच्या विनोदी नाटकाची तिकीटे आधीच बुक केली होती. खरंतर नाश्ता भरपूर झाल्याने जेवायला भूक नव्हतीच. उगीचच सवय म्हणून थोडेसे खाऊन त्या दोघी बालगंधर्वला येऊन पोचल्या.

आता गप्पा मुलांचे अभ्यास, क्लास, करियर याबद्दल सुरू झाल्या. दोघी मुलांबद्दल कौतुकाने बोलत होत्या. आपल्या मुलांना पण एकमेकांवाचून करमत नाही हे आठवून हसत होत्या. अगदी हेवा करण्यासारखे दोघींचेही आयुष्य आतापर्यंत बेतशीर चालले होते. त्याबद्दल दोघी अगदी आनंदी, समाधानी होत्या.

नाटकही त्यांना मिळालेल्या रिपोर्टप्रमाणेच खुसखुशीत अगदी त्यांच्या आजच्या मूडला साजेसेच होते.

इंटरव्हलला कॉफी झाल्यावर मात्र दोघींना घराचे, मुलांचे वेध लागले. किती दिवसांनी इतकी छान मजा केली. आता ह्या आठवणी पुरवून पुरवून वापरू असे म्हणत दोघी पुन्हा नाटकात रमल्या.

पाचच्या सुमारास मुग्धाच्या फोनवर कॉल आल्याचे तिला समजले, पण नंबर ओळखीचा नसल्याने तिने दुर्लक्ष केले. पण परत परत फोन येऊ लागला. त्याच वेळी वर्षाच्या फोनवर पण दोन वेळा फोन आला. काहीतरी शंका येऊन त्या हळूच बाहेर आल्या.

दोघीही कॉलबॅक करू लागल्या, तर फोन सतत एंगेज्ड. मग न राहवून वर्षाने शाळेच्या लँडलाईनवर फोन केला. फोनवरचे बोलणे ऐकून वर्षा एकदम काऽऽय असे जोरात ओरडली आणि खालीच बसली.

मुग्धा आता जरा घाबरली. काय झालं गं, असे विचारताच वर्षाने रडत रडत मुलांच्या बसला अपघात झाल्याचे सांगितले.

ती बातमी ऐकताच दोघींचे हातपायच गळून गेले. त्यातल्या त्यात मुग्धा जरा धीट होती. नोकरी करत असल्यामुळे की काय, पण चार जास्तीच्या गोष्टींची तिला माहिती होती.

''हे बघ वर्षा, घाबरून जाऊ नकोस, फारसे काही नसेलही झाले, पण आपण आधी शाळेत जाऊ.'' बोलता बोलता मुग्धाने रिक्षा थांबवली. संध्याकाळच्या गर्दीतून शाळेत पोचायला अर्धा तास तरी लागला असता.

रिक्षात बसल्या बसल्या तिने आधी नवऱ्याला फोन लावला, वर्षाला पण तिच्या नवऱ्याला फोन करायला सांगितले. पण तो मुंबईला गेला असल्याने त्याला पोचायला नऊ-साडेनऊ झाले असते. उल्हासला पण निरोप मिळाला तरी चाकणहून पोचायला दीड-दोन तास लागले असते.

शाळेत येताच तिथल्या गडबड गोंधळाने त्या घाबरून गेल्या. दोन बसेस, ज्या पुढे गेल्या होत्या, त्या नुकत्याच येऊन

पोचल्या होत्या. तिसऱ्या मागच्या बसला अपघात झाला होता.

मुग्धा आणि वर्षा धावत पळत आशेने त्या बसपाशी गेल्या. त्या मुलांना कशाचीच कल्पना नसल्याने ती अजून ट्रीपच्या मूडमध्ये होती. खूप गडबड गोंधळ चालू होता. मुले उत्साहाने पालकांना ट्रीपच्या गंमती जमती सांगत होती. दोघींनी बसमधील प्रत्येक मुलगा शोधला पण मिहीर आणि साकेत त्यात नव्हते.

आता मात्र दोघी खूपच घाबरल्या. वर्षा तर खूपच रडू लागली. शाळेने मुख्याध्यापक, सगळा स्टाफ, कर्मचारी सगळ्यांनाच बोलावून घेतले होते. शिक्षकांनी परत आलेल्या मुलांच्या पालकांना अपघाताची माहिती दिली आणि मुलांना लगेचच घरी घेऊन जाण्यास सांगितले.

हॉलमध्ये आता एकदम सन्नाटा पसरला होता. तिसऱ्या बसमधील मुलांचे पालकच फक्त आता उरले होते. काही जण अजून पोचायचे होते. एकंदर प्रसंग लक्षात घेऊन आधीच्या बसमधील काही पालक मदतीसाठी थांबले होते.

मुख्याध्यापकांनी अतिशय खोल आवाजात अपघाताची बातमी दिली. सहा मुले आणि एक शिक्षक अपघातात दगावल्याचे कळताच एकच हलकल्लोळ झाला. सगळे जण आता नावे कळून घेण्यासाठी धडपडत होते. काही बायका बधीर होऊन जागेवरच बसून गेल्या. समोरून येणाऱ्या टँकरची जोरदार धडक बसली होती. ड्रायव्हरची चूक नव्हती. आलेल्या प्रसंगाला धीराने सामोरे जाण्याची त्यांनी विनंती केली.

नावे निश्चित न समजल्यामुळे अजून गोंधळ नको म्हणून जाहीर केली नव्हती. आता ॲम्ब्युलन्स आणि बस येईपर्यंत वाट बघणे इतकेच हातात होते. पण कोणाचेच मन थाऱ्यावर नव्हते. काही जण खूप चिडले होते. तावातावाने बोलत होते तर काही जण हताश, स्तब्ध बसून राहिले होते. कोणी बोलत नव्हते पण प्रत्येक जण मनात प्रार्थना करत होते की 'माझा मुलगा सुखरूप असू दे.'

अचानक गेटजवळ थोडी गडबड उडाली. दोन ॲम्ब्युलन्स आल्या होत्या. पालकांमध्ये अचानक विचित्र शांतता पसरली. शिक्षकांनी सगळ्यांना थांबवून धरले होते. कर्मचाऱ्यांनी दोन मृतदेह बाहेर काढून नाव पुकारताच मात्र दोन्ही आयांनी अक्षरशः ओरडत तिकडे धाव घेतली. काही पालक त्यांना सावरण्याचा प्रयत्न करत होते.

मुग्धा आणि वर्षा एकमेकींशेजारी स्तब्ध बसून होत्या. वर्षाला आता रडू पण येत नव्हते. दोघी जणी आता नवऱ्यांची वाट बघत होत्या. एकटीच्याने हे दुःख, भीती आता त्यांना पेलवत नव्हती.

अजून दोन ॲम्ब्युलन्स येताच परत एकदा सगळा तोच प्रकार घडला. गेलेल्या चार पालकांच्या मुलांकडे आता बघवत नव्हते. एकूण परिस्थिती लक्षात घेऊन मुख्याध्यापकांनी बाकीच्यांना शेजारच्या हॉलमध्ये नेले. शाळेकडून पुढची व्यवस्था पाहण्यासाठी काही शिक्षक कामाला लागले. तीन-चार पोलीस मुख्य गेटच्या बाहेर जमलेल्या गर्दीला आणि पत्रकारांना आवरण्याचे काम करत होते.

इतक्यात तिसरी बस आल्याचे कळताच उरलेल्या पालकांनी बसकडे धाव घेतली. गंभीरपणे मुले गाडीतून उतरत होती. आपला मुलगा बघताच पालकांना आनंदाने रडू येत होते. इतका वेळ आवरून धरलेली भीती संपली होती, पण इतरांचा


## विपुलश्री ललितबंध पुरस्कार

**गेल्या वर्षीपासून ललित लेखासाठी असलेल्या प्रभावती जोशी पुरस्काराच्या जागी ललित लेखासाठीच वेगळा पुरस्कार आम्ही सुरू केला आहे. जानेवारी ते ऑक्टोबर या कालावधीमध्ये प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ट ललित किंवा वैचारिक लेखास हा पुरस्कार देण्यात येतो. या निवडीबाबत संपादकांचा निर्णय अंतिम राहील.**

**- संपादक**

विचार करून तो आनंद व्यक्तही करता येत नव्हता.

हळूहळू सगळी बस रिकामी झाली. मिहीर आणि साकेत त्यात नाहीत हे लक्षात येताच आता मुग्धा पण गर्भगळीत झाली. इतका वेळ तिला आशा होती की आपली मुले सुखरूप असतील. दोघींच्या नवऱ्यांचे दोन-तीन वेळा फोन येऊन गेले होते.

चौथ्या ॲम्युलन्समधून अजून एक मुलगा आणि शिक्षक यांचे मृतदेह आणले होते. आता मात्र दोघी थोड्या गोंधळल्या. कारण जाहीर केल्याप्रमाणे अजून एकच मुलगा दगावला होता. पण मिहीर आणि साकेत दोघेही परत आले नव्हते.

चौथ्या ॲम्ब्युलन्समधून बरोबर आलेले शिक्षक दुसऱ्यांना सांगत होते, ''अहो, तो ऐकायलाच तयार नाही. किती समजावले त्याला. दोघांची फार मैत्री होती हो. सगळीकडे सतत बरोबर असायचे. आजही दिवसभर एकत्रच होते आणि असे घडल्यावर तर ऐकेचना तो. मित्राबरोबर शेवटीच येणार असा हट्टच धरून बसला. इतके वाईट वाटले ना!''

ते एकताच मात्र दोघींना रडू आवरणे अशक्य झाले. हे तर आता नक्कीच होते की सहावा मुलगा म्हणजे मिहीर आणि साकेत यापैकी एक. पण नक्की कोण? दोघीजणी शेजारी शेजारी बसल्या. एकदम गप्प! पण आता दोघींचे मन मात्र सैरावैरा धावत होते. आता अनिश्चितता नको वाटत होती. जे काही असेल ते एकदा कळू देत. आता मगापासूनचा ताण असह्य झाला होता. सकाळपासून इतका छान सुरू झालेला दिवस असा भयंकररीत्या संपत चालला होता.

आज दिवसभर दोघी एकमेकींच्या मुलाचे कौतुक करीत होत्या. स्वतःच्या मुलाला नावे ठेवीत होत्या. पण आता मात्र दोघीजणी स्वतःचा मुलगा सुखरूप असावा यासाठी मनात प्रार्थना करीत होत्या.

इतके दिवस छोट्या छोट्या प्रसंगीदेखील त्या एकमेकींच्या मदतीला केव्हाही धावून जात होत्या. लागेल ते सगळे करत होत्या. पण आता 'दोघातील एकच' हे कळताच मात्र सगळे संदर्भ आता बदलू पाहत होते.

वर्षाला वाटले, ह्यांना काय कमी आहे? दोघे नोकरी करतात. आमचा आधीच धंदा, सतत चढउतार आणि ज्याच्या भरवशावर पुढे आशा ठेवायची तो वाचला तर पाहिजे...! विचार कुठेही कसेही भरकटत होते.

मुग्धाला वाटत होते, वर्षा पिढीजात श्रीमंत, त्यातून भरभराटीचा धंदा, त्यांना काय कमी आहे. आमच्या दोघांच्या खाजगी नोकऱ्या. सगळी पुढची आशा मुलावरच आणि तोच जर नाही... नाही, त्याला काही होता कामा नये!

आता एक एक क्षण युगासारखा वाटत होता. दोन-तीन शिक्षक, काही पालक सोबत थांबले होते. 'सहावा कोण?' हा हजार वेळा मनात आलेला प्रश्न विचारायचे मात्र दोघींचेही धाडस होत नव्हते.

आणि तितक्यात शेवटची ॲम्ब्युलन्स आली. दोघी जणी ताडकन उठल्या, मात्र पाय अगदी जड झाले होते. एकही पाऊल उचलत नव्हते. भीतीने प्राण कंठाशी आले होते. दोघींनी एकमेकींचे हात घट्ट धरले आणि त्या पुढे सरकल्या.

कदाचित पुढच्याच क्षणी घट्ट धरलेले त्यांचे हात सुटणार होते... कायमचेच!!

**लीनता साने**

**३९०ब, नारायण पेठ,**

**दत्तधाम सोसा.**

**पुणे ४११०३०**

## डॉ. शैला नवरे पारितोषिक

**विपुलश्रीचा दिवाळी अंक हा एक दर्जेदार दिवाळी अंक म्हणून गणला जातो. यातील कथा आणि लेखही अत्यंत दर्जेदार आणि वाचनीय असतात. विपुलश्री दिवाळी अंकातील सर्वाधिक प्रतिसाद मिळालेल्या उत्कृष्ट साहित्यास डॉ. शैला नवरे पोरितोषिक गेली दोन वर्षे देत आहोत. सुप्रसिद्ध अभिनेते कै. शेखर नवरे यांच्या या मातोश्री. त्यांच्या स्मरणार्थ हे पारितोषिक देण्यात येते**




**सि**नेमात काम करता करता लोकप्रिय झालेल्या नायक-नायिकांच्या जोड्या त्या काळात तरुणाईच्या मनात भरल्या यात नवल नाही. त्यांना पुन्हा पुन्हा नव्या-जुन्या चित्रपटात पाहताना प्रेक्षक भान विसरत. यातल्या काही जोड्या खरोखरच परस्परांच्या प्रेमात बुडाल्या. काहींचे प्रेम फक्त रुपेरी पडद्यापुरते सीमित राहिले. अशा काही जोड्यांचे स्मरणरंजन...

# एक नटखट -एक चुलबुली शम्मी कपूर - गीता बाली

**सदानंद गोखले**

**प्या**र मुहब्बत ही आसान बात नाही. प्रेमात पडणं सोपं... पण त्या प्रीतीला प्रतिसाद मिळेपर्यंत तुमचं काही खरं नसतं... आपण ज्याला 'रिबाऊन्ड लव्ह' म्हणतो, तसा प्रकार अनेकांच्या बाबतीत घडतो. दिलीपकुमार-कामिनी कौशल-मधुबाला आणि देव आनंद-सुरैय्या-कल्पना कार्तिक ही नावं हेच सिद्ध करणारी.

असाच काहीसा प्रकार शम्मी कपूर आणि गीता बाली यांच्या बाबतीत घडल्याचे बोलले जाते.

गीता बाली हे नाव आपल्या पिढीला ठाऊक झालं ते 'अलबेला' या चित्रपटामुळे. १९५१ सालात दणकून चाललेला हा सिनेमा १९७५ सालात पुनःप्रदर्शित झाला आणि थिएटर बदलत पुन्हा रौप्यमहोत्सवी ठरला. देव आनंदच्या 'बाजी' या चित्रपटात ती क्लब डान्सर म्हणून दिसली. पुन्हा 'जाल' या चित्रपटात ही जोडी होती. त्या सुमारास बहुधा देव आनंदबद्दल तिच्या मनात आदर भावना होती. रत्नागिरीत आऊट डोअर शूटिंग उरकून परत येताना देवने तिला आपल्या गाडीतून चलण्याचा आग्रह केला. त्याने नुकतीच नवी गाडी घेतली होती. पण वाटेत त्यांची कार झाडावर आदळली. सुदैवाने दोघांना फार दुखापत झाली नाही. गीता बालीच्या कपाळावर टेंगूळ आलं एवढंच... नंतर मात्र गीता बाली आणि देव एकत्र आलेले दिसत नाहीत.

त्या काळात गीता बाली तिच्या कुटुंबात एकमेव अर्थार्जन करणारी... ते कारणही असू शकेल.

शम्मी कपूरचे सलग एकोणीस चित्रपट फ्लॉप झाले. दरम्यान श्रीलंकेच्या सहलीवर असताना त्याची इजिप्शियन नटी नादिया गमाल हिच्याशी ओळख झाली. शम्मीबाबा तिच्यावर फिदा




नटखट शम्मीकपूर

झाल्याचे सांगतात. ती बेली डान्सर म्हणून प्रसिद्ध. पण ती कैरोला परत गेली आणि ही प्रेमकहाणी संपून गेली. नंतर गीता बाली त्याच्या आयुष्यात आली आणि तो सावरला.

दोघांची प्रेमकहाणी थोडी अजब. तो प्रेमात पार बुडालेला. ती घरच्या जबाबदारीमुळे लग्नाला नकार देत राहिली.

नटखट, चंचल व्यक्तिमत्त्वाची देणगी लाभलेले कलाकार तसे दुर्मीळच... आपल्याच लहरीत, मस्तीत जगणारे, इतरांचा जरासुद्धा विचार न करणारे, संख्येने अमाप.

मुळात आनंदी आणि उत्साही राहणं ही भलतीच अवघड गोष्ट! काहींना ते सहज जमतं. अशी माणसं आपल्या भोवतालचं वातावरणही उल्हसित करून टाकतात.

गीता बाली हे असंच एक संपन्न आणि लोभस व्यक्तिमत्त्व. खुद्द परमेश्वरालासुद्धा अशी माणसं आवडत असणार. नाहीतर गीता बालीचं आयुष्य अवघ्या पस्तिशीत संपून जावं, याचं अन्य काय कारण देता येईल?

त्यातही शम्मी कपूरला नृत्याचे वेड आणि गीता बालीला संगीत आणि नृत्याची उत्तम साथ. दोघांनी एकत्र यावं हा नियतीचा संकेत असणार...

## जगात पदार्पण

१५ नोव्हेंबर १९३० रोजी गीता बाली पंजाबमधल्या अमृतसर येथे जन्माला आली. हरिकीर्तन कौर हे तिचं नाव. राज्य ब्रिटीशांचं. तिची बहीण हरिदर्शन कौर. तिची म्हणजे हरीदर्शनची कन्या म्हणजे नंतर हिंदी चित्रपटसृष्टीत आलेली योगिता बाली.

छोट्या गीता बालीचं लक्ष लहानपणीच संगीत आणि नृत्य यामध्ये गुंतलेले. हे कुटुंब नंतर लाहोरमध्ये आलं.

वयाच्या चौथ्या वर्षीच लाहोर रेडिओवरच्या छोट्या कार्यक्रमातून गीताच्या कर्तृत्वाचा परिचय लाहोरवासियांना झाला.

१९४७ सालात फाळणीनंतर तिचं अख्खं कुटुंबच भारतात, मुंबईत आलं.

शम्मी कपूर ज्येष्ठ अभिनेता पृथ्वीराज कपूर यांचा पुत्र. थोरला राज आणि धाकटा शशी. राज कपूरप्रमाणेच शम्मीने आपल्याला मिळालेल्या नाट्य वारशाला पृथ्वी थिएटर्सद्वारा रंगमंचावर आलेल्या नाटकांमधून सिद्ध केले.

२१ ऑक्टोबर १९३१ रोजी शम्मी मुंबईत जन्माला आला. आधी त्याची पृथ्वीराज आणि राज कपूर यांच्या अभिनय कर्तृत्वाने थोडी कुचंबणा झाली असणार. कारण तो बुजरा. तो त्या काळात चाचपडत होता.

पृथ्वी थिएटर्समुळे पृथ्वीराज कपूर यांचे नाटक दौरे सुरू असायचे. त्यातच



चुलबुली गीता बाली

ते कलकत्याच्या न्यू थिएटर्स स्टुडिओमध्ये चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यस्त होते. त्यामुळे शम्मी कपूरचे बालपण कलकत्यामध्ये गेले. तिथल्याच मॉंटेसरीमध्ये तो प्राथमिक शिक्षणात रमला.

पापा पृथ्वीराज पुन्हा मुंबईत आल्यानंतर सेंट जोसेफ स्कूल या वडाळ्याच्या कॉन्व्हेंट स्कूलमध्ये शम्मी कपूर शिकत होता. नंतर डॉन बास्कोमधून शिकला आणि न्यू इरा स्कूलमध्ये मॅट्रिक पास झाला.

काही काळ रामनारायण रुईया कॉलेजमध्ये शिकत असतानाच पृथ्वी थिएटर्सच्या रंगमंचावर त्याचे पदार्पण झाले.

## करिअरची सुरुवात

गीता बाली १९४२ सालातच मझहर खान यांच्यामुळे वयाच्या बाराव्या वर्षी चित्रपटसृष्टीत आली. कॉबलर हा तिचा सिनेमा लाहोरमध्ये प्रदर्शित झाला.

१९४६ साली 'बदनाम' या चित्रपटाद्वारे तिचे नायिका म्हणून रुपेरी पडद्यावर पदार्पण झाले. त्यानंतर

सातत्याने ती पुढे जात राहिली.

सुहाग रात (१९४८) मध्ये आलेला 'नेकी और बदी' तसेच दुलारी, बडी बहेन, निशाना आणि पंजाबी सिनेमा चाई (१९५०) ही तिची पुढची वाटचाल. या काळात भारत भूषण (सुहाग रात), सुंदर (चाई), हे तिचे पडद्यावरचे नायक. मधुबाला, सुरैया, प्राण आणि रहमान हे तिचे सहकलाकार होते. याच काळात बावरे नैन (राज कपूर)ने तिला प्रसिद्धी लाभली.

शमशेर राज कपूर हे शम्मीचे पूर्ण नाव. पाच फूट दहा इंच उंचीचा हा तरुण तब्येतीने सुरुवातीला अगदीच मामुली, किरकोळ.

१९४८ सालात पापाजींच्या पृथ्वी थिएटर्स या नाटक कंपनीत शम्मी कपूर रुजू झाला.

गुलसनोबर (१९५३) या चित्रपटाद्वारे त्याचे रुपेरी पडद्यावर पदार्पण झाले. नायिका होती श्यामा. त्याच वर्षी लैला मजनू (नूतन) आणि रेल का डिब्बा (मधुबाला) हे त्याचे चित्रपट आले.

१९५४ सालात आलेल्या 'मेहबूबा' (नलिनी जयवंत) आणि 'शमा परवाना' (सुरैया) या चित्रपटामधून त्याची असफल कारकिर्द चालू राहिली.

त्याच काळात त्याने आपल्या आईजवळ मधुबालाशी लग्न करण्याचा इरादा व्यक्त केला होता. पण 'तू हिंदू तर ती मुस्लीम, त्यामुळे हे घडणे अशक्य' या शब्दात आईने त्याला समजावले.

### विक्रमी यश

१९५१ मध्ये आलेल्या 'अलबेला'च्या रौप्यमहोत्सवी यशामुळे गीता बालीचे नाव सर्वतोमुखी झाले. भगवानदादांचा हा



भोली सुरत दिल के खोटे

पहिला सुपर ड्युपर चित्रपट.

इथे भगवान-गीता बाली या दोघांचे पडद्यावरचे व्यक्तिमत्त्व असे काही खुलले की प्रेक्षक खुळावले.

भगवानची सादगी, नृत्याची लय अंगात भिनलेली. रिदम हे कमालीचं वेधक ठरलं. तर गीता बालीच्या चेहऱ्यावरचा गोडवा अनाघ्रात सौंदर्य, डोळ्यातली चमक हे सारं वेड लावणारं!

श्याम ढले खिडकीतले
तुम सीटी बजाना छोड दो

या तिच्या आर्जवाला त्याच्याकडे समर्पक उत्तर तयार आहे.

घडी घडी खिडकी में खडी
तुम तीर चलाना छोड दो

हे राजेंद्र कृष्ण यांचे चपखल शब्द, तितकीच सी. रामचंद्र यांची बहारदार नशीली धून यांचे गारुड प्रेक्षकांना पागल करून गेले!

लता दीदींचा मुलायम स्वर, साथीला सी. रामचंद्रचा ढाला, बहारदार मिस्कील अंदाज यातून एक छान प्रेमकथा सजली.

गीता बालीचे स्वप्नाळू नेत्र अन् भगवानदादांचा एकाच वेळी भोळा खुळा तरीही खट्याळ चेहरा, कमालीचा परिणाम साधणारा. तिचं सुभग दर्शन अन् सहज सुंदर नर्तन. भगवानदादांच्या अफलातून रिदमला पूरक ठरलं. सगळ्याच गाण्याला प्रेक्षक पडद्याच्या दिशेने नाणी उधळत दौलतजादा करायचे. उत्स्फूर्त टाळ्या शिट्ट्यांचा जल्लोष होई. डोअर किपरला भरपूर कमाई होत असे.

'अलबेला'ने गीता बाली लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन पोहोचली. तिला लोकांचा प्रतिसाद एवढा मोठा की वास्तविक गीता बाली हे तिचे नाव, पण 'गीता बाली' हा समास, मराठी रसिक प्रेक्षकांनी चटकन स्वीकारला!

सलग एकोणीस अपयशी चित्रपट देणारा शम्मी कपूर गीता बालीच्या प्रेमात पडला यात नवल नाही. 'मिस कोकाकोला' या चित्रपटाच्या शूटिंग दरम्यान ही जोडी एकमेकांच्या प्रेमात चूर झाली अन् मग शम्मी कपूरच्या आयुष्यात मोठाच चमत्कार घडला. १९५७ मध्ये आलेल्या 'तुमसा नही देखा' चित्रपटात शम्मी कपूर मिशीला रजा देऊन आमूलाग्र बदललेल्या व्यक्तिमत्त्वात पडद्यावर आला आणि प्रेक्षकांच्या पसंतीला उतरला. चित्रपटाचे रौप्यमहोत्सवी यश, शम्मीच्या नव्या हिरोगिरीची सुंदर सुरुवात होती.

जवानियाँ ये मस्त मस्त बिन पिये
जलाती चल रही है राह में
न जाने इनमे किस के वास्ते हूँ मैं
न जाने इनमे कौन है मेरे लिये

हे गीत गात, हा खुशालचेंडू नायक बगीच्यामध्ये सैर करताना दिसला आणि तरुणाईच्या गळ्यातला ताईत बनून गेला.

खरं सांगायचं तर शम्मी आधीच गीता बालीच्या प्रेमात बुडालेला. तिचा स्पष्ट रुकार मिळाला आणि २३ ऑगस्ट १९५५ रोजी दोघे भल्या पहाटे विवाहबद्ध

झाले.

ती करिअरमध्ये त्याला सिनिअर. वयानेही एक वर्षाने मोठी. लग्नानंतर त्याला मोठाच आत्मविश्वास लाभला. 'तुमसा नही देखा' चित्रपटातली त्याची अदा हा निश्चितच गीता बालीच्या सहवासाचा असर असणार!

म्हणूनच इथे प्रत्येक गाण्यात शम्मीला सूर सापडलेला दिसतो.

छुपनेवाले सामने आ
छुप छुप के मेरा जी न जला

या गाण्याआधी तो नर्तिका शीला वाझचे केस विंचरून नीटनेटके करताना दिसतो त्या वेळी त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पाहावेत. अगदी एखाद्या कुटुंबवत्सल स्त्रीचे मार्दव त्याच्या मुद्रेवर दिसते.

पहिल्याच भेटीत दुरूनच टांग्यात बॅग फेकून टांगा रिझर्व्ह करणारा हा नायक, नायिका अमिताची छेडखानी करतो.

यूँ तो हमने लाख हसी देखे है
तुमसा नही देखा

हा त्याचा कबुलीजबाब मोठा लाजवाब!

त्याच्या बंडखोर अन् बेमिसाल अदाकारीची ही पहिली झलक. इथे अमिताचे रुसवे फुगवे, शम्मी ओठांचा चंबू करत तिला डिवचणे, अमिताने चिडून त्याच्या कपाळावर मारलेली खारिक, रफीच्या रसिल्या आवाजातलं आहाहाSS हे सारं रोमांचित करणारं. 'बिनाका गीतमाला आणि अमीन सायानी यांनी या शीर्षक गीताला प्रथम क्रमांक देत त्याची लोकप्रियता जणू राजमान्य केली. घोड्यांच्या टापांच्या रिदमवर बेतलेल्या अनेक गीतांमध्ये 'तुमसा नही देखा'ला जणू अढळपद दिले आणि शम्मी कपूरच्या करिअरला एक स्थैर्य बहाल केले.

ओ. पी. नैयर, मजरूह सुलतानपुरी यांची ही किमया. दिग्दर्शक नासिर हुसेनला सापडलेला लॉस्ट अ‍ॅण्ड फाउंड फॉर्म्युला ही 'तुमसा नही देखा' चित्रपटाची कमाई.

## एक जगावेगळी प्रेमकथा

'मिस कोकाकोला' चित्रपटाच्या सेटवर शम्मी कपूर, गीता बालीच्या प्रेमात पार बुडाला. प्रथम हे प्रेम अगदीच एकतर्फी होतं, नंतर त्या प्रीतीला दोन्ही बाजूंनी धुमारे फुटले. तो रोजच तिला प्रेमाची याचना करायचा. तिचा प्रतिसाद नसायचा.




पण हलके हलके पहिल्या प्रेमात पोळलेल्या या प्रेमवीराला तिची सहानुभूती लाभली. आधी ती निःशब्द. तो खूप बडबड करायचा.

ती अनेक प्रकारे त्याला फटकारायची. 'प्रेम आणि लग्न हे सारेच माझ्यासाठी नाही. माझ्यावर कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी आहे' असे ती अनेक प्रकारे सांगून त्याला नाउमेद करायची.

पण तो सेटवर तिला रोजच सारखा 'आपण लग्न करू या' हा धोशा लावायचा.

अखेर तिने शरणागती पत्करली. 'चलो आज करते है शादी... मगर याद रहे, आज नही तो कभी नही', हा निर्णायक इशारा त्याला कमालीचा आनंद देणारा.

तारीख होती २३ ऑगस्ट १९५५. मध्यरात्र झाली होती. गीताचा अल्टिमेटम तर मिळालेला. शम्मीला अचानक आठवले, त्याचा दोस्त जॉनी वॉकर याची नुकतीच शादी झालेली.

त्याला फोन गेला. त्याने सांगून टाकले, ''मैने काजीको पटाया...तुम किसी मंदिर में जाओ, पुजारी को पैसे दे दो...''

शम्मी कपूर आणि गीता, बाणगंगा येथील मंदिरात दाखल झाले. पण तिथेही दुर्दैव आड आले. मंदिराला कुलूप होते. पुजारी पहाटेच्या सुमाराला येणार हे कळले.

मंदिराच्या पायरीवर दोघे बसून होते. शुचिर्भूत पुजारी पहाटे चारला उगवला आणि गळ्यात माळा घालून शम्मी आणि गीता एकमेकांचे झाले.

खरंतर या लग्नात अनेक अडथळे होते. गीता बाली तेव्हा स्टार होती. शम्मी अगदी नवशिका, पडेल चित्रांचा नायक.

गीता बालीने आधीच शम्मीचा थोरला भाऊ राज कपूर समवेत थेट नायिका रंगवलेली. चित्रपट 'बावरे नैन.' तसेच 'आनंदमठ' चित्रपटात पृथ्वीराज कपूरसह 'माँ वंदे मातरम्' गीत गात प्रेक्षकांना जिंकलेले.

त्या दिवशी पापा पृथ्वीराज कुटुंबासह भोपाळ येथे गेलेले.

अचानक झालेल्या या शादीने कपूर कुटुंबात मोठाच हलकल्लोळ उडाला. पण लवकरच सारे स्थिरावले.

शम्मी कपूर-गीता बाली विवाहाप्रीत्यर्थ रिसेप्शन आयोजित करत कपूर कुटुंबाने या जोडीला स्वीकारले.




शम्मी कपूरची कारकिर्द नंतर बहरत गेली. गीता बालीने विवाहानंतरही चित्रपटसृष्टी सोडली नाही.

## कारकिर्द आणि सहजीवन

लग्नाआधीची काही वर्षे गीता बाली एक बिझी स्टार म्हणून ओळखली जायची

राग रंग (१९५२) नाझ आणि झमेला (१९५३) या चित्रपटात अशोक कुमार आणि गुरूदत्त तसेच भगवान यांच्यासमवेत ती दिसली. १९५४ मध्ये आलेल्या 'कश्ती'मध्ये पुन्हा देव आनंद तिचा नायक होता.

१९५५ सालात फिल्म फेअरने तिची दखल घेतलेली दिसते.

वचन आणि कवि या दोन्ही चित्रपटांसाठी अनुक्रमे बेस्ट ॲक्ट्रेस आणि बेस्ट सपोर्टिंग ॲक्ट्रेस म्हणून गीता बालीला नामांकन मिळाले होते. त्याच वर्षी 'बारादरी'मध्ये अजित तिचा नायक होता.

१९५७ सालात जेलर (सोहराब मोदी) आणि तुमसा नही देखा हे दोघांचे स्वतंत्र चित्रपट दखलपात्र ठरले.

१९५८ सालात आलेला 'अजि बस शुक्रिया' (सुरेश) चित्रपटात तिचा अभिनय बावनकशी! त्यातले 'सारी सारी रात तेरी याद सताये' हे तिच्यावर चित्रित झालेले लतादीदीचे गीत त्या वर्षी बिनाका गीतमालाच्या अंतिम पर्वात वाजले.

मिस्टर इंडिया (१९६१) मध्ये आय. एस्. जोहर तिचा हिरो होता.

नंतर हळूहळू गीता बाली आपल्या संसारात बुडाली.

शम्मी कपूर-गीता बाली जोडीचा 'कॉफी हाऊस' १९५७ सालातला. पण तो नाही चालला.

याच काळात शम्मी कपूरची रुपेरी घोडदौड मोठ्या झोकात सुरू झाली.

ओ.पी. रल्हनच्या 'मुजरीम' (१९५८) मध्ये त्याच्या बंडखोर, आक्रमक अंदाजाने प्रेक्षक थक्क झाले.

हम सब चोर है (नलिनी जयवंत) कॉलेज गर्ल (वैजयंती माला) हे चित्रपट जेमतेम चालले, पण त्यातली गाणी गाजली. दोन्ही चित्रपट नायिकाप्रधान. शम्मीला फारसा वाव नव्हता.

पण १९५९ सालात आलेला नासिर हुसेन दिग्दर्शित 'दिल देके देखो' म्हणजे जणू सब कुछ शम्मी कपूर!

त्यातली सर्वच गाणी गाजली. नवी नायिका आशा पारेख, नवीन संगीतकार उषा खन्ना असूनही चित्रपट तुफान चालला. पुन्हा एकदा 'लॉस्ट ॲण्ड फाउंड' फॉर्म्युला वापरत नासिर हुसेनने एक अफलातून करमणूक दिली.

इथे नवा विनोदी नट राजेन्द्रनाथ, नवा खलनायक सिद्धू यांच्यासह राज मेहरा, सुलोचना हे बुजुर्ग होते.

शीर्षक गीतामध्ये शम्मी झोकात ड्रम सेट वाजवत रमला. या चित्रपटाने त्याचे नृत्यकौशल्य आणि त्याच्यामधला एल्व्हिस प्रिस्ले प्रेक्षकांवर मोठीच जादू करून गेले.

'बोलो बोलो कुछ तो बोलो!' मधली छेडखानी अन् नर्तन कमालीचे आक्रमक अन् आकर्षक. 'मेघा रे बोले सनन सनन' या गाण्यात वर्षा ऋतूच्या आगमनाचे सूरच त्याने धडाक्यात आळवले.

नायिका एका पिकनिक्मध्ये त्याला विचारते, ''आपको गाना, नाचना आता है?''

यावर त्याचे उत्तर म्हणजे बेधडक अदाकारी... ''एक बार मेरा गाना बडे गुलाम अली खाँ साहबने सुना था... उसके बाद वो तीन दिन तक बेहोष थे... आज भी मैं एक तान लगा दूँ, तो सामने जो काम कर रही देहाती लडकियाँ है ना, वो दौडती चली आयेगी...''

चलाखीने त्या ग्रामीण कन्यकांना पैशाची लालूच दाखवत त्याने आधीच वश करून घेतलेले.

नंतरचे 'बडे है दिल के काले' हे द्वंद्वगीत म्हणजे एक झकास जुगलबंदी.

पूर्वी 'आवारा' चित्रपटात निवड झाल्याच्या आनंदात अभिनेत्री नरगिसने शम्मीला एल्व्हिस प्रिस्ले या हॉलिवूडच्या नटाच्या रेकॉर्ड्स भेट दिल्या होत्या. त्याचे शम्मीने खरोखरच चीज केले. घरातच त्याची तालीम चालायची.

'हम और तुम और ये समा' हे रफीचे गंभीर गाणेसुद्धा त्याने समरसतेने

'नया जमाना'मध्ये प्राणबरोबर धरम-हेमा

पेश केले!

यार चुलबुला है
हसीन दिलरुबा है

या द्वंद्वगीतामधला नटखट अंदाज आशा पारेख-शम्मी कपूर जोडीने मस्तीत पेश करत प्रेक्षकांना उत्तेजित केले. एकूणच 'दिल देके देखो'चे सुवर्णमहोत्सवी यश, 'तुमसा नही देखा' म्हणजे केवळ योगायोग नव्हता, हेच अधोरेखित करणारे!

इथे सुलोचनाबरोबर त्याने केलेला एक सीन त्याच्या अभिनयाचे अन् सुरेख संवाद फेकीचे दर्शन घडवणारा.

''मुझमें तुम्हे अपनी माँ दिखाई देती हो तो नीता का साथ छोडो...'' या सुलोचनाच्या अभिव्यक्तीवर त्याचे बाणेदार उत्तर येते-

''आज अगर मेरी माँ होती, तो कहती, नीता का साथ कभी न छोडना... माँ बनना इतना आसान नही... पहले माँ बनना सीखो...''

आपल्या सुरुवातीच्या धडपडीबद्दल बोलताना एका मुलाखतीमध्ये तो म्हणतो, ''मै जब परदे पर आया, तो राज कपूर, दिलीप कुमार और देव आनंद का राज था. उनकी अलग पहेचान थी... मुकाबले में मुझे कुछ नया कर दिखाना था... मगर करूँ तो क्या करूँ, ये समझ में नही आता था...'

उजाला, कॉलेज गर्ल, सिंगापूर बसंत अशा चित्रपटातून माला सिन्हा, वैजयंती माला, पद्मिनी आणि नूतन या नायिकांसमवेत त्याची जोडी जमली.

१९६० च्या दशकात त्याची ही धडपड संपली. त्याच्यातला याऽऽहू त्याला सापडला.

## शादी के बाद

अचानक झालेल्या शादीची वार्ता शम्मीने भोपाळला पृथ्वीराज कपूरना कळवली. त्यावर पापाजींनी 'तो यहाँ आओ, सेलिब्रेशनकेलिये' या शब्दात कौतुक केले.

लवकरच गीता बाली कपूर कुटुंबाचा हिस्सा बनून त्यांच्याशी एकरूप झाली. लवकरच तिने मातृत्वाचा पल्ला गाठला. शम्मी-गीताच्या पुत्राचे नाव आदित्य राज कपूर. (१९५६) नंतर १९६१ मध्ये त्या दोघांची कन्या कांचन जन्माला आली. याच काळात शशी कपूर-जेनिफर विवाहाला पाठिंबा देत तिने कपूर कुटुंबाचे मन वळवले. लग्नानंतरही गीता बालीने चित्रपटात काम केले. तेवढे स्वातंत्र्य तिला

कुटुंबवत्सल शम्मीकपूर आणि गीता बाली





मिळाले. शम्मी कपूरला एक जबरदस्त आत्मविश्वास जणू तिनेच दिला. त्याच्यामधले पडद्यावरचे नवखेपण संपून एक उमदा, आक्रमक अन् तितकाच बंडखोर नट जन्माला आला. विशेषत: गाणी पडद्यावर साकारताना तो खुलत गेला.

वेषांतर केलेला त्याच्यामधला मिर्झा चंगेझी (तुमसा नही देखा... बे इक बे, बे दुने चार हे गीत) प्रोफेसर सामरी (दिल देके देखो) या व्यक्तिरेखा 'जानदार आणि खऱ्याखुऱ्या वाटल्या.

हट जाओ दीवाने आये (सिंगापूर) ये शहर बडा अलबेला (सिंगापूर) ही गाणी आठवा.

त्याचबरोबर सूरज जरा आ पास आ आणि या अल्ला या अल्ला दिल ले गई (उजाला) मधली समरसता कमालीची सरस.

१९६३ सालात गीता बाली थेट निर्मिती क्षेत्रामध्ये उतरली.

'जब से तुम्हे देखा' या चित्रपटाद्वारे ती चक्क निर्माती बनली. इथे प्रदीप कुमार तिचा नायक होता. एका कव्वाली दृश्यात शम्मी कपूर, शशी कपूर पाहुणे कलाकार म्हणून सामील झाल्याचे स्मरते. चित्रपटाला फार मोठे यश मिळाले नसले तरी गीता बालीचे कौतुक झाले.

१९६२ सालात आलेल्या 'जंगली' चित्रपटाचे सुवर्णमहोत्सवी यश शम्मी कपूरला पुन्हा याऽऽहू अदाकार म्हणून मान्यता देऊन गेले.

इथे आधी ललिता पवार या मातेचा आज्ञाधारक, रुक्ष, तडक फडक, संतापी पुत्र ते

निरागस सायरा बानूच्या प्रेमात पडल्यानंतरचा धीट, संवेदनशील तरीही आक्रमक नायक हा सारा कायापालट शम्मी कपूरने ज्या नजाकतीने साकारलाय त्याला प्रचंड दाद मिळाली.

'चाहे कोई मुझे जंगली कहे'मधून त्याची याहू ही आरोळी काश्मीरच्या वादियों में घुमली. हा रंगीत चित्रपट, सायरा आणि शम्मीच्या नैसर्गिक सौंदर्याला आणखी खुलवून गेला. छायाचित्रकार एन.व्ही. श्रीनिवास यांचा कॅमेरा असा फिरलाय, की या जोडीची ही प्रेमकहाणी त्यांच्या डोळ्यातून, मुद्राभिनयातून पडद्यावर नेमकी उतरली. प्रेक्षकांना शम्मी कपूरने एक आगळा दिलखुलास आनंद दिला.

त्या आधीचा 'दिल तेरा दिवाना' ब्लॅक ॲन्ड व्हाईट, पण शम्मी-माला सिन्हा जोडीच्या आक्रमक आणि परस्पर समरस अंदाजाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले. शीर्षक गीतामधल्या पावसात भिजताना दोघांनी प्रेक्षकांनाही पार भिजवून टाकले. दोघातली केमिस्ट्री छान जुळून आली.

नजर बचा कर चले गये वो
वरना घायल कर देता

हा शम्मी कपूरचा अंदाज रफीच्या सुरेल गीतामधून खुलत गेला.

मुझे कितना प्यार है तुमसे
अपनेही दिले से पूछो तुम
जिसे दिल दिया है वो तुम हो
मेरी जिंदगी तुम्हारी है

या गीतामधली प्रणय भावना इतकी दिलचस्प, की तरुणाई या अदाकारीवर, सुरांवर भाळली.

'जंगली' मधल्या द्वंद्वगीताची खुमारी काही औरच! 'दिन सारा गुजारा तेरे अंगना'


'जंगली'मध्ये शम्मीकपूर आणि सायराबानू

हा कबुलीजबाब आणि नंतर 'मेरे यार शब्बा खैर' हा निरोपाचा अंदाज एकदम बेमिसाल.

'अयय्या सुकू सुकू'मधला हेलन बरोबरचा त्याचा पाश्चिमात्य डान्स थक्क करणारा. त्याचे पदलालित्य लक्षवेधक ठरले.

'दिल तेरा दिवाना'नंतर माला सिन्हा-शम्मी कपूर जोडीने पुन्हा एकत्र काम करणार नसल्याचे जाहीर केले. कारण उघड आहे!!

'जंगली'च्या यशानंतर मुंबई विमानतळावर शम्मी कपूर उतरल्यावर पत्रकारांनी 'सायरा कहाँ है' असा नटखट सवाल केला.

त्यावर हा पठ्ठ्या खिशातून सायराचा फोटो काढत म्हणतो, ''ये क्या, मेरी जेब में!!''

यशाने माणसाचा आत्मविश्वास वाढतो तो असा!!

'एहसान तेरा होगा मुझपर' हे थोडे भावनोत्कट गीत गाताना शम्मी कपूर तितकाच संवेदनशील होतो हे विशेष.

वास्तवातला हा दोन अपत्यांचा पिता आहे, हे खरे नाही वाटत, पण त्याच्यामधला प्रगल्भ नट 'प्रोफेसर' चित्रपटात प्रकटला अन् त्याच्या अभिनय सामर्थ्याने प्रेक्षकांची आणि समीक्षकांची दाद मिळवली.

नोकरी मिळवण्यासाठी इथे त्याला वयस्कर प्रोफेसरचे सोंग वठवावे लागते. नायिका कल्पना, तिची बहीण परवीन चौधरी आणि या दोघींची शिस्तप्रिय, करारी मावशी ललिता पवार या साऱ्यांमध्ये वेषांतर केलेला प्रौढ दाढीवाला, चष्मेवाला प्रोफेसर म्हणून त्याने जो अभिनयाचा आविष्कार घडवलाय तो खरोखरच काबिले तारीफ आहे.

एकीकडे कल्पनाच्या प्रेमात पडलेला युवक आणि दुसरीकडे ऑंटी ललिता पवारच्या प्रीतीने अवाक् झालेला प्रोफेसर या द्वंद्वामध्ये सापडलेला शम्मी कपूर आपल्या अदाकारीतून असे काही भावदर्शन घडवतो की आपण चकित होतो.

मै चली मै चली
लो शुरू हो गई प्यार की दास्ताँ

या द्वंद्वगीतामध्ये चुलबुली कल्पना आणि तिला छेडणारा शम्मी ही केमिस्ट्री तरुणाईला पार वेडं करून गेली.

'पोंगा पंडित' ही नवी ओळख त्याला छळते. लहान मुलांना 'कोई छुट्टी नही', बजावणारा प्रोफेसर एकीकडे, आणि 'एSS गुलबदन' गीतामधून आपली प्रीती व्यक्त करणारा नायक असे हे दुहेरी व्यक्तिमत्त्व ज्या ताकदीने शम्मी कपूरने साकारलाय, त्याला आपली दाद जाते!

'आवाज देके हमे तुम बुलाओ' या युगुलगीतामधून कल्पना-शम्मी जोडीची समरसता लता-रफीच्या भावोत्कट स्वरातून प्रकटली.

भप्पी सोनी दिग्दर्शित 'प्रोफेसर' प्रचंड गर्दी खेचत असतानाच शम्मी कपूरला त्या वर्षी प्रथमच 'बेस्ट ॲक्टर' फिल्म फेअर ॲवॉर्डसाठी नॉमिनेशन मिळाले. दुर्दैवाने

त्याच्या हातून ते निसटले. 'ताजमहल' चित्रपटासाठी प्रदीप कुमारला ते बहाल करण्यात आले.

नंतरही 'चायना टाऊन' द्वारे त्याला डबल रोल करायची संधी मिळाली. माईक या भूमिकेतून त्याचा मिजाज एकदम निराळा. पण 'जंगली'ची याऽऽहूऽऽ अदाच प्रेक्षकांनी जास्त पसंत केलेली दिसते. 'राजकुमार'मधला प्रिन्स एकदम वेगळा... ही त्याची बहुविध प्रतिभा इथे 'इस रंग बदलती दुनिया में' गाण्यात तो नायिकेला 'कांधे से हटा लो सर अपना' सुनावतो आणि ती संभ्रमात... इथे पुन्हा त्याचे वेषांतर आहेच.

बदतमीज (साधना), प्यार किया तो डरना क्या आणि प्रीत न जाने रीत (बी. सरोजा देवी) हे साऊथचे दोन चित्रपट त्याने का केले असा प्रश्न पडतो.

**अकाली संपलेली कहाणी**

पंजाबी कथेवर 'रानो' या फिल्मची निर्मिती करताना गीता बाली लोकेशनवरच आजारी पडली. मुंबईत ती परत आली ती अंगात ताप घेऊनच.

त्या वेळी शम्मी कपूर तीसरी मंझिल चित्रपटाचे शूटिंग करत होता. निर्माते दिग्दर्शकांच्या सोयीसाठी त्याचा हॉटेलमध्ये मुक्काम होता. त्याला निरोप गेला. किरकोळ ताप असेल या भावनेने त्याने दुर्लक्ष केले.

तो खूप उशिरा तिला भेटायला गेला अन् डॉक्टरांनी तिला देवी (स्मॉल पॉक्स) झाल्याचे निदान केले. गीता बाली कुठलेही इंजेक्शन घ्यायला घाबरत असे. त्यामुळे तिने कधीच प्रतिकारक औषध टोचून घेतलेले नव्हते.

आजार बळावत गेला आणि २१ जानेवारी १९६५ रोजी मुंबईतल्या हॉस्पिटलमध्ये गीता बालीने वयाच्या



अवघ्या पस्तिसाव्या वर्षी या जगाचा निरोप घेतला.

उद्ध्वस्त शम्मी कपूर तिच्या अंत्ययात्रेत अन्य कुणाचा आधार घेताना दिसला. तिच्या निधनाने त्याच्यामधला याहूऽऽ पार भारावला, अशा बातम्या पेपरवाल्यांनी छापल्या.

एक रंगलेली प्रेमकहाणी अचानक संपून गेली.

कलाक्षेत्रात शम्मी कपूर पुढची वाटचाल करीत राहिला. तीसरी मंझिल, जानवर, ॲन इव्हिनिंग इन पॅरिस, ब्रह्मचारी ही त्याची यशस्वी कारकिर्द बहरली.

नीला देवीशी विवाह आणि नंतर कुणा स्वामींच्या सहवासातून शम्मी कपूर खूप बदलत गेला. गळ्यात रुद्राक्षांच्या माळा आल्या. अंगात भगवे कपडे आले. इंटरनेटच्या माध्यमातून याहू-डॉट-कॉम द्वारे तो आधुनिक जगाशी संपर्क साधून होता.

गीता बाली गेल्यानंतर त्याला 'ब्रह्मचारी' चित्रपटासाठी बेस्ट ॲक्टर म्हणून फिल्म फेअर ॲवॉर्ड जाहीर झाले. ती असती तर... हा विचार त्याच्या मनात नक्कीच आला असेल. शम्मीने नंतर दुय्यम भूमिकेत आपली कारकिर्द पुढे नेली. 'प्रेमरोग' ते 'हिरो' ही त्याची सेकंड इनिंग! 'विधाता' चित्रपटात दिलीपकुमार, संजीवकुमार या दिग्गज अशा अभिनेत्यांसमवेत काम करताना त्याने फिल्म फेअर पाक्षिकाचे बेस्ट सपोर्टिंग ॲक्टर ॲवॉर्ड खेचून घेतले. १९९५ मध्ये लाइफ टाईम ॲवॉर्ड देऊन त्याला गौरवण्यात आले.

'जंगली'ची नायिका सायरा बानू 'जमीर' चित्रपटात त्याची कन्या म्हणून पडद्यावर दिसली. हा काळाचा महिमा! 'मनोरंजन' आणि 'बंडलबाज' या चित्रपटाचे त्याने दिग्दर्शन केले. दुर्दैवाने संजीवकुमार आणि राजेश खन्ना असे तगडे कलाकार असूनही चित्रपट फसले.

अतिरिक्त मद्यपान आणि धूम्रपान या सवयी म्हणजे कपूर हिरोंची जिंदगी. शम्मी कपूर त्याचाच बळी.

किडनीच्या व्याधीने १४ ऑगस्ट २०११ रोजी मुंबईत शम्मी कपूरने अखेरचा श्वास घेतला. दुसरा शम्मी कपूर पैदा होणे अशक्य!

योगिता बाली ही गाती बालीची भाची काही काळ रूपेरी पडद्यावर दिसली. उर्मिला मातोंडकर आरंभी खूपशी तिचे स्मरण देई.

हम प्यार में जलने वालों को (जेलर) आणि सारी सारी रात तेरी याद सताए (अजी बस शुक्रिया) ही गाणी आजही गीता बालीची आठवण करून देतात.

त्याने तिचा मृत्यू पाहिला. तिने त्याचा 'तुमसा नही देखा' ते 'प्रोफेसर' हा उत्कर्ष पाहिला.

स्वर्ग असेलच तर तिथेही गीता बालीने शम्मी कपूरचे स्वागतच केले असणार!

**सदानंद गोखले**
**जयश्री सोसायटी , फ्लॅट क्र. १३,**
**हिंगणे खुर्द, सिंहगड रोड,**
**पुणे ५१**

# अक्षर धन

## परिचय - कल्पना शिरोडे, शर्मिली कवडे, कल्याणी गाडगीळ

### माझी वकिली आणि अशिलाचे नशीब


**संकलन– ॲड. वंदना डांबरे**

आपले स्वतःचे आणि आपल्या मित्रमैत्रिणींचे वकिली व्यवसायातले काही अविस्मरणीय अनुभव घेऊन ॲड वंदना डांबरे यांनी हे पुस्तक संकलित केलं आहे. हे पुस्तक लिहिण्यामागचा मूळ उद्देश हा समाज जागृती व समाजकल्याण हाच आहे. हे पुस्तक लेखिकेने न्यायदेवतेच्या चरणी कोटी कोटी प्रणाम करून कृतज्ञतापूर्वक अर्पण केलं आहे. वकिलाची सफलता-असफलता ही अशिलाच्या नशिबावर अवलंबून असते. आणि वकिलाचे नशीबही अशिलाच्या नशिबाशी जोडलेले असते. असे लेखिका आपल्या मनोगतात म्हणतात. लेखिका वकिली व्यवसायात तर आहेतच पण समाजसेविका आहेत आणि संगीत विशारदही आहेत. प्रियांजली प्रकाशनाच्या या पुस्तकासाठी श्रीकृष्ण ढोरे यांनी विषयाला साजेसं मुखपृष्ठ तयार केलं आहे.

खरंतर वकिलाने कोर्टकचेऱ्यांऐवजी तडजोडीचा सल्ला अशिलाला देऊन शांतता निर्माण करावी असं लेखिका म्हणतात पण मग त्या वकिलाला काही येत नाही असं त्या अशिलाला वाटायला लागतं असंही त्या सांगतात.

डॉ. सुरेशचंद्र भोसले यांचा या पुस्तकाला अभिप्राय लाभला आहे. ते म्हणतात, 'वकिली म्हणजे लबाडी' अशी अनेकांची चुकीची समजूत असते. ती समजूत हे पुस्तक वाचल्यानंतर नक्कीच दूर होईल.

आयुष्यातली पहिली केस जेव्हा ॲड वंदना डांबरे जिंकतात, तेव्हा त्याचे श्रेय त्या अशिलाच्या त्यांच्यावरील विश्वासाला देतात आणि सत्याला देतात. मी फक्त निमित्तमात्र होते असं त्या म्हणतात. एका केसमध्ये मात्र त्यांची एक




अशीलच कशी त्यांची वैरी झाली हे सांगितलं आहे. आपल्याकडे जर प्रामाणिकपणा असेल तर कितीही अशील आरोप ठेवून निघून गेले तरी कधीही वाईट वाटणार नाही. आणि जे नशीबवान असतील ते बरोबर आपल्यापर्यंत पोहोचतील आणि त्यांना न्याय मिळेलच. आत्मविश्वास, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर एका अशिलाने गॅस एजन्सी ची केस कशी जिंकली याची एक छान कहाणी या पुस्तकात आहे. लेखिकेची वकिली असली तरी अशिलाचे नशीबही बलवत्तर होते असं त्या म्हणतात.

कितीही हुशार डॉक्टर असले तरी नात्यातली केस समोर आली की त्यांचे हातपाय लटलट कापतात तसेच वकीलाचेही असते असं नात्यातली केस हाताळताना आलेल्या अनुभवातून त्या सांगतात.

ॲड. दादासाहेब बेंद्रे, ज्येष्ठ विधिज्ञ यांच्या 'होय मला काही सांगायचंय' या पुस्तकातली एक अविस्मरणीय केस या संग्रहात दिली आहे. ती वाचून तर अंगावर अक्षरशः काटाच येतो.

एका अनोळखी नगरसेविकेने ॲड. प्रफुल्ल पोतदार ह्याच मला वकील म्हणून पाहिजेत असं न्यायालयात सांगितलं. पण शस्त्रक्रिया झाल्यामुळे त्या केससाठी हजर राहू शकत नव्हत्या. तरीही वकील बदलायला त्या नगरसेविका तयार

नव्हत्या. शेवटी ॲड. पोतदार यांनीच ती केस जिंकली. संगणक उपक्रमात एका क्लासवाल्यांनी एका मुलीला फसवलं त्याची केस ॲड. पल्लवी शिंदे यांनी लढवली. तीही या पुस्तकात आहे. प्रार्थना एक चमत्कारच आहे हे ॲड. हिरा बारी यांनी एका गोष्टीवरुन पटवून दिले. बोलतांना नेहमीच मुद्दा सोडून भरकटत जाणाऱ्या पण प्रार्थनेमुळे उलटतपासणीच्या वेळी अतिशय मुद्देसूद, न घाबरता बोलणाऱ्या अशिलाची ही केस.

शाळेच्या बसमधल्या तीन चार वर्ष वयाच्या मुलाची लैंगिक अत्याचाराची केस. त्या केसमध्ये डोळे घट्ट मिटून घेऊन एक शब्दही न बोलणारा तो मुलगा आणि त्या केसचा लागलेला निकाल हा त्या वकिलांच्या आणि आपल्याही कल्पनेपलीकडचा आहे.

पक्षकाराच्या विरुद्ध निकाल लागूनसुद्धा तो वकिलावर खूश होता ही 'अमावस्या' या शीर्षकाची ॲड. नंदकुमार सूर्यवंशी यांची गोष्ट या पुस्तकातच वाचली पाहिजे. न्यायालयाचा आदेश एका पाच वर्षाच्या मुलीने कसा फक्त कागदापुरताच ठेवायला भाग पाडला हे 'इवलीशी छकुली' या केसमध्ये ॲड. मनीषा सोनवणे यांनी सांगितलं आहे. तर ॲड. रोहिणी बोधनी यांच्या 'अतृप्त इच्छा' या एका केसमधल्या आईचा आक्रोश हृदय विदीर्ण करून जातो. डॉ. उदय वारुंजीकर ॲड. मकरंद औरंगाबादकर यांच्या अफलातून केसेस या पुस्तकात आहेत. प्रत्येक केस, त्यातल्या विविध व्यक्ती, त्यांचे विचित्र स्वभाव या पुस्तकात वाचायला मिळतात. नेहमीपेक्षा एक खूप वेगळंच पुस्तक वाचल्याचं समाधान मिळतं. शेवटी ॲड. डांबरे यांनी 'कायदा आणि अध्यात्म, न्याय आणि परमेश्वर' अशी एक कविताच केली आहे. त्यात त्या म्हणतात,

तुझा नाही कुणी वाली
कर आता घर खाली
अंथरली घोंगडी पसरले पाय
एकदा तरी जीवनाचा विचार केलास काय?

**–कल्पना शिरोडे**

**रो हाऊस नं.४४, युनिट ८७–८८, संकुल, एरंडवणे, पुणे ४**

## *ब्रह्मचैतन्य गीतं*

**कवियत्री शुभा रुद्र**

**मूल्य रु. २०० /=**

श्री गोंदवलेकर महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १८४५ साली झाला. २२ डिसेंबर १९१३ साली एकूणसत्तराव्या वर्षी त्यांनी देह ठेवला. आज शंभर वर्षे होऊनदेखील महाराजांचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट त्यांची महती दिवसेंदिवस वाढतच आहे. विद्वान पंडितापासून ते अगदी अशिक्षित माणसाला ते त्यांचे स्वतःचे गुरू वाटतात. परमार्थ प्रपंचात मिसळला गेला पाहिजे असे ते नेहमी सांगत. आपल्या संगतीत येणाऱ्या प्रत्येक माणसाला भगवंताच्या निष्ठेचे आणि नामाचे महत्त्व कळले पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. खऱ्या परमार्थाबद्दल लोकांमध्ये नाना तऱ्हेच्या गैरसमजुती, नाना प्रकारचे प्रमाद व विपरीत आचार दृढमूल झालेले असतात. ते सर्व दूर करण्याचा प्रचंड खटाटोप त्यांनी आयुष्यभर केला. मनुष्याने भगवंताची उपासना करून त्याची प्राप्ती करून घेतली पाहिजे, तरच प्रपंचातील कष्टाचे सार्थक होते, असे महाराजांचे ठाम मत होते.




सध्याच्या परिस्थितीत उपासना करण्यास नामासारखा सोपा उपाय नाही, म्हणून प्रत्येकाने नामाची आस धरावी हेच त्यांच्या शिकवणीचे सूत्र होते. श्री महाराजांच्या भक्तांपैकी काहींनी वेळोवेळी लिहून ठेवलेल्या निरूपणाच्या संग्रहातून महाराजांची प्रवचने जन्माला आली. दर दिवसाचे एक अशा ३६५ प्रवचनाची सुसूत्र बांधणी महाराजांच्या प्रवचन या पुस्तकात आपण बऱ्याच जणांनी वाचले असेल . लोकांना अध्यात्माचा सोपा सरळ मार्ग महाराजांनी सांगितला आणि जनसामान्यात रुजवला. त्या बीजाचा आज वटवृक्ष झाला आहे. महाराजांच्या प्रवचनांमुळे सामान्य माणसाला जीवनाचे सूत्र सापडले.

शुभा रुद्र यांनी याच प्रवचनांचे काव्यात रूपांतर केले आहे. खरेतर हे काम करणे शिवधनुष्य पेलण्यासारखे आहे. महाराजांची प्रवचने वाचायला अतिशय सोपी आहेत पण त्याच्यात खूप गर्भित अर्थ लपला आहे. कुठल्याही विषयाचे लेखन करण्यासाठी त्या विषयाचे खूप वाचन जसे हवे असते तसे चिंतन पण हवे असते. त्याप्रमाणे कविता करण्यासाठी त्या विषयाचे वाचन, मनन तर हवेच असते पण त्याबरोबर तो विषय दीर्घकाळ मनात मुरावापण लागतो. शुभाताईंचे काव्य वाचताना एक गोष्ट लक्षात आली की महाराजांची प्रवचने त्यांच्या मनात दीर्घकाळ मुरलेली आहेत. त्याशिवाय या काव्य शृंखलेचा जन्म झाला नसता. सलग एक वर्ष चाललेल्या या उपक्रमाचे फलित ब्रह्मचैतन्य गीत रूपाने आपल्या समोर आले आहे.अतिशय स्तुत्य उपक्रम करून त्या थांबल्या नाही तर ३६५ ऑडिओ करण्याचे कार्य त्यांनी केले. हा सगळा प्रवास सोपा नव्हता. त्याची अडथळ्यांची शर्यत त्यांनी मनोगतात व्यक्त केली आहे.

महाराजांच्या प्रवचनात जानेवारी, फेब्रुवारीमध्ये नाम, मार्च महिन्यात प्रपंच, एप्रिलमध्ये संत, सत्पुरुष, मे मध्ये साधन, जूनमध्ये परमार्थ, जुलैमध्ये सदगुरु, ऑगस्टमध्ये आनंद समाधान, सप्टेंबर मध्ये अखंड नामस्मरण, ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये भगवंत आणि शेवटी डिसेंबर मध्ये नाम या विषयांवर विवेचन केले आहे. त्याच क्रमाने शुभाताईंनी पण पुस्तकाचा क्रम ठेवला आहे. रोजच्या प्रवचनाचा गोषवारा चार ओळीत मांडण्याचा उपक्रम म्हटला तर दिसायला सोपा दिसला तरी तो अवघड आहे.

अहंपणा टाकल्यास प्रपंचातील लाभहानी झेलता येईल त्यासाठी शुभाताई म्हणतात,

**अभिमान अहंकार ।**<br>**सारासार नष्ट व्हावा ।।**<br>**रामनाम प्रपंचात ।**<br>**व्यवहार ही करावा ।।**

महाराजांनी भगवतांचे महत्त्व पटवून देण्यासाठी अनेक सामान्य जगातली उदाहरणे भक्तांसमोर मांडली, त्यासाठी जी रूपके वापरली, ती चारोळींमध्ये गुंफण्याचे कौशल्य शुभाताईंनी दाखवले आहे

**तबलजी भगवंत ।**<br>**ठेक्याला अनुसरावे ।।**<br>**समेवर बरोबर । कर्मकर्तव्य करावे ।।**

प्रपंचात कसे वागावे हे संत त्यांच्या वागणूकीतून भक्तांना दाखवून देतात. त्यासाठी शुभाताई

**मितभाषी तो उत्तम ।**<br>**संतवाणी आचरण ।।**<br>**मुखी घ्यावे रामनाम ।**<br>**संताचे मानावे ऋण ।।**

असे सांगतात

मुखी नाम असताना काळजी करु नका हे सांगायला त्या लिहितात

**सारी सत्ता ती रामाची,**<br>**चिंता सोडून चिंतन।,**<br>**करावे नामस्मरण, साधनेशी जोडा ।।**<br>**प्रश्न सारे सुटतील । जीवन सोपे होईल।**<br>**साऱ्या वासना जातील ।**<br>**संतकृपा बरसेल ।।** ...

संताचे आपल्या आयुष्यात आगमन झाल्यावर काय होईल याची चारोळी मनास स्पर्शून जाते .

नामाची महती कळकळीने सांगणारे महाराज प्रत्येक ओळीत आपल्या डोळ्यासमोर येत राहातात.

**मनास वाटे समाधान ।**<br>**चिंतांनी लागावे मन ।।**<br>**निष्ठेने नामस्मरण । भेटेल रघुनंदन ।।**

नामाची ताकद केवढी मोठी आहे. त्यासाठी कुठला पैसा खर्च करावा लागत नाही, कुठले शास्त्र अवगत करून घेण्याची आवश्यकता नाही. अगदी सरळ आणि सोप्या मार्गाने पण तुम्ही परमेश्वर प्राप्ती करून घेऊ शकता. हेच मत महाराजांनी ठामपणे मांडले. महाराजांची वाणी रसाळ होती. त्यातून लोकांना दिलासा मिळत असे. ही प्रवचने दिवसाप्रमाणे यु ट्यूब वर पण उपलब्ध आहेत. मग असे असताना या चारोळींचे काय प्रयोजन होते? हा प्रश्न मला हे पुस्तक वाचायच्या आधी पडला होता. पण हे पुस्तक वाचताना जाणवले की पानभरदेखील वाचायला ज्यांना सवड नाही त्यांच्यासाठी ही एक पर्वणी आहे. वाचक यात नकळत गुंतत जातो. आशय युक्त साध्या सरळ भाषेत, शब्दांची कुठलीही ओढाताण न होता ह्या काव्य रचनांचा आविष्कार झालेला दिसतो. महाराजांचा वरदहस्त असल्याशिवाय हे शक्य नाही. उषाताई रामकृष्ण कुलकर्णी यांची ह्यद्य प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. नंतर काव्याचे ऑडिओ करण्याचे कार्य शुभाताईंनी केले आहे. काही नाही तर एक मिनिट थांबून ऐका. कानावर चांगले पडले तर वाचायची इच्छा होईल आणि तीच इच्छा तुम्हाला नामस्मरणाकडे घेऊन जाईल यात शंका नाही हेच या पुस्तकाचे सार आहे असे म्हणायला हरकत नाही. शुभाताईंना पुढच्या आध्यात्मिक प्रवासाला अनेक शुभेच्छा.

**शर्मिली कवडे**<br>**पुणे**

## *सुरस धातू गाथा -*

**लेखक – प्रा. डॉ. सुनील विभुते**

नवचैतन्य प्रकाशनाद्वारे प्रकाशित केलेले प्रा. डॉ. सुनील विभुते यांचे सुरस धातू गाथा पुस्तक केवळ शालेय विद्यार्थ्यांनीच नव्हे तर त्यांच्या पालकांनी व सर्वच ज्ञानपिपासू लोकांनी अवश्य वाचले पाहिजे असे आहे.


पुस्तकाचे नावच सांगते की हे धातूंच्या कथा सांगणारे पुस्तक आहे. मुलांवर विज्ञान संस्कार होण्यासाठी निसर्गात मिळणाऱ्या बावन्न धातूंपैकी अल्युमिनियम, टँटॅलम, शिसे, व्हॅनेडियम, निकेल, तांबे, पारा, सोने, चांदी व प्लॅटिनम दहा धातूंविषयी कथा डॉ. विभुते यांनी येथे दिलेल्या आहेत. त्या रोम, ग्रीक, स्पेन, चीन, इजिप्त, हिंदुस्थान इत्यादी अनेकविध देशातील धातूसंबंधी पुरातन कथांचा परिचय करून देतात.

वरील दहा धातूंपैकी टँटॅलम किंवा व्हॅनेडियम या धातूचे नांव किती जणांना ठाऊक आहे? फारच थोड्यांना. पण या पुस्तकाद्वारे त्याची माहिती लोकांपर्यंत पोचते. अल्युमिनियम आता आपल्याला ठाऊक आहेच. पण एक गंमतीशीर गोष्ट म्हणजे तिसऱ्या नेपोलियन सम्राटाने अति महत्त्वाच्या व्यक्तींना देण्यासाठी अल्युमिनियमचे काटे-चमचे दिले होते व आपल्याकडे ते नाहीत याची इतर राजांना खंत वाटत होती! आता आपण असल्या अल्युमिनियमच्या चमच्यांना काहीही किंमत देत नाही ना? मानवाने प्रथमतःच म्हणजे राईट ब्रदर्सनी बनविलेल्या व आकाशात उडविलेल्या विमानाच्या इंजिनात अल्युमिनियमचा वापर केला होता कारण हा धातू हलका, टिकाऊ आणि गंजप्रतिरोधक असतो म्हणून ! ही माहिती वाचली की या धातूचे गुणधर्म लक्षात राहणे किती सोपे होते ना?

टँटॅलम हे धातूला मिळालेले नांव टँटॅलस नावाच्या फिजियन देशाच्या राजाच्या पौराणिक कथेशी निगडित आहे. हा धातू अत्यंत अपवादात्मक असून तो अत्यंत कठीण व कमालीचा मजबूत असतो. याचा उपयोग विविध वैद्यकीय व इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात केला जातो.

व्हॅनेडियम धातू चांदीसारखा, अत्यंत कठीण, टिकाऊ व गंजप्रतिबंधक आहे. पहिल्या महायुद्धात याचा वापर फ्रान्स या देशाने तोफ बनविण्यासाठी करून युद्धात जर्मनीविरुद्ध जय मिळविला.

तांब्यापासून सोने मिळविण्यासाठी संशोधन करणाऱ्या इजिप्तमधील चार धर्मगुरुंना सोने मिळाले नाही पण पितळ या मिश्र धातूचा शोध लागला ही कथा अगदी रंजक आहे. आणि आता आपण पितळ्याचा किती प्रचंड वापर करतो ना?




अलेक्झांडर द ग्रेट जग जिंकण्यास बाहेर पडला तेव्हा त्याच्या सैन्यामध्ये पोटाचा आजार पसरला. त्याचे कारण सैन्य लोखंडी पिपातले पाणी पीत पण त्याचे सरदार मात्र चांदीच्या ताटातून जेवत व चांदीच्या भांड्यातून पाणी पीत. चांदीचा अत्यंत कमी असा अंश पाण्यात उतरला तर तो पाण्यातील सर्व रोगजंतूंचा नाश करून पाणी निर्जंतुक बनवितो. हल्ली चांदीच्या भांड्यांचा पाणी पिण्यासाठी वापर केला जातोच. त्यामागचे कारण कळले की त्याचे महत्त्व कळते.

अर्नेस्ट हेमिंग्वे हे सुप्रसिद्ध लेखक, कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध होते. ते शार्कमाशांची शिकार करण्यातही तरबेज होते ही माहितीही या पुस्तकातून मिळाली.

या पुस्तकात रंजकतेबरोबरच वैज्ञानिक माहितीही पेरलेली आहे. त्यामुळे मुलांची धातूंविषयीची आत्मीयता खात्रीपूर्वक वाढेल. डॉ. विभुते यांची भाषा अत्यंत सोपी व रंजक असून कुणालाही ती सहज समजेल अशी आहे. पुस्तकात संदर्भानुसार दिलेली वेगवेगळी चित्रेही आकर्षक आहेत.

थोडक्यात काय, तर एकदा हातात घेतले की खाली ठेववणार नाही असे हे पुस्तक जरूर वाचाच.

**कल्याणी गाडगीळ,**

**पुणे.**